

IN ANY EMERGENCY
DIAL
100
TELANGANA POLICE
www.tspolice.gov.in
@ Telangana State Police

तेलंगाना सरकारचे प्रकाशन, हैद्राबाद


तेलंगाना शासनाचे मोफत वितरण

परिसर विज्ञान

# आपण-आपला परिसर

## तिसरा वर्ग

FREE



तेलंगाना सरकारचे प्रकाशन, हैद्राबाद

तेलंगाना शासनाचे मोफत वितरण

SCERT TELANGANA

## हे चित्र असलेल्या ठिकाणी असे करा


तुमचे शिक्षक सांगतील ते ऐका-
विचार करुन सांगा


तुम्ही मित्रासोबत मिळून करायचे काम


तुम्ही एकटेच करायचे काम


विषय आकलन


चित्र काढणे - रंग भरणे


समावार कौशल्य - प्रकल्प कार्य


कौतूक करणे


प्रश्न विचारणे


करुन दाखवा - सांगा


मी हे करु शकेन काय?

## मला हवा असलेला बदल माझ्यानेच होतो

1. बाजारात जातांना हातात एक पिशवी घेवून जाईने.दुकानात पॉलीथीन कव्हर दिले तर घेणार नाही.
2. पंप, नळाचे पाणी,काटकसरीने वापरीन, पाणी वाया जावू देणार नाही.
3. विद्युत बचत करुन, महिण्या महिण्याचे बिल कमी करतो । प्रदुषण थांबवितो.
4. लाकडाचा उपयोग करतो, झाडे लावतो ।
   मी घरात घराबाहेर झाडे लावतो, झाडे लावायला लावतो, त्यांचे रक्षण करतो.
5. ओला व कोरडा, कचरा वेगळा करतो - कचरा गोळा करणाऱ्या मानसाला देतो.
6. जुन्या वस्तूंना गोळा करुन किंवा घरातल्या जुण्या निकामी वस्तू गरजूं मानसांना देईन.
7. अनावश्यक प्रवास कमी करतो. संधी सापडेल तेव्हा चारचौघांना घेवून प्रवास करतो. सामाजिक प्रवासाच्या साधनांचा शक्यतो वापर करतो.
8. सौर शक्तीचा दिवसा वापर करुन रात्रीच्या वेळी शक्यतो विद्युत बचत करतो.
9. कंप्यूटरमध्ये टिकेट बुकिंग,ई-सेवामध्ये बिल भरुन रस्त्यावरील गर्दी कमी करतो, इंधनाचा खर्च, वायू प्रदुषण कमी करतो.
10. सुखी जीवनाचे हे साधे दहा सूत्र.... दहा जनांना सांगून कमीत कमी तीन चार जन याचे पालन करतील असे करतो.



झाडे लावू या - झाडे वाढवू या.
हिरवी वनस्पती - आहे पायरी प्रगतीची.
जेवना आधी व जेवना नंतर , हात पाय धुतो.
परिसर स्वच्छ ठेवू - निरोगी आरोग्याची हमी घेवू
आपण झाडांचे रक्षण केले तर ते आपले रक्षण करतात.
पाणी वाया घालनार नाही - पाण्याचा काटकसरीने वापर करीन.

Government of Telangana

**Department of Women Development & Child Welfare - Childline Foundation**

When abused in or out of school.

To save the children from dangers and problems.

CHILD LINE 1098 NIGHT & DAY 24 HOUR NATIONAL HELPLINE

When the children are denied school and compelled to work.

When the family members or relatives misbehave.

**1098 (Ten...Nine...Eight) dial to free service facility.**

SCERT TELANGANA

# आपण - आपला परिसर

# तिसरा वर्ग
# परिसर विज्ञान

Environmental Studies
Class- III
(Marathi Medium)


**संपादक**

**प्रोफेसर वि. सुधाकर**
इंग्रजी, विदेशी भाषेचे विश्वविद्यालय (EFLU),हैद्राबाद,

**डॉ.एन.उपेंदर रेड्डी**
प्रोफेसर, विद्या प्रणालीका, पाठ्यपुस्तक विभाग
राज्य विद्या, परिशोधन, शिक्षण संस्था तेलंगाना राज्य, हैद्राबाद

**श्री बि.आर.जगदीश्वर गौड**
प्रिंसीपाल,जिल्हा विद्या,शिक्षण संस्था,आदिलाबाद

**विषयतज्ञ**

**श्री सुवर्ण विनायक**
को-ऑर्डीनेटर,एन.सी.इ.आर.टी., तेलंगाना राज्य, हैद्राबाद

**श्री अलेक्स एम.जॉर्ज**
एकलव्य, मध्य प्रदेश

**श्री कमल महेंद्रू**
विद्याबोधन सोसायटी, उदयपूर

**पाठ्यपुस्तक अभिवृध्दी, प्रकाशक समिती**

श्री चारु सिन्हा, आय.पी.एस.
(सल्लागार, लिंग संवेदनशिलना)
संचालक, ए.सी.बी. तेलंगाना

**श्रीमती बि.शेषूकुमारी**
संचालक
राज्य विद्या, परिशोधन,
शिक्षण संस्था ते.रा. हैद्राबाद
हैद्राबाद

**डॉ.एन.उपेंदररेड्डी**
प्रोफेसर,विद्या प्रणालीका,
पाठ्यपुस्तक विभाग,
राज्य विद्या, परिशोधन,
शिक्षण संस्था ते.रा. हैद्राबाद

**श्री बी सुधाकर**
संचालक
शासकिय पाठ्यपुस्तक
मुद्रणालय ते.रा.
हैद्राबाद



तेलंगाना राज्य शासनाचे प्रकाशन,हैद्राबाद



SCERT TELANGANA





तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

*First Published 2012*
*New Impressions*
*2013, 2014, 2015, 2016, 2017,2018,2019,2020*

**All rights reserved**

No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted, in any form or by any means without the prior permission in writing of the publisher, nor be otherwise circulated in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition including this condition being imposed on the subsequent purchaser.

The copy right holder of this book is the Director of School Education, Hyderabad, Telangana.

This Book has been printed on 70 G.S.M. Maplitho
Title Page 220 G.S.M. White Art Card

तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

*Printed in India*
at the Telangana Govt. Text Book Press,
Mint Compound, Hyderabad,
Telangana.

SCERT TELANGANA

# प्रस्तावना

आपण सर्वजन संघजीवी आहोत. आपापल्या समाजाच्या मर्यादा,नियमाचे पालन करीत जीवन पध्दतीत मिसळून जगत असतो.म्हणून विद्यार्थ्यांना त्यांच्या सभोवतालच्या परिसराबद्दल समाजाबद्दल माहीती असावी. प्राथमिक स्थाईत परिसर विज्ञान, उच्च प्राथमिक स्थाईत सामाजिक अध्ययन,जीवसास्त्र या नावाखाली परिसराचा अभ्यास करायचा आहे.नुकताच अभ्यास क्रमात बदल झाला असला तरी निर्बंध मोफत विद्या हक्क कायदा 2009 अनुसार याची पुनर्ररचना करण्यास भाग पडले आहे.

नेशनल करीकुलम फ्रेमवर्क 2005 (NCF), निर्बंध मोफत विद्या हक्क कायदा 2009च्या मार्गदशनानुसार व राज्य विद्या प्रणालीका परिधीपत्र 2011 (SCF) नुसार तयार करण्यात आला आहे. यानुसार वर्गवारी साध्य करायचे कौशल्य ठरविण्यात आले आहेत. या कौशल्यांना साध्य करण्यासाठी जातीय विद्या ,परिशोधन,शिक्षन संस्था (NCERT), राष्ट्र विद्या प्रमान, सिल्याबस यांना दृष्टीत ठेऊन तीसऱ्या वर्गाचे परिसर विज्ञान पुस्तक **"आपण-आपला परिसर"**या नावाने तयार करण्यात आला आहे.

या पाठ्यपुस्तकात कुटुंब,कुटुंबामधील संबंध, खेळ,प्राणी,वनस्पती,आहार,पाणी,निवारा,प्रवास,आपले गाव,गावात तयार होणाऱ्या वस्तू,अशा अनेक अंशाना निवडून 16 धडे तयार करण्यात आले आहेत.सर्व प्रांतातील विद्यार्थ्याला समजेल अशा सरळ भाषेत, खऱ्या चित्राने पुस्तक तयार करण्यात आले आहे. मुलांत असणारे नैसर्गीक कुतुहल, जिज्ञासा,प्रश्न विचारण्याचा गुण हे कायम ठेवण्यासाठी अभ्यास,कृत्य दिले आहेत. प्रत्येक पाठात मुले स्वतः समाचार गोळा करुन ज्ञान निर्माण करण्या योग्य परिशीलन (निरीक्षण) अन्वेशन, समाचार कौशल्याशी संबंधीत कृत्य, प्रकल्प कार्यासारख्या अभ्यासाचा समावेष करण्यात आला आहे. निरंतर समग्र मुल्यांकनास दृष्टीमध्ये ठेवून, कृत्य अभ्यास प्रश्नाला प्रत्येक धड्यात समाविष्ट करण्यात आले आहे. धड्याच्या शेवटी **'हे करा'** नावाने अभ्यास दिलेला आहे. यात विषय आकलन, चित्र काढणे, रंग भरणे, समाचार कौशल्य, प्रकल्प कार्य, कैतुक करणे, प्रश्न विचारणे अशा कौशल्यांना साध्य करण्यासाठी लोगोसह अभ्यास दिलेला आहे. त्याच प्रमाणे पाठ्यांशासी संबंधीत महत्वाच्या शब्दांना **'महत्वाचे शब्द'** या नावाखाली समाविष्ट करण्यात आले आहे. धड्यातील महत्वाच्या मुद्दांचा सराव करण्यासाठी **'आपण हे शिकलो'** या या शीर्षकाखाली समाविष्ठ करण्यात आले आहे. विद्यार्थी स्वतःहून अंदाज लावावा, या उद्देशाने **'मी हे करु शकेन का?'** या नावाखाली स्वयंमुल्यांकन अभ्यासास सुध्दा समाविष्ट करण्यात आले आहे.

हे पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांना थेट माहीती न देता, ते स्वतः माहीती गोळा करतील यावर भर देण्यात आला आहे. यासाठी मित्रासोबत, शिक्षकासोबत, पालकासोबत, समाजाच्या सदस्यासोबत, चर्च करण्यायोग्य वर्गातील कृत्य,गटकृत्य,व्यक्तीगत कृत्य दिलेले आहेत. परिसराबद्दल माहीती मिळविण्यासाठी विद्यार्थी परीसरात जावून अभ्यास केल्यावरच त्यात असलेले साम्य,भेद लक्षात येतात. समाजातील,परिसरातील विभीन्नतेला एक सोपा मुद्दा म्हणून प्रश्न विचारु शकतो. आवश्यकतोनुसार स्वतःत बदल करु शकतो

यासाठी शिक्षकांनी शिक्षण साहीत्य, अध्यापणाच्या पध्दती ठरवून अमल बजावनी करतील यामुळे विद्यार्थ्यात प्रक्रिया कौशल्याचा विकास होवून अभ्यासाबद्दल आतुरता वाढेल. अशी आशा करीत आहोत.

या पुस्तकाच्या रुपकल्पनेत भाग घेतलेले शिक्षक,लेक्चरर,चित्रकार,विषयतज्ञ, डी.टी.पी. ले-आवूट करणाऱ्यास, पाठ्यप्रणालीका विभागाच्या सदस्यांचे हार्दिक अभिनंदन. पाठ्यपुस्तकास सुंदर, आकर्षक, विद्यार्थ्यात प्रक्रीया कौशल्याचा विकास होईल अशा पध्दतीने मार्गदर्शन केलेल्या सर्व विषय तज्ञांचा विशेष आभार. संपादक वर्गाला सुध्दा धन्यवाद. भाषेशी संबंधीत सुधारणा केलेल्या श्री पोरंकी दक्षीनामुर्ती, सेवानिवृत संचालक, तेलुगू अकादमी हैद्राबाद यांचा विशेष आभार. हे पाठयपुस्तक भावी अभ्यासासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करेल अशी आशा करते.

**श्रीमती बि.शेषुकुमारी**
संचालक
राष्ट्र विद्या, परिशोधन,शिक्षण संस्था,ते.रा, हैद्राबाद

दिनांक : 27-03-2012
स्थळ : हैद्राबाद

SCERT TELANGANA



तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

# आपले राष्ट्रगीत

- रविंद्रनाथ टागोर

जन-गण-मन अधिनायक जय हे
भारत भाग्य विधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंगा ।
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग ।
तब शुभ नामे जागे ।
तब शभ आशिष मागे ।
गाहे तव जय गाथा ।
जन गण मंगल दायक जय हे
भारत भाग्य विधाता ।
जय हे । जय हे । जय हे ।
जय, जय, जय, जय हे

# प्रतिज्ञा

- पैडिमर्री व्यंकटा सुब्बाराव्

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे` प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृध्द आणी विविधतेने नटलेल्या परंपरंचा मला अभिमान आहे. या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझा पालकांचा, गुरुजनांचा आणी वडीलधा-या माणसांचा मान ठेवीन आणी प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणी माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतीज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणी त्यांची समृध्दी हयातच माझे सौख्य समावले आहे.



SCERT TELANGANA

# रूपकल्पनेत सहभाग

**श्री सुवर्ण विनायक,** को-ऑर्डीनेटर
विद्याप्रणालीका,पाठ्यपुस्तक विभाग
राष्ट्रविद्यापरिशोधन, शिक्षण संस्था,आं.प्र.,हैद्राबाद

**श्री के.लक्ष्मीनारायण**
लेक्चरर ,जिल्हा विद्या शिक्षण संस्था,
अंगलूरु, कृष्णा जिल्हा

**बि.रामकृष्ण,** स्कूल असीस्टेंट
GGHS नल्लागुट्टा, (न्यु) सिकींद्राबाद,हैद्राबाद

**सी.जगन्नाथ,** एस.जी.टी.
GHS कुल्सूंपुरा, हैद्राबाद

**श्री इ.डि.मधुसुधन रेड्डी,** स्कूल असीस्टेंट
ZPHS. (Boys), कोग्सी, महबूबनगर

**श्री के.वि.सत्यनारायण** ,एम.आर.पी.,
गरीडेपल्ली मंडळ, नलगोंडा जिल्हा

**श्री शेख ब्रम्हजी शाह,** एस.जी.टी.
PS चिन्नताल्लपालेम, रामचंद्रपुरम मंडळ,
पूर्व गोदावरी जिल्हा

**श्री मेधा हरीप्रसाद,** स्कूल असीस्टेंट
ZPHS आकुमल्ला,संजामल मंडळ,कर्नूल जिल्हा

**श्री पि. रथंगपाणि रेड्डी ,** स्कूल असीस्टेंट
ZPHS पोलकम पल्ली,अड्डाकल मंडळ
महबूबनगर

**श्रीमती वंगीपुरम स्वर्णलता,** स्कूल असीस्टेंट
ZPHS,पात पट्टीनम, पश्चीम गोदावरी जिल्हा

**श्रीमती पी. परमेश्वरी, एस.जी.टी.**
**एम.पी.यु.पी.एस. थक्कालापल्ली, चिंतापल्ली मंडळ, नलगोंडा जिल्हा**

**श्री के.उपेंदरराव ,** एस.जी.टी.
PS पिर्यातांडा,तुर्कमपल्ली मंडळ,नलगोंडा जिल्हा

**कुमारी शालीनी**
विद्या भवन सोसायटी, उदयपूर

**श्री ए.महेंदर रेड्डी**
LFL HM,प्राथमिक शाळा
सोमनगूर्ती,रंगारेड्डी जिल्हा

**डॉ.आर.सतिश बाबू**
PS बुर्कापिट्टा तांडा, सुर्यापेट मंडळ,
नलगोंडा जिल्हा

## समन्वयकर्ते

**श्रीमती डि . विजयलक्ष्मी**
लेक्चरर, राष्ट्रविद्यापरिशोधन, शिक्षण संस्था,
ते.रा,हैद्राबाद

**श्री पि.रथंगपाणि**
स्कूल असीस्टेंट, ZPHS पोलकमपल्ली,अड्डाकल(मं)
महबूबनगर जिल्हा

## चित्रकार

**श्री कुरेल्ल श्रीनिवास,** स्कूल असीस्टेंट तेलुगू, जि.प.उ.पा.पोचंमपल्ली,नलगोंडा जिल्हा
**श्री बि.किशोर कुमार,** एस.जी.टी.अल्वाल अनुमल मंडळ, नलगोंडा जिल्हा
**श्री सय्यद अहमदुल्ला** ड्राइंग टिचर, शा.प्रा.शाळा,काजीपेट, वरंगल जिल्हा

## मराठी अनुवादासाठी

समन्वयकर्ता : ***श्री. सत्य नारायण रेड्डी***, M.Sc., M.Ed, Principal Govt.DIET.आदिलाबाद
मराठी अनुवादक: ***श्री गणेश सूर्यवंशी***,M.Sc., B.Ed,स्कूल असीस्टेंट,Govt.UPS.OBS.,आदिलाबाद
**संगणक चालक : *श्री.* राजेश दानका, (आदित्या डि.टी.पी.सेंटर आदिलाबाद)**

SCERT TELANGANA

# शिक्षकांसाठी सूचना

- विद्यार्थी त्याचा परीसराला समजून घ्यावा. त्या परिसरात मिळून जावा. म्हणून त्याच्या परिसरांचे निरीक्षण करणे व अन्वेषण करण्याद्वारे परीसराबद्दल माहीती मिळावी म्हणून प्राथमिक स्थाईत परिसर विज्ञान पाठ्यपुसस्तकास **आपण - आपला परिसर असे नाव ठेवले आहे.**
- जातीय विद्या,परिशोधन,शिक्षण संस्था (NCERT) **व** आपल्या राज्याच्या परिस्थीला अनुसरुन अभ्यासक्रमाचे धडे तयार करण्यात आले आहेत.
- आपले कुटुंब, कुटुंबातील सदस्यांचा संबंध, काम, खेळ,प्राणी, आहार कपडे,निवास, प्रवास,पाणी, तयार करणाऱ्या वस्तू,असा गावाशी मर्यादीत पाठ्यांश तयार करण्यात आला आहे.
- या पुस्तकात एकून 16 धडे आहेत.यांना चार युनीटमध्ये विभागले गेले आहे. पहील्या युनीटमध्ये 3 धडे, दुसऱ्या युनीटमध्ये 5 धडे, तीसऱ्या युनीटमध्ये 5 धडे, चौथ्या युनीटमध्ये 3 धडे आहेत.
- प्रत्येक धड्यात विद्यार्थ्यांना सहजपणे समजावे म्हणून चित्र दिलेले आहेत.प्रत्येक धडा दैनंदीन जीवनातील गोष्टीवर,संघटनेवर,किंवा विद्यार्थ्याच्या परिचीत विषयाने सुरु होतो.म्हणून यासाठी अनुभवाने धडा सुरु करावा.
- प्रत्येक धड्यात विद्यार्थ्यांना सहजपणे समजावे म्हणून चित्र दिलेले आहेत.प्रत्येक धडा दैनंदीन जीवनातील गोष्टीवर,संघटनेवर,किंवा विद्यार्थ्याच्या परिचीत विषयाने सुरु होतो.म्हणून यासाठी अनुभवाने धडा सुरु करावा.
- कोणत्याही धड्याबाबत शिकवितांना त्या धड्याबद्दल विद्यार्थ्यांना बोलते करावे. त्यांच्या अनुबवाबद्दल चर्चा करावी. या संबंधीत प्रश्न विचारुन धडा सुरु करावा.
- या पुस्तकात विद्यार्थी निरिक्षण करतील मित्र/ कुटुंब सदस्य / वयस्क / समाजातील नागरीकाकडून समाचार गोळा करण्यायोग्य, गोळा केलेल्या समाचारास तक्ता रुपात तयार करण्या योग्य, मित्राशी चर्च करण्या योग्य, छोटेछोटे प्रयोग, अन्वेषण, प्रकल्प कार्य असलेले धडे आहेत.
- हे पाठ्यपुस्तक मुख्यत: विद्यार्थ्यात प्रक्रीया कौशल्याचा विकास करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेले आहेत. म्हणून वर्गात गटात करायचे, व्यक्तीगत करायचे कृत्य दिले आहेत.यास करण्यायोग्य लोगोसुध्दा दिले आहेत. यास आवश्यक सामुग्रीच्या मदतीने शिकवावे.
- हे पाठ्यपुस्तक मुख्यत: विद्यार्थ्यात प्रक्रीया कौशल्याचा विकास करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेले आहेत. म्हणून वर्गात गटात करायचे, व्यक्तीगत करायचे कृत्य दिले आहेत.यास करण्यायोग्य लोगोसुध्दा दिले आहेत. यास आवश्यक सामुग्रीच्या मदतीने शिकवावे.
- प्रत्येक धड्याच्या शेवटी महत्वाचे शब्द दिलेले आहेत. ते त्या पाठाशी संबंधीत महत्वाचे शब्द आहेत. पुर्ण धडा झाल्यावर महत्वाचे शब्द विद्यार्थ्यांना समजले की नाही ते पहावे. तसेच आपण **हे शिकलो** या शिर्षकाखाली धड्यातील मुख्यांश दिलेले आहेत.यांना मुलांकडून वाचून घ्यावे. हे सरावाच्या उद्देशाने दिलेले आहेत.
- **धड्याच्या शेवटी मी हे करु शकेन काय? या शीर्षकाखाली अभ्यास दिलेला आहे.त्यातील अंशांना विद्यार्थी स्वतःहून ओळखतील त्यातील 80% टक्के गोष्टी विद्यार्थी करीत असतील तरच पुढचा धडा सुरु करावा.**
- **समग्र मुल्यमापणाला दृष्टीमधे ठेवून प्रत्येक धड्यात प्रश्न कृत्य, अभ्यास समाविष्ट केलेले आहेत. तसेच मी हे करु शकेन काय?नावाच्या मुल्यांकन अभ्यासाचा उद्देश सुध्दा हाच आहे. प्रत्येक धडा पूर्ण झाल्यावर यासाठीच तयार केलेल्या विशेष रजीस्टरमध्ये याची नोंद करावी.**
- **जुलै, सप्टेंबर, डिसेंबर, फेब्रूवारी महीण्यात युनीट परीक्षाच्या प्रगतीची, तसेच आक्टोबर, जानेवारी, एप्रील महीण्यात टर्म परीक्षेच्या प्रगतीची नोंद घ्यावी.**

# वर्ग ३ रा परिसर विज्ञान - पाठ्यक्रमातील अंश

| | |
|---|---|
| 1. कुटुंब, कुटुंबातील सदस्य, मित्र त्यामधील संबंध | कुटूंबातील सदस्य, सारखेपणा, चेहऱ्याचे आकार, कुटुंबाचा इतीहास, कुटुंबाचे प्रकार |
| 2. काम, खेळ | कुटुंबातील सदस्यांचे कार्य, एकमेकास सहकार्य करणे, गावात काम करणारे लोक, वृद्ध व इतर. त्यांची आवश्यकता, काम करणारे मुलं |
| | खेळाचे प्रकार, खेळाची गरज, वस्तूने खेळायचे खेळ, वस्तूविना खेळायचे खेळ, व्यक्तीगत खेळायचे खेळ, गटात खेळायचे खेळ,खेळाचे नियम, क्रीडा स्फूर्ती |
| 3. प्राणी | आपल्या परिसरातील प्राणी, पक्षी व त्यांचे निवास स्थान, पाळीव प्राणी, स्थलांतरीत पक्षी, कोणते पक्षी कसे जातात? प्राण्याची दया, किटक व त्यापासून तोटे व फायदे |
| 4. झाडे (वनस्पती) | विविध प्रकारची झाडे, घरात वाढणारी झाडे, त्यापासून उपयोग, आपण झाडे का वाढवावीत? आपल्या परिसरात न वाढणारी झाडे, जल वनस्पती, वाळवंटीय वनस्पती |
| | पानाचे प्रकार (आकार,पानाच्या कडा, पानाचे टोक,रंग), पाने गळणे, पानांचा आहार म्हणून वापर,पानाने विविध आकार तयार करणे, पानाचा खेळ खेळणे, कंपोष्ट खताचा खड्डा. |
| 5. आहार | आपण अन्न का खावे? आहार कुठून भेटतो? शिजवून खायचा आहार, कच्चा आहार, शिजविण्याच्या पध्दती, भांड्यांचे प्रकार व त्याचा उपयोग |
| | विविध भागातील आहार सेवनाच्या सवयी, प्राणी पक्षाच्या आहार सेवनाच्या सवयी, मिळून जेवण केल्याने होणारा लाभ, वयानुसार आहाराच्या सवयी. |
| 6. आपले गाव, नकाशा कौशल्य | गाव, गावातील संस्था,- उपयोग, गावाचे दळनवळन, गावातील लोकांचे काम |
| | नकाशाचे आकलन, नकाशात चिन्हाची आवश्यकता, नकाशा काढण्याची पध्दत, नकाशाद्वारे माहीती मिळविणे, वर्गाचा, शाळेचा, गल्लीचा नकाशा काढणे |
| 7.. निवारा (निवास) | घराची आवश्यकता, तात्कालीक निवास, विविध प्रांतातील घरे,अपार्टमेंट,घराचा छत(छप्पर) |
| | घराला सजविण्याची पध्दत, स्वच्छ घर, घरात फुलझाडांची वाढ करणे, घर सुंदर ठेवण्यास मदत करणे, आपले काम आपणच करणे, स्वच्छ घर, व्यर्थ पदार्थ कचऱ्याच्या कुंडीत टाकने. |
| 8.. आपण तयार करतो त्या वस्तू, कपडे | विविध प्रकारच्या मातीच्या बाहूल्या, मातीने तयार केलेले भांडे, त्याचे उपयोग, मातीच्या मुर्त्या, मडके तयार करणे, मातीच्या भांड्यांचा कमी वापर, मातीने मुर्त्यांची तयारी, |
| | कपड्याची आवश्यकता, कपड्याचे प्रकार, मुले घालायचे, मोठी मानसं घालायचे कपडे, स्त्रिया पुरुषाचे कपडे, काळानुसार घालावयाचे कपडे, कापड, सांप्रदाय, शिवून घ्यायचे कपडे, रेडीमेड कपडे, वृत्तीनुसार कपडे, धुतलेले कपडे घालने, कपड्यावर डिझाइन काढणे, |
| 9. पाणी | पाण्याची आवश्यकता, पाण्याचे श्रोत, पाण्याची किंमत, मानवाला, प्राण्यांला, वनस्पतींना पाण्याची आवश्यकता, अस्वच्छ पाणी, स्वच्छ पाणी, चांगल्या सवयी, पाण्याची टंचाई, पाण्याची बचत. |
| 10. प्रवास | प्रवास, प्रवासासाठी वाहणांची आवश्यकता, दूर, आवश्यकतेनुसार प्रवास साधनांचा उपयोग, प्रवास साधनांचे वर्गीकरण, प्रवासात अपघात |

SCERT TELANGANA

# या पाठ्यपुस्तकाद्वारे साध्य करायचे कौशल्य

**वर्ग 3 रा "आपण-आपला परिसर "** नावाच्या पुस्तकाद्वारे साध्य करावयाचे विद्याप्रमाण खालील प्रमाणे आहेत. यांना शैक्षणीक वर्षात साध्य करायचे आहे. म्हणून पुस्तकातील धडे या कैाशल्यांना लक्षात ठेवूनच शिकवावे.

**प्रक्रीया कैाशल्य :** निरिक्षण करणे,साम्य भेद सांगणे, वर्गीकरण करणे, समाचाराचा तक्ता तयार करणे, विश्लेषन करणे, कारणे सांगणे, प्रयोग करणे, निर्णय घेणे सारख्या कौशल्याचा सर्व विद्यार्थ्यात विकास करणे

(1) **विषय आकलन :** या पाठ्यपुस्तकातील 16 धड्याशी संबंधीत विविध विषयाला मुले समजून घ्यावीत. त्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करावीत. विषय आकलन करावेत. उदाहरण देने, साम्य भेद सांगणे, वर्गीकरण करणे, वर्णन करणे, कारणे सांगणे हे सर्व करु शकावेत.

(2) **प्रश्न विचारणे, परिकल्पना करने :** विद्यार्थ्यांनी पाहीलेल्या, ऐकलेल्या,प्रसंगाला,संघटनेला, परिसराविषई प्रश्न विचारावेत

(3) **प्रयोग करुन पाहणे,सांगणे :** विद्यार्थी छोटेछोटे प्रयोग करुन विषय आकलन करुन वर्णन करावेत. त्यांनी प्रयोग कसा केला, प्रयोगात काय काय साहीत्य वापरले ते क्रमात सांगू शकावेत.

(4) **समाचार कौशल्य- प्रकल्प कार्य :** विद्यार्थी दुसऱ्याला बोलण्याने, पाहण्याने,वाचण्याने समाचार गोळा करावेत. असा गोळा केलेला समाचार कोष्टकाच्या रुपात लिहावेत. समाचाराचे कोष्टक पाहून त्याचे विश्लेषन करावेत, निर्धारन, सामान्य विधान करावेत. शाळेत दिलेल्या प्रकल्प कार्यात भाग घ्यावेत. प्रकल्प कार्याला करुन त्यास वर्गात प्रदर्शीत करु शकावेत.

(5) **चित्र काढणे,रंग भरणे, नकाशा कौशल्य :** विद्यार्थी चित्र काढून विषयाचे वर्णन करु शकावेत. यासाठी धड्याशी संबंधीत चित्र काढणे, त्यात रंग भरता यावे. तिसऱ्या वर्गाचे विद्यार्थी त्यांच्या वर्गाचा,गल्लीचा,गावाचा, नकाशा काढावेत. नकाशात असलेल्या चिन्हाद्वारे माहीती मिळवावेत.

(6) **कौतूक करणे :** विद्यार्थ्यात आवडी निवडीची वाढ करावी. प्राणी,पक्षी, वनस्पती, त्यांच्या सभोवताली असलेल्या समाजातील व्यक्तीमध्ये असलेला चांगुलपणा,महत्व ओळखावेत. कौतूक करु शकावेत. दया, सहकार्य,सहानुभूती, मिळून काम करण्याचे गूण विकसीत व्हावेत. सोबर्तीना प्रश्न विचारता यावेत. समाजात,परिसरातातील विविधतेला ओळखून त्याचे कौतूक करता यावे. विभीन्न आहाराच्या सवयी, जीवन पध्दती, संस्कृतीतील महानतेचे कौतूक करता यावे. व्यक्तीगत स्वच्छता,आरोग्य विषयक सवयी लागाव्या. स्वतःची कामे स्वतःच करणे, कुटुंबातील वयस्कांना, विशेष गरजूंना आवश्यक ती सहायता करावी.

SCERT TELANGANA




# अनुक्रमणिका





| | | | |
|---|---|---|---|
| 1. | कुटुंब | जून | 1 |
| 2. | कोण काय काम करतो? | जून | 12 |
| 3. | खेळ खेळू या ! | जुलै | 20 |
| 4. | प्राणी - त्यांचा निवास | जुलै | 27 |




| | | | |
|---|---|---|---|
| 5. | आपल्या सभोवतालची झाडे | ऑगष्ट | 39 |
| 6. | पानांचा अनुबंध | ऑगष्ट | 48 |
| 7. | आपण घेतो तो आहार | सप्टेंबर | 59 |
| 8. | आपल्या आहाराच्या सवयी | सप्टेंबर | 70 |
| 9. | आपले गाव | आक्टोबर | 78 |
| 10. | घरांचे विविध प्रकार | नोव्हेंबर | 86 |
| 11. | स्वच्छ घर-सुंदर घर | नोव्हेंबर | 94 |
| 12. | मातीचे मोती | डिसेंबर | 101 |
| 13. | रंगीबेरंगी कपडे | डिसेंबर | 108 |
| 14. | मी इथे तुम्ही कुठे? | जानेवारी | 115 |




| | | | |
|---|---|---|---|
| 15. | पाणी - आपल्या गरजा | फेब्रुवारी | 123 |
| 16. | गावाला जावू या । | फेब्रुवारी | 134 |
| | उजळणी | मार्च | |


SCERT TELANGANA

# 1. कुटुंब





रमा : आजोबा या फोटोमधले उंच दिसणारे कोण आहेत?

आजोबा : तुझे वडील श्रीनिवास.

रमा : लंगा,ओडणी नेसलेली कोण आहे?

आजोबा : ओळखलं नाहीस? ती तुझी आत्या आहे, सुजाता

रमा : ते वेंकट काका आहेत ना?

आजोबा : होय, छान ओळखलीस

रमा : ते काका आता कुठे राहतात?

आजोबा : हैद्राबादमध्ये राहतो.

रमा : हैद्राबादमध्ये का राहतात आजोबा?

आजोबा : नौकरी करण्यासाठी.



कुटुंबात कोणकोण आहेत?

................................................

................................................

................................................


................................................

................................................

................................................

................................................

SCERT TELANGANA




साधारणतः कुटुंबात आई, बाबा,आजोबा,आजी, मुलंबाळं असतात. नौकरीच्या किंवा शिक्षणाच्या निमीत्ताने काहीजन कुटुंबापासुन दूर राहतात.

सर्व कुटुंब एकाच प्रकारची नसतात. काही कुटुंबात आई,बाबा,मुलं बाळं राहतात. तर काही कुटुंबात त्यांच्यासोबत आजोबा,आजीसुध्दा राहतात.

रमाच्या कुटुंबात कोणकोण आहेत ते पाहू या का ? रमाच्या आजोबाचे नाव रंगय्या, आजीचे नाव गंगम्मा आहे. रमाच्या आजोबाला दोन मुलं व एक मुलगी आहे.

**खालील चित्र पहा.**





SCERT TELANGANA




**कोणाचे कोण आहे ते लिहा.**

1. श्रीनिवासला गंगम्मा .................................  2. रंगय्याला अनुराधा ..............................
3. सुनिलला श्रीनिवास ............................  4. रमणाला अखिला ..............................
5. ललीताला सुजाता ............................  6. रमाला श्रीनिवास ..............................
7. रमणाला लता ..............................  8. अखिलला प्रसाद ..............................
9. रंगय्याला सुनिल ..............................  10. सुजाताला रमणा ..............................





**रमाची आई,बाबा,आजोबा,आजी यांची नावे माहीत केलात ना? आता तुमच्या कुटुंबातील आई,बाबा,आजोबा,आजी,भाऊ,बहीन यांची नावे लिहा.**





वर दाखविल्याप्रमाणे कुटुंबातील सदस्यांची नावे, पुर्वजांच्या माहितीच्या कोष्टकाला **वंशवृक्ष म्हणतात.**

## सारखेपणा :



*रमाच्या लहान मावशीला बाळ झाले. बाळाला बघायला सर्व नातेवाईक आले.*





SCERT TELANGANA

साधारणपणे कुटुंबातील मुलंमुलीं आई,बाबा, आजी,आजोबा, मावशी, मामासारखी असतात. तर काहीजन कुटुंबातील कुणासारखेच दिसत नाहीत. आपण आपले शरीर जसे आहे तसे मान्य करायचे आणि त्याचे रक्षण करायचे.



## बरोबर उत्तराला खुण करा:-

1. जर एखाद्या अनोळखी व्यक्तिने तुम्हाला मिठाई दिली तर घ्याल का? हो / नाही
2. तुम्ही अनोळखी व्यक्ति बरोबर कुठे जाणार का? हो / नाही
3. जर तुम्हाला कोणी त्रास दिला तर तुम्ही मोठ्यांना सांगाल का? हो / नाही

कुटुंबातील वेगवेगळ्या व्यक्तिंचे वेगवेगळे स्वभाव असतात. कधी-कधी आपल्याला राग आल्यावर, आपण दुसऱ्यांच्या मनाला दुखवणारे शब्द वापरतो. अशामुळे समस्या सोडवली जात नाही. ह्याऐवजी आपल्याला राग का आला, हे आपण त्या व्यक्तिला सांगू शकतो. आपल्याला जी परिस्थिती किंवा वागणुक आवडली नाही, ती आपण सांगू शकतो. आपण असला उपाय/मार्ग सुचवू शकतो ज्यामुळे दोघांना पण इजा, दुःख होत नाही.

तुमच्या कुटुंब सदस्यांचे तुम्हाला आवडणारे स्वभाव-गुण लिहा?




| नात | गुण-स्वभाव |
|---|---|
| आई | धीट |
| वडील | काळजी घेणारे |
| | |
| | |
| | |

## कुटुंबाचा इतीहास

रमाला शाळेत प्रवेश देण्यासाठी तीचे बाबा तिला शाळेत घेऊन आले. तिचे नाव प्रवेश पुस्तकात 'चिलकुरी रमा'असे लिहायला सांगीतले. 'चिलकुरी' हे आडनाव कसे आले? असे मुख्यध्यापक साहेबांनी विचारले. आमचे पुर्वज चिलकुरीहून आल्यामुळे हे नाव पडले असे तिचे बाबा म्हणाले.

SCERT TELANGANA





रमाचे आजोबा गावातील सर्वांना कठीन परिस्थितीत मदत करतात  म्हणुन सर्वजन त्यांचा सन्मान करतात. आजोबामुळे त्यांच्या कुटुंबाला चांगले नाव मिळाले. रमाचे बाबा कपड्याचा व्यापार करतात. त्यांचे पण कपड्याचे चांगले व्यापारी म्हणुन नाव आहे. रमाचे आडनाव, तिचे आजोबा यांच्या इतीहासाबद्दल माहिती मिळवीली ना !


तुमच्या कुटुंबाच्या इतिहासाबद्दल तुमच्या घरच्या वृध्द मानसांना विचारा. तुमच्या वर्गातील मित्रांचे आडनाव कसे पडले. चर्चा करा.



## कुटुंबांचे प्रकार




SCERT TELANGANA





माझे नाव शिवा आहे.आमच्या घरात आई,बाबा,आजोबा,आजी,काका,काकू,भाऊ, ताई,बहीण राहतात.

- कुणाच्या घरी जास्त माणसं आहेत? कुणाच्या घरी कमी माणस आहे?
- कुणाकुणाच्या घरात म्हातारी मानंसं आहेत?.
- तुम्हाला कोणकोणत्या प्रकारचे कुटुंब माहित आहे?
- तुमचे कुटुंब कोणत्या प्रकारचे आहे.?
- डेविड हसिना आणि शिवाचे कुंटुंब कोणत्या प्रकारचे आहे?
- तुमच्या नाते-वाईकांना काय म्हणुन बोलावता ते सांगा? कुटुंबात तुमचे आपापसात काय नातं आहे?


SCERT TELANGANA



## खेळ खेळू या का?



- तुम्ही सर्वजन गोल उभे रहावे.
- तुमच्यापैकी एकाचे डोळे रुमालाने बांधावे.
- डोळे बांधून असलेल्याने बाकीच्या मित्रांना धरावे त्यांचे नाव ओळखावे.
- नाव बरोबर ओळखल्यास त्याच्या डोळ्याचा रुमाल सोडावा.
- अशाप्रकारे एकानंतर एक डोळ्याला रुमाल बांधून खेळ सुरु ठेवावा.
- डोळ्याला रुमाल बांधून सर्वांना बिनचूक ओळखने शक्य आहे का? नाही तर का नाही?



## वृध्द व विशेष आवश्यकतेचे मुले


डोळे असून सुध्दा रुमाल बांधल्यामुळे सर्वांना ओळखु शकलो नाही. नाही का? मग डोळेच नसनाऱ्या मानसांना काम करायला किती त्रास होत असेल विचार करा.

### तुम्हाला माहीत आहे का?



डोळे नसनारे लोक वाचण्यासाठी ब्रेइली नावाच्या लिपीचा वापर करतात. या लिपीचा शोध लुइस ब्रेइली यांनी लावला.

SCERT TELANGANA



तसेच काही जनांना ऐकू येत नाही.. काही जनांना बरोबर बोलता येत नाही. काही चालू शकत नाहीत. अशा व्यक्तींना कशाप्रकारचा त्रास असतो? त्यांना आपण कशी मदत करु शकतो. विचार करुन सांगा.

## खालील चित्र पहा.



प्रत्येक वर्षी डिसेंबर 3 तारखेला जगभर विकलांग दिन म्हणून साजरा करतात.

- चित्रात कोणकोण आहेत?
- त्यांना कोणकोणती कामे करायला त्रास होत आहे?
- यांना कशाप्रकारची मदत हवी आहे?
- तुम्ही अशा व्यक्तींना कधी मदत केलात का? कशाप्रकारची मदत केलात?

डोळे नसणाऱ्यांना, शारिरीक अपंगांना, मुक, बधीर लोकांना आवश्यक ती सहायता करावी. बोलायला येत नसलेले व्यक्ती संकेतात बोलतात. बधीर कानामधे मशीन लावून ऐकतात, दृष्टीहीन व्यक्ती काठीने किंवा स्पर्शाने विषय ग्रहण करतात. तसेच वृध्द व्यक्तीसुध्दा त्यांची कामे स्वतः करु शकत नाहीत. म्हणुन आपण त्यांच्या आवश्यकतेनुसार त्यांना मदत करावी.

· तशाचप्रकारे वृद्ध माणसं सगळी काम स्वतःच करु शकत नाही. आपण त्यांच्या गरजांना ओळखून, समजुन त्यांना मदत करावे.

### तुम्हाला माहीत आहे का?



प्रत्येक वर्षी ऑक्टोंबर 1 तारखेला जगभर ज्येष्ठ नागरिक दिन म्हणुन साजरा करतात.

SCERT TELANGANA

## महत्वाचे शब्द

1. कुटुंब
2. वंशवृक्ष
3. आडनाव
4 पुर्वज
5. कुटुंबाचे सदस्य
6. ब्रेइली लिपी
7. वृध्द दिनोत्सव
8. नातेवाईक
9. सारखेपणा
10. कुटुंबाचा इतीहास
11. वृध्द
12.. विशिष्ठ गरजू विद्यार्थी

## आपण काय शिकलो

- साधारणतः कुटुंबामध्ये आई,बाबा, आजोबा,आजी व मुले असतात.
- अशा एकाच कुटुंबात राहात असणाऱ्या व्यक्तींना कुटुंब सदस्य म्हणतात.
- आई-बाबा, आजी-आजोबा, मुले व पुर्वज यांची माहीती देनारे वंशवृक्ष होय.
- कुटुंबातील मुलांमधे कुटुंबातील व्यक्तीचे,नातेवाईकाचे गुण दिसुन येतात.
- सर्वांचे चेहरे एकसारखे राहत नाहीत.
- आम्ही आमच्या गुणांमुळे आणि कौशल्यामुळे विशेष आहोत.
- प्रत्येक कुटुंबाचा एक इतिहास असतो. यालाच कुटुंबाचा इतीहास म्हणतात.
- कुटुंबाच्या सदस्याना अनुसरुन कुटुंबाचे प्रकार असतात. लहान, एकत्र किंवा मर्यादित कुटुंब
- आपण अशा व्यक्तिंना मदत करतो ज्यांना खरचं गरज आहे.

SCERT TELANGANA

## हे करा




### विषय आकलन

1. कुटुंब म्हणजे काय? तुमच्या कुटुंबात कोणकोण आहेत?
2. चंदू अन्नावरम गावात राहतो, तो तिसरीत आहे. त्याची आई कमला घरीच पेपर तयार करण्याचा लघू उद्योग करते. शिवाय गरजु महिलांना मदत करते. आदित्य, चंदूचा लहान भाऊ आहे. सुट्टीत दोघेही त्यांच्या रघू मामाच्या घरी गेले. त्यांची आत्या उषा, आजोबा गोपाळ, आजी लक्ष्मी देवी तिथेच राहतात. चंदू त्याची बहिण हेमा आणि भाऊ रवी सोबत खुप खेळ खेळला.

| नाव | चंदूशी नाते |
|---|---|
| आदित्य | भाऊ |
| कमला | ................................ |
| लक्ष्मी देवी | ................................ |
| रघू | ................................ |
| रवी | |
| उषा | ................................ |





3. तुमचे आडनाव काय आहे? ते नाव कसे पडले ते सांगा?

4. विशिष्ठ गरजू विद्यार्थ्यांना कशी मदत करावी?

अ) अंधळ्या विद्यार्थ्यांना करावयाची मदती :

ब) मुकबधीरांना करावयाची मदत:

क) मुक्यांना करावयाची मदत :

ड) चालता न येणाऱ्यांना करावयाची मदत

## समाचार कोशल्य- प्रकल्प कार्य



1. तुमच्या मित्राच्या घरी कोणकोण आहेत विचारुन खालील कोष्टकात लिहा.

| मित्राचे नाव | कुटुंबाचे सदस्य | कुटुंबातील सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| 1. उदाःमुरली | आई , बाबा, आजोबा, बहिणी, ताई, मुरली | 6 |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |
| 5. | | |
| 6. | | |
| 7. | | |
| 8. | | |
| 9. | | |


वरिल कोष्टकाच्या आधारे प्रश्नाची उत्तरे द्या.

- कुणाच्या घरी जास्त सदस्य आहेत?
- कुणाकुणाच्या घरी म्हातारी मानंसं आहेत?
- कुणाच्या घरी कमी सदस्य आहेत?

2. तुमच्या कुटुंबातील सदस्यांचे फोटो गोळा करुन अल्बम तयार करा. तुमच्या वर्गात सर्वांना दाखवून प्रत्येकाबद्दल सांगा.

SCERT TELANGANA







## चित्र काढणे, नमुना तयार करने, नकाशा कौशल्य

1. विभिन्न भावना दर्शविणारे विभिन्न चेहरे काढा?
2. तुमच्या पालकांचे चित्र काढुन नावे लिहा आणि रंग भरा?



## कौतूक करणे, मुल्य, नित्य जीवनात उपयोग

1. डोळयाला पट्टी बांधुन एक दिवस कल्पना करा तुम्ही शाळेला कसे जाल? मित्रा सोबत शिका आणि खेळा. याविषयी थोडक्यात लिहा?
2. तुमच्या कुटुंबाचा इतिहास, कुटुंबाची विशेषता सांगा?



## प्रश्न विचारणे

1. रमा आजोबाच्या घरी गेली.तिला त्यांच्या वंशवृक्षाबद्दल माहीती हवी होती. यासाठी तीने आजोबाला वेगवेगळे प्रश्न विचारले. तीने कोणकोणते प्रश्न विचारले असतील? आजोबा काय उत्तरं दिले असतील ? आडनावाबद्दल माहीती मिळविण्याठी तुम्ही कोणकोणते प्रश्न विचाराल?






### मी हे करु शकतो

| | | |
|---|---|---|
| 1. | कुटुंब म्हणजे काय सांगू शकतो. | होय / नाही |
| 2.. | कुटुंब सदस्यातील नाते सांगू शकतो. | होय / नाही |
| 3. | कुटुंबाचा वंशवृक्ष काढू शकतो. कुटुंबाचा इतीहास सांगू शकतो. | होय / नाही |
| 4. | कुटुंब सदस्याबद्दल माहीती कोष्टकात लिहू शकतो. | होय / नाही |
| 5. | वृध्द,विशिष्ट गरजु विद्यार्थ्यांना आवश्यक मदत करु शकतो. | होय / नाही |
| 6. | कुटुंबाच्या इतीहासाबद्दल, वंशवृक्षाबद्दल प्रश्न विचारु शकतो. | होय / नाही |

SCERT TELANGANA



# 2. कोण काय काम करतो ?



हे कमलाचे घर आहे कमलाच्या घरी तीची आई,बाबा,आजोबा,आजी,भाऊ राहतो. ते काय करत आहेत काळजी पूर्वक पहा.



कमलाचे आई-वडिल दोघेही घर कामात एकमेकांना मदत करतात. कमला आणि तिचा भाऊ आपल्या आई-वडिलांना मदत करतात. कमलाचे आजी-आजोबा स्वतःला घर कामात गुंतवतात याप्रमाणे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ति घर चालवण्यास मदत करतो.





कुटुंबामधे मोठी माणसं घरकामासोबत बाहेरची कामे सुध्दा करतात.शेतात, कारखाण्यात, घरबांधकामात, रस्ते बांधकामात, कार्यालयात अशी वेगवेगळी कामे करतात. घरातील मोठ्यांनी केलेल्या वेगवेगळ्या कामाने कुटुंबाला उत्पन्न होते.

तुमच्या घरामधे कोण कोणते काम करतो,ते खालील कोष्टकात लिहा

| कुटुंबातील सदस्यांची नावे | घरचे काम | उत्पन्नासाठी घराबाहेरचे काम |
|---|---|---|
| | | |



## एकमेकास मदत करणुनीदुनीदुनीटयुनीट

तुम्ही शिकलात की कुटुंबातील सदस्य कुटुंबामधे वेगवेगळी कामे असतात.कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती वेगवेगळी कामे करतात. तर काही कामे सर्वजन मिळून करतात.

**खालील चित्र पाहून कोण कोणती कामे करीत आहे ते सांगा.**





- दिलेल्या चित्रामध्ये स्त्री आणि पुरुष काम करीत आहे. वडिल स्वयंपाक करतात हे योग्य आहे का?
- तुमच्या कुटुंबात सुध्दा असेच एकमेकास मदत करतात काय?
- तुम्ही कोणकोणती कामे करता? कुणाला मदत करता?
- तुमच्या घरात तुम्ही कोणते काम सर्वजन मिळून करता.?

SCERT TELANGANA







## चर्चा करुन माहिती कोष्टकात लिहा.

तुमच्या वर्गातील सहा विद्यार्थ्यांना विचारा.त्यांचे आई,बाबा काय काम करतात? घरात सर्वजन मिळून कोणते काम करता? खालील कोष्टकात गोळा केलेली माहिती लिहा.

| मित्राचे नाव | आईचे काम | बाबाचे काम | सर्वजन मिळून करतो ते काम |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |
| 6. | | | |

- बहूतेकांची आई कोणते काम करते?

  ..........................................................................................................

  ..........................................................................................................

- बहूतेकांचे बाबा कोणते काम करतात?

  ..........................................................................................................


  ..........................................................................................................

- घरात सर्वजन मिळून कोणते काम करतात?

  ..........................................................................................................

  ..........................................................................................................


कुटुंबातील सर्व कामे सर्वजन मिळून करावेत. एकमेकांना मदत केल्यामुळे काम लवकर, सोपे होते. आणि एकमेकांना समजु शकतो.



## व्यवसाय

कुटुंबामधे आई,बाबा, सर्वजन वेगवेगळी कामे केल्याने आपल्या गरजा पूर्ण होता आपल्या कुटुंबाप्रमाणे खेडे गावात सुध्दा वेगवेगळी कामे करणारे लोक राहतात. त्याबद्दल तुम्हाला माहीत आहे काय?

SCERT TELANGANA



खेडेगावातील वेगवेगळे काम करणाऱ्याचे काही चित्रं दिल आहेत.त्यांच्यामुळे आपल्याला कोणता फायदा होतो ते सांगा.



ही सम्मक्का टोपले विणत आहे.



हा वेंकन्ना आहे. चप्पल बनवितो.



हा कोमरय्या, हजामत करतो.



हा शंकरय्या. सुतार काम करतो.

- तुमच्या गावात / शहरात सुध्दा असे कामं करणारे आहेत का?
- तुमच्या गावात / शहरात आणखी कोणकोणते काम करणारे माणसं आहेत.





## चर्चा करा !

तुमच्या गावात विविध कामे करणारी मानंसं असतात ना ! राजय्या रस्ते झाडतो व मोरी स्वच्छ करतो.राजय्या प्रमाणेच गावात कोणती कोणती माणसं आहेत? जे राजय्या प्रममाणेच वेगवेगळी कामे करतात त्यांनी त्यांचे काम न केल्यास काय होईल?

SCERT TELANGANA





गावात अनेक प्रकारची कामे करणारे लोक राहतात. सर्व कामे महत्वाची असतात.उत्पन्नासाठी कोशल्याने केलेल्या कामाला वृत्ती म्हणतात. सर्व वृत्तीचे लोक समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहेत.म्हणून सर्व वृत्तीकारांचा आदर केला पाहिजे.



## काम करणारे मुलंटुनटुन



ही कमल. कमलाला शाळेला जायला फार आवडते.पण आता ती शाळेत जात नाही. घरीच बहिणीला कडेवर घेवून सांभाळते. कमलाचे बाबा शेतात जातात आई मजुरी कामाला जाते. कमला घरचे काम करत घरीच राहते.कधी वेळ मिळाला तर तिचे जुने पुस्तकं काढुन वाचत बसते. जेव्हा ती शाळेत जाणाऱ्या मुलांना पाहते तेव्हा तिलाही शाळेत जावेसे वाटते.

शाळेत न जाता मुल कामाला गेल्याने काय तोटा होतो ?

शाळेत न जाणारे मुलं आपल्याला दिसल्यास आपण काय करावे ?

दररोज आई बडीलांनी मुलामुलींना शाळेत पाठवावे. शिक्षण घेणे हा त्यांचा हक्क आहे. म्हणुन सर्व मुले-मुली दररोज शाळेत जावेत.

## महत्वाचे शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | घरचे काम | 2. | घराच्या बाहेरचे काम | 3. | उत्पन्न |
| 4. | सहकार, मदत | 5. | व्यवसाय, काम, धंदा | 6. | मिळून करायची कामे |
| 7. | बाल श्रमिक | 8. | सर्व मुलं-मुली शाळेत जावेत. | 9. | गरजा |

## आपण काय शिकलो

- घरचे सर्व सदस्य घरी, घराबाहेर वेगवेगळे काम करत असतात.
- कुटुंबातील सर्व सदस्य मिळून घरची कामे करावीत.
- घरची मोठी मानसे बाहेर काम करतात म्हणुन उत्पन्न (रुपए) मिळते.
- सर्व वृत्तीच्या (काम) लोकांचा आदर करावा.
- गावात वेगवेगळी कामे करणारे लोक असतात.
- मुलांची योग्य जागा शाळेतच आहे, कामाच्या ठिकाणी नाही.
- घरकामात पालकांना मदत करावी..








SCERT TELANGANA

## हे करा



### विषय आकलन

1. कुटुंबातील व्यक्ती का काम करतात?
2. कुटुंबातील सर्वजन मिळून करता येणारे दोन काम लिहा..
3. खालील दिलेल्या कामापैकी उत्पन्न देणाऱ्या कामावर ◯ करा.


| | | |
|---|---|---|
| स्वयंपाक करणे | टोपली विणने | घर झाडणे |
| मडके बनविणे | कपडे धुने | शिक्षण देणे |
| भांडे धुने | फळे विकणे | शेत काम करणे |
| खेळ खेळणे | अभ्यास करणे | कपडे शिवणे |
| अंघोळ करणे | जेवन करणे | दूध विकणे |

4. तुमच्या गावात कोणकोणती कामे करणारी मानंसं आहेत?
5. खालील चित्र पहा. ते कोणती कामे करत आहेत? हे नसतील तर काय होईल?










### खालील चित्र काढून त्यात रंग भरा:- त्याचे वर्णन करा.




SCERT TELANGANA











## समाचार कौशल्य-प्रकल्प कार्य

1. वेगवेगळी कामे करणाऱ्या मानसांची माहीती गोळा करा. त्यांच्याबद्दल बोला.त्यांच्या फोटो गोळा करुन अल्बम तयार करा. वर्गात त्याचे प्रदर्शन करा?
2. तुमच्या मित्राचे आई वडील काय काम करतात त्यांना विचारुन माहीती खालील कोष्टकात लिहा.
3. तुमच्या भागातील शाळेत न जाणाऱ्या मुलांची नावे, कारणे विचारुन गोळा करा?


| क्र. सं. | मित्राचे नाव | आईचा व्यवसाय | वडीलाचा व्यवसाय |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |
| 6. | | | |
| 7. | | | |
| 8. | | | |
| 9. | | | |

SCERT TELANGANA




4. तुमच्या घरी खालील कोष्टकात दिलेली कामे कोण करतो त्याच्या खाली ✓ अशी खुण करा.

| कामाचे नाव | आई | बाबा | मी | भाऊ,दादा | ताई बहिन | आजोबा | आजी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घर झाडणे | | | | | | | |
| स्वयंपाक करणे | | | | | | | |
| पाणि भरणे | | | | | | | |
| कपडे धुणे | | | | | | | |
| शेत काम | | | | | | | |
| भाजी-पाला आणने | | | | | | | |
| दुकानातुन सामान आणणे | | | | | | | |



## कौतूक करणे

1. तुमच्या गावातील किंवा शहरातील विविध कामे करणारे लोक राहतात. त्यांचा मान राखावा.त्यांनी त्यांची कामे केली नाही तर काय होईल सांगा. लिहा.




## प्रश्न विचारने

1. शिवय्या त्याच्या गावातील लोहार आणि कुंभाराकडे गेला. आणि त्याच्या कामाबद्दल चौकशी केली, चौकशीच्या वेळी त्याने कोण-कोणते प्रश्न विचारले असतील?



## मी हे करु शकतो




1. कुटुंबातील सर्व व्यक्ती काम करण्याची आवश्यकता काय आहे? सांगू शकतो. होय/नाही
2. कुटुंबात सर्वांनी मिळून करायची कामे, व्यक्तीगत कामे ओळखून कोष्टक रुपात लिहू शकतो. होय/नाही
3. माझ्या मित्राचे आई-बाबा काय काय कामे करतात कोष्टक रुपात लिहू शकतो. होय/नाही
4. कामगार मुल-मुली कुठे दिसल्यास त्यांना शाळेत जायला सांगतो. होय/नाही
5. काही अवजारांचे वस्तुचे चित्र काढू शकतो. होय/नाही
6. विविध कामे करणाऱ्याजवळ जावून त्यांच्या कामाबद्दल प्रश्न विचारु शकतो. होय/नाही

SCERT TELANGANA





# 3. खेळ खेळू या !



मस्तान, रहीम, लता, कमला, जॉनी, गिरी खेळ खेळण्यासाठी मैदानावर गेले. तिथे अजून खूप मुले खेळत आहेत.ते वेगवेगळे खेळ खेळत आहेत.ते कोणकोणते खेळ खेळत आहेत पाहू या !



SCERT TELANGANA

- वरच्या चित्रात मुले कोणकोणते खेळ खेळत आहेत?
- तुम्ही पण हेच खेळ खेळता का? तुम्ही खेळणाऱ्या इतर खेळांची नावे लिहा?
- खेळ खेळायला सर्वांना आवडतात ! पण खेळ कशाला खेळावेत?

रिकाम्या वेळी खेळ खेळल्याने आपणास आनंद होतो. शरीराचा चांगला व्यायाम होतो. हाडे स्नायू मजबूत होतात. सहकार्य करणे, मिळून काम करणे, अशा सुगुणांचा विकास होतो.



## खेळ-खेळाचे प्रकार

रविवारी गिरी घरातच त्याच्या बहिण सोबत वेगवेगळे खेळ खेळला. मस्तान त्याच्या मित्रासोबत खेळ मैदानावर वेगवेगळे खेळ खेळला.

गिरी त्याच्या घरी कोणकोणते खेळ खेळला असेल? मस्तान मैदानावर कोणकोणते खेळ खेळला असेल? मित्रात चर्चा करुन खालील कोष्टक भरा.

| **घरात खेळायचे खेळ** | **मैदानावर / बाहेर खेळायचे खेळ** |
|---|---|
| | |




घरात खेळायचे खेळ, घराबाहेर, मैदानावर खेळायचे खेळ याचे कोष्टक तयार केलात ना तुमचे आजोबा,आजी, आई,वडील त्याच्या लहानपणी हेच खेळ खेळत होते का? त्यांनी खेळलेले खेळ कोणते होते? माहीत करुन लिहा.

| आता तुम्ही खेळता ते खेळ | आई-वडिल, आजी-आजोबा लहानपणी खेळलेले खेळ |
|---|---|
| | |





- तुमचे आजोबा-आजी,बाबा यांनी लहानपणी खेळलेले कोणते खेळ आता तुम्ही खेळत नाही?

SCERT TELANGANA






खालील चित्रांना पहा. हे खेळ खेळण्यासाठी कोणकोणत्या वस्तुंची गरज आहे ते लिहा. ते खेळ कुठे खेळतात? घरातच? घराबाहेर, मैदानात खालील कोष्टकात लिहा.

| खेळ | खेळ वस्तू |  कुठे खेळतात  |
| --- | --- | --- |
|  | | |
|  | | |
|  | | |
|  | | |
|  | | |
|  | | |
|  | | |

SCERT TELANGANA






## खेळाचे प्रकार

तुम्ही अनेक प्रकारचे खेळ खेळत असता! यापैकी काही खेळ एकटेच खेळतो तर काही खेळ काहीजन मिळून खेळतात. कांही खेळात जास्त खेळाडु लागतात अशाप्रकारच्या खेळांची चर्चा करुन खालील कोष्टकात लिहा.

| एकटेच खेळायचे खेळ | दोघे मिळुन खेळायचे खेळ | खूप मानंसं मिळुन खेळायचे खेळ |
|---|---|---|
| | | |

## क्रिडा उपकरणे / खेळ साहित्य

शिवा, निखिल, स्वेता, सलमा, मेरी, संकल्प आणि अजीत सायंकाळी क्रिकेट खेळायला गेले. सोबत बॅट, बॉल, विकेट घेवून गेले. असेच काही खेळ खेळायला खेळ सामग्री ची गरज आहे, नाही का? तसेच काही खेळ खेळण्यासाठी खेळ सामग्री ची गरज नाही. उदा. लपना-झपनीचा खेळ खेळायला काहीच लागत नाही.



अशाप्रकारे खेळ सामग्री आवश्यक असलेले खेळ कोणते? खेळ सामुग्री आवश्यक नसलेले खेळ कोणते? कोष्टकात लिहा.

| खेळ सामग्री नसलेले खेळ | खेळ सामग्री असलेले खेळ |
|---|---|
| | |

SCERT TELANGANA



## खेळाचे नियम

रामू, जॉनी, गोपी, श्रीनू, मुरली, श्रद्धा, मुमताज, जब्बार आणि मस्तान, कबड्डी खेळत आहेत. खेळतांना मधेच सर्वजन भांडण सुरु झाले. खेळात चूक झाल्यामुळे भांडण झाले. मुरली, जॉन,मस्तान, रुसून घरी निघून गेले आणि म्हणाले की ते आता खेळणार नाही.

### विचार करुन सांगा

- मुलांनी मधेच खेळ का बंद केला?
- खेळात भांडणे होऊ नये म्हणुन काय करावे?

### तुम्हाला माहीत आहे का?



काही खेळ प्राण्यांच्या मदतीने खेळतात.पोलो या खेळात खेळाडू घोड्यावर स्वारी करुन बॅटने बॉलला मारत खेळतात.

कोणतेही खेळ खेळायचे नियम असतात. खेळाच्या नियमानेच खेळ खेळावेत. मैदानावरील खेळाचे नियम पाळण्या बरोबरच वैयक्तिक शरीराच्या सुरक्षेचे नियम देखील पाळले पाहिजे. ह्या नियमांकडे दुर्लक्ष करु नये. नियम बाह्य खेळू नये. जिंकने, हारने यासी संबंध न ठेवता खेळ खेळणे महत्वाचे असते. आपण दररोज खेळ खेळावेत. खेळ खेळल्याने आपण निरोगी राहतो व मित्र वाढतात.



14 नोव्हेंबर, बालक दिना निमित्य सर्व मुलांना खेळाच्या स्पर्धा ठेवण्यात आल्या. गोपी धावण्याच्या स्पर्धेत प्रथम आला.शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी गोपीचे अभिनंदन केले.

- तुमच्या शाळेत चांगले खेळ खेळणाऱ्यांना कधी तरी अभिनंदन केलात काय?
- खेळात जिंकलेल्या खेळाडूला काय म्हणून अभिनंदन करतात?

### महत्वाचे शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | खेळाचे प्रकार | 2. | घरात खेळायचे खेळ | 3. | मैदानात खेळायचे खेळ |
| 4. | खेळ सामग्री | 5. | खेळाचे नियम | 6. | पळण्याची शर्यत |
| 7. | नियमांकडे दुर्लक्ष करु नये | 8. | दोघे मिळून खेळायचे खेळ | 9. | हारने, जिंकने |
| 10. | खेळ स्पर्धा | 11. | पोलो खेळ | 12. | खेळाडुंचे लक्षण |

SCERT TELANGANA


## आपण काय शिकलो?

- ★ खेळ खेळल्यामुळे आपण निरोगी राहतो. आनंद होतो. मैत्री वाढते.
- ★ खेळाचे प्रकार- एकटे खेळायचे खेळ, गटात खेळायचे खेळ, घरात खेळायचे खेळ, घराबाहेर खेळायचे खेळ
- ★ जुन्या आणि आजच्या खेळात खूप बदल झाला आहे. आज खूप नवे नवे खेळ आलेत.
- ★ काही खेळासाठी खेळ सामग्री आवश्यक आहे आणि काहींना नाही.
- ★ खेळात जींकने व हारने ला सारख्या दृष्टीने बघावे.
- ★ स्वतःच्या शरीराच्या सुरक्षतेची काळजी घेत खेळाच्या नियमाने खेळ खेळावे.

## हे करा



### विषय आकलन



1. खेळ का खेळावेत?
2. चेंडूने खेळायच्या काही खेळाची नावे लिहा..
3. खो खो खेळ व क्रिकेट खेळातील फरक सांगा. लिहा.
4.. तुम्ही घरी खेळता ते खेळ कोणते? ते कधी कधी खेळतात?
5. तुम्ही मैदानावर जे खेळ खेळता ते खेळ कोणते? ते कधी खेळतात?
6.. क्रिकेट, खो खो सारख्या खेळांना मैदानी खेळ का म्हणतात?
7.. स्वतःच्या शरीराच्या सुरक्षेचे नियम म्हणजे काय?



### समाचार कौशल्य-प्रकल्प कार्य

1. तुमच्या मित्रांना कोणकोणते खेळ आवडतात ते विचारुन खालील कोष्टकात लिहा.

| | मित्राचे नाव | आवडीचा खेळ |
|---|---|---|
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |

सर्वात जास्त जणांना आवडणारे खेळ कोणते?


2. वर्तमान पत्रातून वेगवेगळया खेळाशी संबंधीत चित्र गोळा करुन स्क्रॅप पुस्तकात चिटकवा.त्यांची नावे लिहा. ते खेळ खेळायला कोणती खेळ सामुग्री लागते ते लिहा.

SCERT TELANGANA

## चित्र काढून त्यात रंग भरा

1. खालील चित्र तुमच्या वहीत काढा व त्यास रंग भरा.







## कौतूक करणे

1. तुमच्या शाळेत उत्तम खेळाडू कोण आहे? त्यांनी खेळ जिंकल्यावर तुम्ही त्यांचे कौतुक कसे कराल?

2. खेळात जिंकलेल्या खेळाडूला पाहून आपण काय शिकले पाहिजे? तसेच हारलेल्या खेळाडूला पाहून काय शिकले पाहिजे?

## प्रश्न विचारने

1. मैदानावर मुले कबड्डी खेळत आहेत. इतक्यात त्यांच्यात भांडण सुरु झाले.इतक्यात तिथे गुरुजी आले.गुरुजींनी त्यांना काय विचारले असावे? मुलांनी काय उत्तर दिले असावेत. तुम्ही तिथे असतात तर कोणते प्रश्न विचारले असते?



## मी हे करु शकतो का?




| | | |
|---|---|---|
| 1. | विविध प्रकारच्या खेळाबद्दल माहिती सांगू शकतो. | होय / नाही |
| 2. | घरी खेळायचे खेळ, घरा बाहेर खेळायचे खेळ कोणते सांगू शकतो. | होय / नाही |
| 3. | कुणाला कोणता खेळ आवडतो याची माहिती गोळा करुन कोष्टकात लिहू शकतो.. | होय / नाही |
| 4. | खेळ सामुग्रीचे चित्र काढू शकतो. | होय / नाही |
| 5. | खेळाबद्दल प्रश्न विचारु शकतो. | होय / नाही |

SCERT TELANGANA

# 4. प्राणी-त्यांचा निवास




त्या दिवशी रविवार होता. महेश,कमला, लता, सलीम, डेविड मळ्यात गेले. मळ्याच्या बाजूलाच महेशचे शेत आहे. मळ्यात आणि शेतात त्यांनी अनेक प्रकारचे प्राणी व पक्षी पाहिले. खालील चित्र पाहून त्यांनी काय पाहिलेत ते सांगा.



- वरिल चित्रात कोणकोणते पक्षी-प्राणी आहेत?
- तुमच्या परिसरात तुम्ही कोणते पक्षी, प्राणी पाहिलात त्यांची नावे लिहा?


मळ्यात सर्वजन दुपार पर्यंत खेळले. महेश हात धुण्यासाठी तळ्याजवळ गेला. तळ्यात,तळ्याकाठी सुध्दा विविधप्रकारचे प्राणी होते.ते पाहून महेशने सर्वांना तळ्याजवळ बोलावले व तळ्यातील प्राणी दाखविले. त्यांनी तळ्यात कोणकोणते प्राणी पाहिले ते सांगा.







खालील चित्र पहा. चित्रात कोणते प्राणी दिसत आहे? ते कुठे राहतात ते सांगा.



मासे पाण्यातच राहतात. काही सर्प पाण्यात तर काही जमिनीवर राहतात. तसेच बेडूक, कासव, मगर, खेकडे, पाण्यात तसेच जमिनीवर राहतात.

प्राणी वेगवेगळ्या जागी राहतात. काही झाडावर,काही पाण्यात, काही जमिनीवर, काही जमिनीत बीळ करुन त्यात राहतात.

## खालील चित्र पहा











वरील चित्रातील कोणते प्राणी कुठे कुठे राहतात सांगा. लिहा.

| प्राण्याचे नाव | त्यांचा निवास |
|---|---|
| .................................. | .................................. |
| .................................. | .................................. |
| .................................. | .................................. |




काही प्राणी आपल्याच घरात राहतात.खालील चित्र पहा. आपल्या घरी राहणाऱ्या प्राण्यांना रंग भरा.अशा घरी पाळता येनाऱ्या प्राण्यांना ''पाळीव प्राणी''म्हणतात.



SCERT TELANGANA







## पक्षी कुठे राहतात



रंगाच्या घरी वासू आला गच्चीवरुन चिमण्या उडत येवून लोंबकळत ठेवलेल्या वाटीतील पाणी पित त्याने पाहिले. रंगाने ओंजळीत कणीक आनून त्याने चिमण्यासमोर टाकले. चिमण्यानी ते लवकर टिपून घेतले. वासुला हे पाहून फार आनंद झाला. चिमण्या किती छान आहेत ! वासू म्हणाला. रंगा, वासुला परड्यात घेवून गेला.

परड्यात झाडाच्या फांद्यावर कावळयाचा घरटा दिसला. घरट्यात कावळांच्या पिल्लांना पाहिले. ते पाहून रंगाला खूप आनंद झाला.

- कावळे घरटे का बांधतात?
- असेच झाडावर घरटे बांधनाऱ्या पक्षांची नावेसांगा व लिहा.



तुम्ही शिकलात की, पक्षी आपले घरटे झाडावर बांधते. आता खालील दिलेले चित्र पहा. त्या पक्षांची नावे सांगा आणि ते पक्षी कुठे राहतात ते सांगा?








| | | |
|---|---|---|
| पक्षाचे नाव .................. | पक्षाचे नाव ............ | पक्षाचे नाव .................. |
| निवास ..................... | निवास ................ | निवास ...................... |

तुमच्या मोठ्यांना विचारा की, वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी कुठे राहतात?





तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21



## पक्षाचे स्थलांतर



रंगा,वासु, सायंकाळी खेळत असतांना त्यांना आकाशात बगळ्यांची रांग दिसली. ते एकाच रांगेत उडत असल्याने फार सुंदर दिसत होते.ते कधी कधीच दिसतात ना ! ते कुठे राहतात? असे वासूने विचारले.ते नेहमी दिसत नाहीत.ते फक्त मान्सुन महिण्यातच दिसतात.रंगा म्हणाला.

काही पक्षी अंडी घालून,अन्नासाठी एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात जातात. तसेच काही पक्षी उन्हाळ्यात, हिवाळ्यात तिथले वातावरण सहन न झाल्याने इतर प्रांतात स्थलांतरीत होतात.अशा पक्षांना **स्थलांतरीत पक्षी** म्हणतात.

| आकाशातून स्थलांतरीत पक्षी रांगेत जातांना कधी पाहिलात का? |
|---|



## कोणते कसे जातात?

प्राणी एका ठीकाणाहून दुसऱ्या ठीकाणी जाण्यासाठी- काही चालत,काही सर्पटत, काही उड्या मारत, काही हवेत उडत, काही पोहत जातात. यासाठी ते पायांचा, पंखांचा, कधी शेपटीचा सुध्दा वापर करतात. खालील प्राण्यांच्या चित्रांना पाहून त्यापैकी कोणते सर्पटतात? कोणते उड्या मारतात?कोणते हवेत उडतात? कोणते पोहतात?



SCERT TELANGANA









## हे करुन पाहू या !


- तुम्हाला आवडलेल्या / तुम्ही पाहिलेल्या प्राण्याचे चित्र तुमच्या वहित काढा .
- आता तिघा-तिघाचा गट करुन बसा. प्रत्येक गटाने एकेक पेपर घ्यावे.त्याला तीन भागात घडी करावी..




1. प्रत्येक गटातील एकाने पेपरच्या पहिल्या घडीवर त्याच्या आवडत्या प्राण्याचे डोके, काढून तो पेपर घडी करुन दुसऱ्या गटाला द्यावे.



2. गटातील दुसऱ्याने दुसऱ्या घडीवर त्याच्या आवडीच्या प्राण्याची मान काढावी. काढलेल्या भागाला दुमडून गटातील तिसऱ्याला द्यावे.




3. गटातील तिसऱ्याने तिसऱ्या घडीवर त्याच्या आवडीच्या प्राण्याचे पाय काढावे.



4. आता कागदाच्या घड्या उघडून पहा. कसा विचित्र प्राणी दिसते आहे नाही !

5 इतर गटांनी काढलेल्या चित्रांना पहा.


SCEPT TELANGANA





तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

 जया, विजया, लताने सुध्दा तसेच चित्र काढले.त्यांनी काढलेले चित्र पहा. यात कोणता भाग कोणत्या प्राण्याचा आहे, ओळखा.




## प्राण्यावर दया करावी



एके दिवशी किट्टू शाळेला जात असतांना रस्त्यात एक कुत्रा कन्हत रडत पडून दिसला.त्याच्या पायाला जखम झाली होती. त्याने कुत्र्याला त्याच्या घरी घेवून जावून बाबाला दाखविले.नंतर वाटीत दूध पाजले.पिलाने ते पिले.शेपटी हलवत किट्टूकडे गेले.किट्टूने त्याचे नाव 'पिंकी ठेवले.त्या दिवसापासून पिंकी त्यांच्या कुटुंबात मिसळून गेला. किट्टूच्या या कामामुळे शिक्षकांनी,मित्रांनी त्याचे कौतुक केले.






किट्टूने काय केले पाहिलेत ना ! तसे तुम्ही कधी केलात का? काय केलात?

घरात किंवा गल्लीत भुकेने व्याकूळ कुत्र्याचे पिलू, मांजराचे पिलू दिसल्यास तुम्ही काय कराल?

## फूलपाखराला रंग भरा



फूलपाखरु किती सुंदर आहे नाही का! फुलाभोवती उडत असतांना किती मजा येते. ड्रॅगनफ्लायसुध्दा हवेत उडतांना किती सुंदर दिसतो.म्हणून अशा पाखरांचे रक्षण करावे. पण काही विचित्र मुले झाड चढून पक्षाचे घरटे मोडतात. चिमण्याच्या घरट्यातील अंडी फोडून घरट्यासोबत खेळतात, कोकिळेचे, पंकोळीचे पंख तोडतात, रस्त्यावरील कुत्र्यांना दगड मारतात, हे फार वाईट काम आहे. अशा गोष्टी करु नयेत.

आपल्या सोबत परिसरात अनेक प्राणी राहतात. त्यांचे रक्षण करावे. ते सर्व आपल्यासारखेच जीव आहेत. जखमी झाल्यास आपल्या प्रमाणेच दुःखी होतात. म्हणून त्यांना त्रास देऊ नये. त्यांना शांतीने जगु द्यावे.

## किटके



खालील अनेक प्रकारच्या किटकांना बघा,यापैकी कोणते कुठे पाहिलात ते सांगा.



SCERT TELANGANA



## किटक चावल्यास काय होते?

राजूच्या आजोबाला हिव ताप आला. त्यांना डॉक्टर कडे घेवून गेले. डॉक्टर तपासनी करुन मलेरियाचा ताप आला असे सांगीतले. मलेरियाचा ताप का आला असे राजूने डॉक्टरला विचारले. एक प्रकारच्या डास चावल्याने मलेरिया आला आहे असे डॉक्टर म्हणाले.

डास चावू नयेत म्हणुन आपण कोणती काळजी घ्यावी?

डासाची वाढ होवू नये म्हणुन कोणती काळजी घ्यावी?

यांना पाहिलात का? हे कशासाठी वापरतात ते सांगा..







डास साचलेल्या पाण्यात वाढतात. म्हणून आपल्या परिसरात पाणि साचू देवू नये. शाचलेल्या पाण्यात केरोसीन किंवा मलाथियान औषध पिचकारले तर डास मरतात. डास चावू नयेत म्हणून मच्छरदानी ,मस्कीटो कॉइल्स,वापरतात.

तसेच माशांमुळे सुध्दा आपणास अनेक **रोग होतात. माशी** शेणावर,घाण परिसरात राहतात. अशा ठिकाणी रोग निर्मान करनारे रोग जंतू सुध्दा राहतात. आपल्या जेवनावरुन माशा उडतात. असे माशा उडालेले दुशीत अन्न खाल्याने टायफाइड,कॉलरा सारखे रोग होतात. म्हणून अन्न पदार्थावर माशा उडू नये म्हणुन अन्न झाकून ठेवावे.

उघडे , धूळ पडत असलेले अन्न पदार्थ / **खाद्यपदार्थ** कुठे पाहिलात काय? **तशा प्रकारचे** अन्न का खाऊ नये ते सांगा.

माशा, डासाची वाढ होवू नये म्हणून आपल्या परिसरात पाणि साचू देवू नये. पाण्याचे डबके ठेवू नये किवा त्यात कचरा टाकु नये. आपला परिसर स्वच्छ ठेवावा. घरात घराबाहेर स्वच्छता राखल्याने डास राहात नाहीत.**कचरा कचऱ्याच्या डब्यात टाकावा.साचलेल्या पाण्यात केरोसीन किंवा मलाथियान औषध शिंपडावे.**

SCERT TELANGANA





## महत्वाचे शब्द

| | | |
|---|---|---|
| 1. प्राण्याचे निवास स्थान | 2. पाण्यात राहणारे प्राणी | 3. स्थलांतरीत पक्षी |
| 4. जमिनीवर चालनारे प्राणी | 5. पाळीव प्राणी | 6. किटक |
| 7. प्राण्यावर दया करणे. | 8. जिवाणु | 9. परिसराची स्वचछता. |
| 10. मच्छर अगरबत्ती | 11. मलाथियान | |

## आपण हे शिकलो

- ★ प्राणी जमिनीवर,पाण्यात, झाडावर राहतात.
- ★ घरात पाळतो त्या प्राण्यांना '' पाळीव प्राणी '' म्हणतात.
- ★ प्राणी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सर्पटत, उड्या मारत, उडत, पोहत जातात.
- ★ पक्षी अन्नासाठी, अनुकूल परिसरासाठी आणि अंडी घालण्यासाठी स्थलांतर करतात. अशा पक्षांना 'स्थलांतरीत पक्षी ' असे म्हणतात.
- ★ प्राण्यावर दया करावी,त्यांना आवश्यक आहार,अन्न द्यावे.त्यांचे रक्षण करावे.
- ★ साचलेल्या पाण्यावर डास वाढतात. **आपल्या सभोवताली पाणी साचवु देऊ नये.**
- ★ अस्वच्छ परिसरात माशा, डास वाढतात. म्हणून आपला परिसर स्वच्छ ठेवावा.

SCERT TELANGANA


## हे करा



### विषय आकलन

1. पाळीव प्राण्याची चार उदाहरणे सांगा.
2. डास होवू नयेत म्हणून काय करावे?
3. पक्षी स्थलांतर का करतात.?
4. पक्षी आणि प्राण्यातील कोणतेही दोन फरक सांगा?
5. खालील तीन प्राण्यांची नावे लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) उडनारे | 1... ................ | 2. ................ | 3. .................. |
| ब) सर्पटनारे | 1. ................. | 2. ................ | 3. .................. |
| क) चालनारे | 1.. .................. | 2. ................ | 3. ................... |





तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

6. मी कोण? सांगा मी कोण?

अ) मी लांब असतो. मला पाय, कान नसतात.
मी सरपटत चालतो आणि वारुळात राहतो.
मी कोण? सांगा मी कोण?

आ) मला चार पाय असतात..
मी दुध देतो. मी पाने
खातो. मी कोण? सांगा मी कोण?


ई) मला पंख असतात.
आकाशात उंचावर उडतो.
उंचावरुन जमिनीवरील लहान वस्तुंना पाहु
शकतो. मी कोण? सांगा मी कोण?


इ) मी पाण्यात राहतो. मी झोपत
नाही. मी कल्ल्याने श्वास घेतो.
मी कोण? सांगा मी कोण?



## चित्र काढून रंग भरा.

1. खालील चित्र काढून रंग भरा.





SCERT TELANGANA

**गोष्ट वाचा :**

तुमच्या वाचनालयाला भेट द्या आणि ***''जंगल बुक''*** मधील ***'मोगली'*** ची कथा वाचा. ही कथा ***'रुडयार्ड किपलींग'*** ने लिहलेली आहे.








## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. प्राण्याचे चित्र गोळा करुन अल्बम तयार करा. एकेका प्राण्याला पाहून त्यांच्याविषयी प्रत्येकी तीन ओळी लिहा.
2. तुम्ही तुमच्या मित्राच्या घरी जावून तिथे कोणते प्राणी,पक्षी पाळत आहेत त्यांची माहीती गोळा करा. ती माहिती खालील कोष्टकात लिहा.

| अ.क्र | मित्राचे नाव | पाळीव पक्षी, प्राण्याचे नाव |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

सर्वात जास्त कोणते प्राणी पाळले जातात?




## कौतूक करणे

1. पक्षाच्या घरट्यातून पक्षी खाली पडला तर तुम्ही ते पहिल्यानंतर काय कराल सांगा व लिहा?
2. प्राणी सुध्दा आपल्या सारखेच सजीव आहेत.त्याना दुःख होवू नये म्हणून आपण काय काय करावे? तीन उपाय सांगा व लिहा.



## प्रश्न विचारणे


1. रितु आणि सीता दोघे झाडावरील पक्षाच्या घरट्याला आश्चर्याने पहात आहेत. त्याबद्दल माहीती मिळवावी असे त्यांना वाटले. तिथं असलेल्या यल्लय्या शेतकरीला पक्षाच्या घरट्याबद्दल प्रश्न विचारले .त्यांनी कोणकोणते प्रश्न विचारले असतील? ते लिहा.



## मी हे करु शकतो का?



| | | |
|---|---|---|
| 1. | विविध पक्षी, प्राणी कुठे कुठे राहतात सांगू शकतो.. | होय / नाही |
| 2. | पाळीव प्राण्याची माहीती गोळा करुन त्याचे कोष्टक तयार करु शकतो. | होय / नाही |
| 3. | विविध पक्षाचे / प्राण्याचे चित्र काढून त्याला रंगवू शकतो. | होय / नाही |
| 4. | पक्षी, प्राणी मला खूप आवडतात. त्यांच्यावर दया करतो. | होय / नाही |
| 5. | पक्षी आणि पक्षाच्या घरट्यांबद्दल प्रश्न विचारु शकतो. | होय / नाही |





तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

SCERT TELANGANA

# 5. आपल्या सभोवतालची झाडे



सलीमाला फुलझाडे फार आवडतात म्हणून ती घरच्या मागील अंगणात निरनिराळी फुलझाडे वाढविते. रोज त्या झाडांना दररोज पाणी घालते. कुणालाही झाडाची पाने फुले तोडू देत नाही. अशाप्रकारे ती झाडांची काळजी घेते.


सलीमाने तिच्या शाळेतली झाडे पण दत्तक घेतली. त्या झाडांची सुध्दा घरच्या झाडाप्रमाणे काळजी घेते आणि दररोज पाणी टाकते. सुट्ट्यात सुध्दा शाळेत जावून पाणी घालते. एके दिवशी अखिला, विराट आणि गोपी सलीमाच्या घरी जातात. सगळे घराच्या मागच्या आंगणात गेले आणि फुले पाहिले.




TELANGANA







अखिला आणि सलीमाने पाहिलेल्या फुलझाडांची नावे द्या?
तुम्हाला माहीत असलेल्या अजून काही फुलझाडाची नावे लिहा.
तोडलेल्या फुलाचे अखिला व सलीमाने काय केले असतील?
आपण केंव्हा आणि का फुले वापरतो?



सलीमाने तीच्या घरी फुल झाडेच नाही तर इतर भाजी पाला, फळाची झाडे सुध्दा लावली. ते पहा






तुमच्या, मित्राच्या घरी असलेल्या झाडाची माहीती मिळवून कोष्टकात लिहा.

| मित्राचे नाव | घरात वाढविलेली झाडे |
|---|---|
| 1. | |
| 2. | |
| 3. | |
| 4. | |
| 5. | |
| 6. | |

SCERT TELANGANA



## बहूतेक घरी कशाची झाडे लावलेले आहेत?

साधारणतः घरासमोरच्या रिकाम्या जागी झाडे लावतात. काही जाच्या घरासमोर/मागे रिकामी जागा राहात नाही . असे लोक घरी कोणती झाडे लावतात. कसे लावतात?

अखिला, सलीमा खेळण्यासाठी घराबाहेर गेल्या. तिथे सर्व मुले वडाच्या झाडाखाली खेळत आहेत. वडाच्या झाडासोबत रस्त्याच्या बाजूला निंबाचे, चिंचेची झाडे आहेत. अखिला, सलीमा सुध्दा मित्रासोबत तिथेच खेळली.


झाडांचे कोणकोणते उपयोग आहेत? विचार करा.



## सर्व झाडे एकसारखी असतात का?



अखिला आणि सलीमाने मळयातील अनेक झाडांची पाने, फांद्या आणि खोडं पाहिले, कांही उंच आणि कांही लहान. कांही झाडांना लहान पानं तर काहींना लांब आणि रुंद पानं. त्यांनी पाहिलेल्या झाडांपैकी लहान पानांची व मोठ्या पानांची झाडे कोणते असतील? तसेच मोठे उंच, सावली देणारी झाडे कोणती असतील? रस्त्याच्या कडाला अखिलाने एक उंच झाड पाहिले आणि ती म्हणाली, ''*अब्ब! किती उंच झाड आहे!*''

आपल्या सभोवताली विविधप्रकारची झाडे,आहेत ना ! ते सर्व एकाच उंचीचे आहेत का? यापैकी काही तुमच्याहून कमी उंचीची असतात.




काही झाडे तुमच्या एवढी उंच असतात. काही तुमच्याहून उंच आहेत. तुमच्या परीसरातील रोपट्यांना / झाडांना पहा. त्याची माहीती खालील कोष्टकात लिहा. .

| तुमच्या पेक्षा लहान झाडे | तुमच्या एवढी उंच झाडे | तुमच्या पेक्षा उंच झाडे |
|---|---|---|
| | | |

SCERT TELANGANA





वड, चिंच, आंबा, निंबासारख्या झाडांना खूप फांद्या असतात व अशी झाडे आकाराने खूप मोठे असतात. त्यांना खुप फांद्या असतात ते आपल्याला सावली देतात म्हणून रस्त्याच्या दोन्ही बाजुला अशी झाडे लावतात. या झाडाची पाने, फुले, फळे फार उपयोगी असतात. झाडामुळे आपल्याला लाकूड मिळते. लाकडापासुन अनेक प्रकारच्या वस्तू तयार करतात. ताडीचे झाड फार उंच वाढते. त्याला फाद्या नसतात. ताडीची पाने फार लांब व मोठी असतात. ताडीच्या पनाळयांचा झोपडीवर झाकण्यासाठी उपयोग करतात.

अशाच प्रकारे विविध झाडाचे आणखी काय काय उपयोग असतात ते लिहा.

## आपण झाडे का वाढवावीत?



अखिलाच्या घरच्या अंगणात आंब्याचे झाड आहे. आंब्याच्या झाडाचे कोणकोणते फायदे असतात माहीत आहे काय? कच्च्या आंब्याचे लोणचे घालतात. पिकलेल्या आंब्याचा रस करतात. सणाच्या दिवशी आंब्याच्या पानाचे तोरण तयार करतात. झाडाला झोका बांधून खेळतात.

आंब्याचे झाड आपणास कसे उपयोगी आहे पाहीलेत ना ! आता खालील चित्रातील झाडाचा आपल्याला काय उपयोग होतो, चर्चा करा,लिहा.






नारळाचे झाड



निंबाचे झाड







## वरील दोन्ही चित्रांचे निरिक्षण करा.

**गटात चर्चा करा**



वरील दोन चित्रांपैकी तुम्हास कोणते चित्र आवडले? का? झाडे नसल्यास काय होईल? विचार करुन सांगा. जेव्हा उष्णता गरमी असते, तेव्हा लोक झाडाच्या सावलीत विश्रांती घेतात हे तुम्ही पाहिले का? तुमच्या शाळेतल्या वृक्षारोपन कार्यक्रमात तुम्ही कधी भाग घेतला का? तुम्ही लावलेले झाड निरोगी वाढत आहे हे पाहुन तुम्हास कसे वाटते?

झाडांमुळे आपल्या थंड वाऱ्यांची झुळुक मिळते. हिरवी पानं आणि विभिन्न रंगाच्या फुलांमुळे झाड सुंदर दिसते. तुम्ही पार्क किंवा शेतीला भेट दिली असता, हिरव्या गवतामध्ये खेळला असेलच गांवामध्ये उन्हाळ्यात गर्मी पासुन स्वत:चे रक्षण करण्यासाठी लोक झाडाखाली जमा घेतात.

झाडांच्या सावलीत मुले वेगवेगळ्या प्रकाराचे खेळ खेळतात.

तुम्ही अशा प्रकारे कधी खेळलात का? तुम्हाला आनंद मिळाला का?

जी झाडे आपल्याला सुख, आनंद देतात, अशा झाडांचे रक्षण करावे, असे तुम्हास वाटत नाही का? शाळेत घराच्या अंगणात, रस्त्याच्या बाजुला, शेताच्या किनाऱ्यावर झाडे लावण्यात भाग घेतला पाहिजे आणि त्यांच्या संरक्षणाची जिम्मेदारी पण घेतली पाहिजे.

## आपल्या परिसरात न वाढनारी झाडे

आपण विविध प्रकारची फळे खातो. त्यापैकी काही आपल्या प्रांतात असतात तर काही आपल्या प्रांतात नसतात. अखिलाला सफरचंद (ऍपल) खूप आवडतो. पण सफरचंदाचे झाड तिने कधीच पाहीलेले नाही. अशाप्रकारे तुम्ही न पाहीलेल्या फळांच्या झाडांची नावे लिहा.




| | |
|---|---|
| ..................... | ..................... |
| ..................... | ..................... |
| ..................... | ..................... |
| ..................... | ..................... |
| ..................... | ..................... |
| ..................... | ..................... |

SCERT TELANGANA





## जल वनस्पती, वाळवंटीय वनस्पती

सलीमा,अखिला मित्रांसोबत शेतात गेल्या. शेजारच्या तळ्यात कमळाची फुले पाहिली. सोमय्या कोळीने त्या कमळाबद्दल सांगीतले. घरी परत येतांना अखिला एका झाडाजवळ थांबली. '' हे झाड बघ, गमतीचे आहे. त्याला पानं नाहीत. खूप काटे आहेत. ते **झाड कोणते** आहे? सलीमाने काय उत्तर दिले असेल? कल्पना करा. खालील चित्र पहा. ह्याबद्दल तुम्हाला माहीत आहे काय? ते कुठे वाढतात ते सांगा




वाटर लिली (पाणी कमळ)



लोटस (कमळ)



अलोइवेरा (कोरफडाचे झाड)



कॅक्ट्स (नागफणीचे झाड)

वाटर लिली आणि कमळा सारख्या वनस्पती पाण्यात वाढतात. यास 'जल वनस्पती ' म्हणतात कोरफड, नागफणी सारख्या वनस्पती कमी पाणि असलेल्या ठिकाणी, रेताळ जमीनत वाळवंटात वाढतात. यांना 'वाळवंटीय वनस्पती ' म्हणतात.

SCERT TELANGANA

## महत्वाचे शब्द

1. झाडांचे फायदे  2. झाड दत्तक घेने  3. घरात वाढणाऱ्या वनस्पती
4. वाळवंटीय वनस्पती  5. जल वनस्पती  6. घराबाहेर वाढणाऱ्या वनस्पती

## आपण काय शिकलो?

★ आपल्या घरी, सभोवताली निरनिराळी झाडे वाढतात.
★ आपल्या सभोवती वाढणाऱ्या वनस्पती विविध प्रकारच्या असतात. काही खूप उंच वाढतात. काही कमी उंच वाढतात. तर काही खूपच लहान असतात.
★ निंबासारख्या झाडांना खूप फांद्या असतात व अशी झाडे खूप मोठी असतात. ताडी सारखी झाडे फार उंच वाढतात पण त्यांना फांद्या नसतात.
★ झाडांचे अनेक फायदे आहेत. झाडापासून फुले,फळे,लाकूड मिळते.
★ काही झाडे आपल्या परिसरात वाढत नाहीत. पण त्यांचे फुलं,फळं आणि लाकूड आपण वापरत असतो.
★ रेताळ जमिनीत कोरफड, नागफणी सारखी झाडे वाढतात. त्यास वाळवंटीय वनस्पती म्हणतात.
★ आपल्या शाळेत, आपल्या अंगणात आणि बऱ्याच ठिकाणी आपण रोपटे लावुन त्यांचे रक्षण करतो.

## हे करा



### विषय आकलन

1. फुले लागणाऱ्या, फळे लागणाऱ्या वनस्पतीची काही उदाहरणे सांगा.
2. सिंदीचे झाड (इथा चेंट्टु)व आंब्याच्या झाडातील फरक व साम्य सांगा.
3. मोगरा, जास्वंद झाडातील साम्य व फरक सांगा.
4. तुमच्या परिसरात न वाढनाऱ्या वनस्पती कोणत्या?
5. वडाचे झाड व ताडीचे झाड यातील फरक खालील कोष्टकात लिहा.
6. तुमच्या शाळेत लावलेल्या रोपट्यांचे कसे रक्षण करावी?



| | वडाचे झाड | ताडीचे झाड |
|---|---|---|
| उंची | | |
| पाने | | |
| फांद्या | | |



SCERT TELANGANA





7. सीता आणि लक्ष्मीचे घर बघा. उत्तरे द्या.



सीताचे घर




लक्ष्मीचे घर

- तुम्हाला कुणाचे घर आवडले? का आवडले?
- दोन्ही घरांमध्ये काय फरक आहे?
- लक्ष्मीच्या घरासारखी रिकामी जागा तुमच्या घरासमोर असल्यास तुम्ही काय कराल?

8. सीता तिच्या घरी झाडे वाढविते, घर स्वच्छ ठेवते. मग तुम्ही खाली दिलेल्यापैकी काय करत आहात त्यापुढे कंसात ✓ लिहा.


- मी घरी झाडे लावते व वाढविते. ( )
- झाडांना रोज पाणि घालते. ( )
- रोपटे व त्याची पाने तोडणार नाही. याची काळजी घेते. ( )
- झाडाभोवती स्वच्छता ठेवते. ( )
- वाळलेल्या पानांना काढून टाकतो. ( )
- मी शाळेतील झाडे दत्तक घेतली आहे. त्यांची काळजी घेतो. ( )
- मी खाली पडलेली पाने काढते आणि घर स्वच्छ ठेवते. ( )


9. घरी झाडे लावने आवश्यक आहे कारण ..................



## चित्र काढा व रंग भरा.

1. खालील चित्र काढा व त्यात रंग भरा.





SCERT TELANGANA

2. तुमच्या परिसरातील उंच झाडाचे चित्र काढा. त्याला रंग भरा. त्याबद्दल थोडी माहीती द्या.




## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. तुमच्या परिसरातील किती रोपटे/किती झाडांची नावे माहीत आहेत? माहीत असलेल्या झाडांची नावे लिहा. माहीत नसलेल्याची नावे माहीत करा

2. तुमच्या परिसरातील रोपटे / झाडाची फुले, फळे,सावली,लाकूड देणाऱ्या झाडांची नावे लिहा.

| फुले फुलणारी झाडे | फळे लागणारी झाडे | सावली देणारी झाडे | लाकूड दणारी झाडे |
|---|---|---|---|
| .................... | .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... | .................... |



## कौतूक करणे


1. तुम्ही हरित-हारमच्या वेळी लावलेली झाडे जर कोणी तोडली तर तुम्हाला कसे वाटेल? तेंव्हा तुम्ही काय कराल?

2. सलीमाच्या शाळेत झाडे खूप आहेत ना ! ती सुट्टयात सुध्दा झाडाला पाणि घालते, त्याची काळजी घेते हे माहीत आहे ना ! तसेच तुम्ही पण तुमच्या शाळेतील झाडे दत्तक घ्या. त्याला रोज पाणि घाला. महिण्यानंतर काय होते ते बघा.



## प्रश्न विचारणे

1. अखिलाला जल वनस्पती बद्दल माहिती हवी आहे. त्यासाठी ती तळ्याजवळ गेली. तिथे रामय्या माळी मिळाली.जल वनस्पतीबद्दल काही प्रश्न विचारली. तर अखिलाने कोणकोणते प्रश्न विचारले असतील. ते प्रश्न लिहा.रामय्या माळीची उत्तरे लिहा.



## मी हे करु शकतो



1. आपल्या परिसरातील झाडांपैकी उंच व कमी वाढणारी झाडे सांगू शकतो. होय / नाही
2. झाडांचे फायदे सांगू शकतो. होय / नाही
3. जल वनस्पती, वाळवंटीय वनस्पती बद्दल माहिति सांगू शकतो. होय / नाही
4. फुलाचे, रोपट्याचे चित्र काढून रंग भरु शकतो. होय / नाही
5. रोपट्याबद्दल झाडाबद्दल माहिति सांगू शकतो. होय / नाही

SCERT TELANGANA





# 6. पानांचा अनुबंध





आपल्या परिसरात विविध प्रकारची रोपटे,झाडे आहेत.त्याच प्रमाणे त्यांची पाने सुध्दा विविधप्रकारची असतात. केळीचे पान पाहीलात काय? किती मोठे असते ! लोक त्या पानांवर जेवतात. नारळाच्या झाडाची पानं पाहिलात काय? ते कसे असतात विचार करा. चिंचेच्या झाडाची पाने पहा, ती किती लहान असतात? बाजूच्या चित्रात अनेक प्रकारची पाने आहत त्यांना ओळखू शकाल काय?

- चित्रातील पानांची नावे सांगा, लिहा.
- ती पाने एकसारखी आहेत काय? त्यात काय फरक आहे.

  सर्व झाडाची पाने एकसारखी राहात नाहीत. काही लहान तर काही मोठी असतात. त्यांच्या कडा, कोन वेगवेगळे असतात..






SCERT TELANGANA



खालील पानांना पहा. पानाच्या कडा, पानाचे टोक कसे आहेत ते पहा.




साधारणतः काही पानाच्या कडा सपाट तर काही करवती प्रमाणे असतात. काही पानाचे टोक तिक्ष्ण तर काहीचे गोल असतात. कांही इतर पानां बद्दल सांगा?



तुम्ही काही झाडांची पाने गोळा करा. त्यांना हात लावून पहा. ते गुळगुळीत आहेत का? ओबड धोबड आहेत? ते पाहून कोष्टकात लिहा.

| गुळगुळीत पाने | ओबड धोबड पाने |
|---|---|
| | |




## रंगीबेरंगी पाने

युसूफच्या घरी अनेक प्रकारचे क्रोटान झाडे आहेत. ते रंगीबेरंगी आहेत. युसूफच्या घरी आलेल्या रामुला ते पाहून आश्चर्य वाटले.रामुने आंब्याची पानं पाहिली. त्याची कोवळी पाने लाल रंगाची, निब्बर पाने हिरव्या रंगाची,पिकलेली पाने पिवळ्या रंगाची पाने पाहिली. तुम्ही कधी असे रंगीबेरंगी पाने पाहिलात काय? त्यांची नावे सांगा.



SCERT TELANGANA







तुम्ही कोणतेही एक पान घेवून त्याला काळजी पूर्वक पहा. त्याचा रंग, आकार, तळ भाग, वरचा भाग पहा. ते कसे आहेत? त्याला हाताळल्यास कसे वाटले? गुळगुळीत आहे का ओबडधोबड? पानाचा वास घेवून पहा तो कसा आहे? पानाच्या कडा कशा आहेत? अशाप्रकारे काही पाने गोळा करुन त्याची माहिती खालील कोष्टकात लिहा.

**हे तुम्हाला माहीत आहे काय?**

बदामाच्या झाडाची पाने बहूरंगी असतात.



| पान | नविन कोवळी पानाचा रंग | जुने निब्बर पानाचा रंग | पिकलेल्या पानाचा रंग | कडाचा आकार | वरचा भाग | तळ भाग | वास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

## पानं झडणे



रॉबर्टच्या शाळेत मोठे झाड आहे. सुट्टीच्या दिवशी सर्वजन सावलीत खेळतात. झाडाची पिकलेली पाने गळत असलेले त्याने पाहिले. पानं नसलेल्या झाडाला पाहून रॉबर्टला दु:ख झाले. पुन्हा नवीन पाने कधी येतात याचा विचार करत बसला.

झाडाची पाने कधी गळतात?

गळालेल्या पानाचे काय होते?

पानं गळालेल्या झाडाला नवी पाने कधी येतात?

कोणकोणत्या झाडाची पाने गळतात?

SCERT TELANGANA





## गळालेल्या पानांना काय करावे.

साधारणत: झाडाची पाने गळतात. यामुळे परिसर अस्वच्छ दिसतो. म्हणून सर्व परिसर झाडून स्वच्छ ठेवावा.



### कंपोस्ट खड्डा

रॉबर्टच्या शाळतील कचरा झाडाची गळालेली पाने, स्वच्छता समितीच्या सदस्यांद्वारे कचऱ्याच्या खड्डयात फेकले जाते. तसेच दुपारच्या जेवनाचे खरकटे पदार्थ त्या खड्डयात टाकतात व त्यावर माती टाकतात, असे का करतात माहित आहे? काही दिवसानंतर कचरा कुजून त्याचा कंपोष्ट खत बनतो. या खताला शाळेच्या बागेतील झाडांना टाकतात.

**तुम्हाला माहित आहे का?**

झाडाच्या गळालेल्या पानामुळे कचरा जाळल्याने आरोग्यास हानी होते.म्हणून कचऱ्याला कंपोस्ट खड्डयातच टाकावे.

तुमच्या शाळेतील गाळलेल्या पानांना कचऱ्याला तुम्ही काय करता?



## पालेभाज्या-आपला आहार

रॉबर्ट शाळेतुन घरी येताच स्वयंपाक घरातुन भाजीचा सुगंध आला.आईने त्यात कडी पत्ता, कोतमीर टाकल्यावर तर खूपच सुगंध येवू लागला.

सुगंध येणाऱ्या झाडाच्या पानांची नावे सांगा.

आपल्या स्वयंपाकात पालेभाज्या वापरल्यामुळे भाजीला सुवास व चांगली चव येतो.पालेभाज्या आरोग्यास चांगल्या असतात.पालेभाज्या आपणास जिवनसत्व प्रदान करतात म्हणूनच आपण विविध प्रकारच्या पालेभाज्या खातो. पालेभाज्यांना शिजविण्या आधी त्यांना स्वच्छ धुवावे.

SCERT TELANGANA



खालील चित्र बघा. ती कशाची पानं आहेत ते सांगा.त्यापासून काय काय करतात ते लिहा. ते कशाला वापरले जातात ते सांगा.















## तुम्हाला माहीत असलेल्या काही पालेभाज्यांची नावे लिहा.

........................ ........................ ........................

........................ ........................ ........................

........................ ........................ ........................


### पानं कशाची ओळखा पाहू !



कोतमिर, पुदीना, युक्यालीप्टस ( निलगिरी ), चिंच, आवळा, कडू निंब, तुळसीची पाने गोळा करा.

तुमच्यापैकी एकाच्या डोळयाला पट्टी बांधा. त्याच्या हातात पानं द्या. वास घेवून किंवा चव घेवून पानं कसाची आहेत ते ओळखायला लावा.जास्त पानं कोण ओळखतात पाहु या.

SCERT TELANGANA



## पानाने घराची सजावट

आता पर्यत तुम्ही पानाचा आकार,रंग. चव, वास याबद्दल माहीती घेतलात ना!

घराला कधी सजवतात ठाऊक आहे? तुमच्या घराला असे कधी सजवलात का?

संक्रांतीच्या सणाला कमलाने तिचे घर कसे सजविले ते खालील चित्रात पहा.



बरील चित्रात घराला कोणकोणत्या झाडाच्या पानाने सजविले आहे?

सणाच्या दिवशी तुम्ही कशा कशाच्या पानाने घराची सजावट करता?

तुमच्या शाळेला झाडांच्या पानाने कधी कधी सजवता?यासाठी तुम्ही कोणकोणते पानं वापराल?

साधारणतः सनांला, लग्नाच्या प्रसंगी,जत्रेच्या वेळी आंब्याची,नारळाची, केळीच्या पानाने घराची सजावट करतात.घराला सजविल्याने घर सुंदर दिसते.




## पानाने रंग



आज हरीकाचा वाढ दिवस आहे म्हणून तिने नवे कपडे नेसले. हाताला मेहेंदी लावली. तिने ती शाळेतील सर्व मुलांना दाखविली.हरिकाची सर्व मुलांनी वाहवा केली.






तुमच्या वहीत मेहंदीचे डिझाइन काढा. तुमच्या शिक्षकांना, कुटुंबातील सदस्यांना अशा झाडांबद्दल विचारा जे नैसर्गिक रित्या रंग देतात. अशा झाडांची नावे लिहा?



## पानाने आकार तयार करणे.

पानांना सजावटीसाठी वापतात हे तुम्हाला माहीत आहे ! तसेच पानाने वेगवेगळे आकार सुध्दा बनवितात. रॉबर्टने शाळेतील वाळलेली पाने गोळा केली.त्यांना पांढऱ्या कागदावर चिटकवून चित्र तयार केले. रॉबर्टने तयार केलेल चित्र पाहून सर्वांनी वाहवा केली.रॉबर्टने पानाने तयार केलेले चित्र पाहू या !






तुम्ही शिकलात की सजावटीसाठी पानांचा उपयोग करतात. पांनापासुन विविध आकार पण करतात. असे आकार तुम्ही पाहीलात ना! तुम्ही सुध्दा पाने गोळा करुन आकार बनवा व तुमच्या मित्रांना दाखवा. त्यांना भिंतीपत्रकात प्रदर्शित करा. विभिन्न प्राणी आणि पक्ष्यांचे आकार तयार करुन वर्गमित्रांना दाखवा.




## पानांशी खेळ

रॉबर्ट भिंगरीचा खेळ खेळतांना हरीकाने पाहीले. भिंगरी कोण्या दुकानात विकत घेतलास असे तिने विचारले. मीच तयार केलो,रॉबर्ट म्हणाला. मला सुध्दा शिकवशील, हरीका म्हणाली. रॉबर्टने भिंगरी कशी तयार केली ते पाहू या !


1) एक बोटाएवढे ताडीचे पान घ्यावे.



2) पानाला एक काटा किंवा खिळा टोचावा.



3) ताडीच्या पानाला टोचलेला काटा किंवा खिळा मऊ काडीला टोचावा.



4) अशी तयार झालेली ताडीच्या पानाची भिंगरी घेवून जोरात पळावे, भिंगरी गर गर फिरु लागेल.



पानाने अजून काय काय करता येते, मित्रांसोबत चर्चा करुन तयार करा.



### महत्वाचे शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पानाचे टोक | 2. | पानाच्या कडा | 3. | ओबडधोबड पान |
| 4. | गुळगुळीत पानं | 5. | कोवळी पानं | 6. | कंपोष्टचा खड्डा |
| 7. | खत | 8. | निब्बर पानं | 9. | सजावट |

### आपण हे शिकलो

★ पानं वेगवेगळ्या प्रकारची आणि आकाराची असतात.काही पानाच्या कडा सपाट, काहीच्या करवती प्रमाने तिक्ष्ण असतात. काही पानाचे टोक तिक्ष्ण असते तर काही पानांचे गोल असते.काही लहान तर काही मोठी असतात.

★ साधारणतः कोवळी पाने लाल रंगाची, निब्बर पानं हिरव्या रंगाची, पिकलेली पानं पिवळ्या रंगाची असतात.

★ कडी पत्ता, कोतमीर, पालक, मेथी, राजगिरा सारख्या पाले भाज्या आरोग्यास लाभदायक असतात. पाले भाज्या शिजविण्याआधी स्वच्छ धुवाव्यात.

★ केळी, आंब्यासारख्या झाडाची पाने सजावटीसाठी वापरतात. मेहेंदीच्या पानांना हाताला लावतात.

★ झाडाच्या गळालेल्या पानांना जाळू नये. त्यांना कंपोस्ट खड्डुयात टाकून मातीने बुझवावे.

SCERT TELANGANA






## हे करा



### विषय आकलन

1. करवती प्रमाणे कडा असलेल्या काही पानाची नावे लिहा.
2. कमळाचे व जास्वंदाच्या पानातील साम्य आणि फरक लिहा.



3. आहार म्हणून उपयोगी पडनाऱ्या चार पानांची उदाहरणे सांगा.
4. खालील कोष्टकात काही पानांची नावे आहेत. ते कोणते?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| को | त | मी | र | निं | ब |
| ची | च | पा | ल | क | स |
| पु | दि | ना | मे | हें | दी |
| मे | थी | के | ळी | आं | बा |
| तु | ळ | स | स | स | स |
| रा | ज | गि | रा | व | ड |

- या पैकी कोणत्या पानांना वास घेवून ओळखू शकतो.
- सजावटीसाठी कशाची पानं वापरतात?

5. तुम्हाला माहीत असलेल्या काही पानांची नावे लिहून त्याचे उपयोग लिहा.
6. झाडांच्या गळालेल्या पानांना काय करावे?


SCERT TELANGANA






## चित्र काढून रंग भरा.

1. तुमच्या आवडीच्या दोन पानाची आकृती काढून त्यांची नावे लिहा.
2. खालील पानाचे चित्र काढून त्यात रंग भरा.







## समाचार कोशल्य - प्रकल्प कार्य

1. तुमच्या मित्राच्या घरी दोन दिवसापासुन कोणकोणत्या पालेभाज्याचा स्वयंपाक केला विचारुन खालील कोष्टकात लिहा.

| क्र. सं. | मित्राचे नाव | पाले भाजीचे नाव | केलेला पदार्थ |
|---|---|---|---|
| | | | |

- किती जनांच्या घरी पालेभाज्यंचा स्वयंपाक केला?
- कोणती पालेभाजी सर्वाधीक जनांच्या घरी शिजवली गेली?

2. पानापासून विविध आकार तयार करा. चार्टवर चिटकवा. वर्गात लावा.
3. काही पानं गोळा करुन, पुस्तकात सात दिवस ठेवा.चार्टवर चिटकावून वर्गात लावा.

SCERT TELANGANA







## करुन पहा, काय होते ते सांगा.

1. डाव्या हाताला मेहेंदीची पानं, उजव्या हाताला जास्वंदाची पानं कुटून लावा. नंतर काय होते ते पहा.
2. कोणत्याही एका झाडाच्या पानाला पंधरा दिवस जुन्या वहीमधे ठेवा. नंतर काय बदल होतो ते बघा.
3. तुमच्या परिसरातील कोणत्याही झाडाची पानं घेवून गरम पाण्यात ठेवा. थोड्या वेळानंतर काय बदल होतो ते बघा.



## कौतूक करणे

1. तुमच्या वर्गात पानाचे चित्र कोण चांगले तयार केले? कोणकोणती चित्रं तयार केली. ते तुम्हाला का आवडले?
2. तुमच्या घरी /शाळेत झाडाची पाने गळाल्यास तुम्ही काय कराल?



## प्रश्न विचारने

1. नीरजाच्या घरी हरीणी आली.तिने तिथे विविध प्रकारची पानं पाहीले. काही पानांना पाहून आश्चर्यचकीत झाली.त्याबद्दल नीरजाला माहीती विचारली. हरीणीने कोणकोणते प्रश्न विचारले असतील? हे प्रश्न लिहा. निरजा नी काय उत्तर दिले असेल?



## मी हे करु शकतो.



| | | |
|---|---|---|
| 1. | पानांचे वर्गीकरण करु शकतो. | होय / नाही |
| 2. | पानांचे फायदे सांगू शकतो.. | होय / नाही |
| 3. | निरनिराळ्या पानांचे आकार काढू शकतो. | होय / नाही |
| 4. | पानांशी संबंधीत माहीती गोळा करुन कोष्टकात लिहू शकतो. | होय / नाही |
| 5. | पालेभाज्या खाने आरोग्यासाठी चांगले असते.रोज पालेभाज्या खातो. | होय / नाही |
| 6. | पानांबद्दल प्रश्न विचारु शकतो. | होय / नाही |

SCERT TELANGANA



# 7. आपण घेतो तो आहार





रवि गेल्या दोन दिवसापासून शाळेत आला नाही. आज शाळेत आला. दुपारच्या जेवनाच्यावेळी रामू, मेरी, रोजा मिळून रवी जवळ गेले.



रोजा : रवि ! दोन दिवसापासून शाळेत का आला नाहीस?

रवि : नलगोंडा, मामाच्या गावला लग्नासाठी गेलो होतो. म्हणून आलो नाही.

मेरी : तुझ्या मामाच्या लग्नाला गेला होतास ! लग्न चांगले झाले का?

रवि : हो! लग्न खूप छान झाले.लग्नात सकाळी,दुपारी,संध्याकाळी वेगवेगळ्या प्रकारचे जेवन केलो होते.

रामू : लग्नाच्या जेवनात काय काय जेवलास?



रवी : खूप प्रकारचे पकवान खाल्लो.



रवि लग्नात काय काय खाल्ला असेल ते खालील कोष्टकात लिहा.

| सकाळी | दुपारी | सायंकाळी | संध्याकाळी |
|---|---|---|---|
| | | | |

लग्नाच्या जेवनासारखे जेवन आपण दररोज घरी करतो का?नाही? कारण काय?

SCERT TELANGANA



तुम्ही तुमच्या घरी दररोजच्या जेवनात काय काय खाता ते खालील कोष्टकात लिहा.

| सकाळी | दुपारी | सायंकाळी | संध्याकाळी |
|---|---|---|---|
| | | | |

तुम्ही काय काय खाता लिहीलात ना !

तर मग तुमचे मित्र केव्हा काय काय खातात विचारुन खालील कोष्टकात लिहा.

| मित्राचे नाव | सकाळी | दुपारी | संध्याकाळी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

दररोज सकाळी जास्त जन काय खातात? तसेच दुपारी, रात्री काय काय जेवतात?

## आपण जेवन का करावे ठाऊक आहे का?

रवि सकाळी उशीरा उठला. घाई घाईने अंघोळ करुन शाळेत गेला. शाळेला वेळ झाला म्हणून न जेवता गेला.शाळेत रविला काय वाटले असेल? सांगा.

तुम्ही कधी तरी न जेवता शाळेत गेलात का? तेव्हा तुम्हाला कसे वाटले?

आपण जेवन का करावे ठाऊक आहे का? आपण दररोज चालणे खेळणे, धावणे, पाणि भरणे अशी अनेक कामं करत असतो. ही सर्व कामं करण्यासाठी शक्तीची गरज असते. म्हणून शक्ती मिळवण्यासाठी आहार आवश्यक असतो.





## आपण खातो ते अन्न कुठून येते?

आपण खातो ते अन्न कुठून येते ठाऊक आहे का? आपण खातो त्या पालेभाज्या,फळे, कंद मूळ वनस्पती पासून मिळतात. तसेच प्राण्यांपासून दूध, अंडे, मास, मिळते.

बाजूच्या पानावर काही चित्र दिले आहेत बघा. ते कशाचे आहेत ते सांगा. प्राण्यापासून मिळनाऱ्यावर ◯ गोल करा. वनस्पती पासून मिळनाऱ्यावर ✓ करा.

SCERT TELANGANA





**झाडांपासून मिळनारे पदार्थ कोणते? प्राण्यापासून मिळणारे पदार्थ कोणते?**


















SCERT TELANGANA








रविच्या आईने रविला जेवाणात भात वाडला. अंड्याची भाजी वाडली. अंड्याची भाजी कशी करतात असे रविने आईला विचारले. अंड्याच्या भाजीत कोंबडीचे अंडे,हिरव्या मिरच्या, तेल, हळद, लसून,टमाटे, इत्यादी टाकुन करतात असे सांगीतले. यात अंडे प्राण्यापासून मिळतात तर हिरव्या मिरच्या, तेल, हळद, लसून,टमाटे, इत्यादी वनस्पती पासून मिळते. खाली काही आहार पदार्थाची नावे दिले आहेत. ते कशापासून मिळतात त्याच्यासमोर ✓ लिहा.

| आहार पदार्थ | प्राण्यापासून | वनस्पती पासून | दोन्ही पासून |
|---|---|---|---|
| भात | | | |
| चिकन बिर्यानी | | | ✓ |
| दाळ | | | |
| सांबार | | | |
| आम्लेट | | | |
| कारल्याची भाजी | | | |
| आलूची भाजी | | | |
| तूप | | | |
| केक | | | |
| ब्रेड | | | |
| दही | | | |
| दूध | | | |
| दह्याचे लोणचे-रायता | | | |
| आंब्याचे लोणचे | | | |
| मासाचे पुलुसू | | | |
| कोंबडीची भाजी | | | |

SCERT TELANGANA






तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21



## आपण आहार पदार्थ का शिजवुन खातो?



आपला आहार कुठून येतो ठाऊक झाले ना! आता शिजवून खायचा आहार व कच्चा खायच्या आहाराबद्दल माहीती घेवू..

मेरी शाळेतुन संध्याकाळी घरी परत आली. तिच्या सोबत तिचे मित्र रोजा,रवि, रामू पण आले. जेवायला काही आहे का असे मेरीने आईला विचारले. आलमारामध्ये आहे जे आवडेल ते घेवून खा असे आई म्हणाली. आलमारामध्ये मेरीने काय काय पाहीले असेल? काय काय घेवून खाले असेल कल्पना करुन कोष्टकात लिहा.

| पाहिलेले पदार्थ | खाल्लेले पदार्थ | तुम्हाला आवडलेले पदार्थ |
|---|---|---|
| | | |

आपण दररोज भात, वरण, भाजी, तुरीची डाळ, हिरवे मुग, दुध, शेंगदाणे असे अनेक प्रकारचे आहार पदार्थ खातो.त्यापैकी काही शिजवून तर कांही कच्चे खायचे असतात!




तुम्ही शिजवून काय खाता व कच्चे काय खाता ते खालील कोष्टकात लिहा.

| शिजवून खायचे | कच्चे खायचे | कच्चे, शिजवून खायचे |
|---|---|---|
| | | |

SCERT TELANGANA





काही अन्नपदार्थ शिजवून खातो तर काही कच्चेच खातो.काही पदार्थांना शिजवुनच का खावे लागते विचार करा.

अन्न पदार्थ शिजविल्याने चवदार बनतात. लवकर पचतात. काही कच्चे खाल्यास पचन होत नाही. आहार पदार्थाना शिजवावे पण खूप शिजवू नये. जास्त शिजविल्याने त्यातील पोषक पदार्थ नष्ट होतात.

## अन्न कशात शिजवितात?

भात, दाळ, वरण, असे काहीही शिजविण्यासाठी भांड्याची गरज आहे. अन्न शिजविण्यासाठी तुमच्या घरी कोण कोणते भांडे आहेत?

खालील चित्रात पहा. चित्रात काही भांडे लपून आहेत. ठीपका असलेल्या जागेत रंग भरा. रंग भरल्यानंतर कोणते भांडे दिसले ते सांगा.



कोणते भांडे दिसले? त्यांची नावे सांगा. त्यात काय काय करतात?

SCERT TELANGANA



अशाप्रकारचे भांडे तुमच्या घरी असतील.त्यांची नावे खालील कोष्टकात लिहा.

| भांड्याचे नाव | कशाला वापरतात. |
|---|---|
| | |



खालील पात्रांना कधी पाहीलात काय? याचा उपयोग करुन काय काय शिजवितात?त्याबद्दल माहीती मिळवून सांगा.



इलेक्ट्रीक कुकर




इंडक्षन स्टव



मायक्रो ओवेन



इडली पात्र.

SCERT TELANGANA



## सर्व पदार्थ एकाच प्रकारे शिजवितात का?

निखील स्वयंपाक घरात गेला. त्याचे बाबा वांगे कापून फोडी पाण्यात टाकत होते. वांग्याच्या फोडीचे काय कराल बाबा?' निखीलने बाबांना विचारले. वांग्याची भाजी करीत आहे असे बाबा म्हणाले. निखीलने टमाटे,हिरव्या मिरच्या, काढून दिल्या. नंतर वांग्याची भाजी केली. निखीलच्या बाबाने भाजी कशी केली असेल? विचार करा.

वांग्याची भाजी तुमच्या मित्रांच्या घरी कसे करतात? विचारुन सांगा.

सर्व आहार पदार्थांना एकसारखं शिजवत नसतात. प्रत्येक पदार्थ शिजविण्याची पध्दत वेगवेगळी असते. खालील आहार पदार्थांना बघून ते कसे शिजवितात ते विचारुन लिहा.











भात, दाळ सारखे पदार्थ उकडतात. भज्जे, समोसे तेलात तळतात. मक्काचे कनीस,रोट्या, मास यांना विस्तवावर भाजतात.इडली वाफेवर शिजवितात. आंब्याचे लोणचे, कोशींबीर असे पदार्थ मिसळून तयार करतात. याला गरम करीत नाहीत. अशाप्रकार वेगवेगळे पदार्थ वेगवेगळ्या पध्दतीने शिजवितात. तुमच्या घरी स्वयंपाक कोण कोणत्या पध्दतीने करतात. विचारुन सांगा.

## तुम्हाला हे माहीत आहे काय?



- ❒ भाजीपाला, स्वच्छ धुवून, कापून नंतरच शिजवावे.
- ❒ भाजीपाला कापल्यानंतर धुवू नये. असे धुतल्याने त्यातील पोषक पदार्थाचा नाश होतो.
- ❒ भात शिजवितांना तांदळाला जास्त धुवू नये.
- ❒ भात शिजवितांना त्यातील पेज काढू नये. पेज काढल्याने त्यातील पोषक पदार्थ निघून जातात.
- ❒ दररोजच्या जेवनात दाळी, पालेभाज्या नक्की असाव्यात.
- ❒ पालेभाज्या, दाळी जास्त शिजवू नयेत.
- ❒ गाजर,बिटरुट,मुळा, काकडी, कांदे,कोतमीर,कच्चे खाता येतात.

## महत्वाचे शब्द


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | आहार (अन्न) | 2. | शिजवून खायचे अन्न पदार्थ | 3. | कच्चे खायचे अन्न पदार्थ |
| 4. | पचन | 5. | स्वयंपाकाचे भांडे | 6. | पोषक पदार्थ |

## आपण हे शिकलो


- ★ आहारापासून आपल्याला शक्ती मिळते.
- ★ आपला आहार वनस्पती व प्राण्यापासून मिळतो.
- ★ काही पदार्थांना शिजवून तर काही पदार्थांना कच्चेच खातात.
- ★ शिजविल्याने अन्न चवदार लागते. तसेच ते लवकर पचन होते.
- ★ एका अन्न पदार्थाला वेगवेगळ्या पध्दतीने शिजवितात.
- ★ कुकर,ओव्हन सारखे नवे साधन स्वयंपाक करण्यासाठी आता वापरत आहेत.
- ★ सर्व अन्नपदार्थ एकाच पध्दतीने शिजवत नाहीत.उकडने, भाजने, तळने या पध्दतीने अन्न शिजवितात. अन्न शिजविण्यासाठी वेगवेगळे भांडे वापरतात.
- ★ शिजविण्या आधी पालेभाज्या, भाजीपाल्याना चांगले स्वच्छ धुवून घ्यावे.

SCERT TELANGANA





## हे करा



### विषय आकलन

1. अन्न खाल्ले नाही तर काय होईल?

2. खच्चे खाण्यायोग्य अन्नाची उदाहरणे द्या.

3. खालील पदार्थाचे वर्गीकरन करुन खालील कोष्टकात लिहा.

   पूरी,सपोटा, खजूर, अंडे, कोंबडीचे मास, भेंडी, मासे, बदाम, ऊस, वांगे, संतर, खीर, निंबाचा रस, कच्चा आंबा,पालक, कोतमीर, बिब्याच्या गोडंब्या, हिरव्या मिरच्या, हिरवे केळ, जांब, कांदा, दुदगे, देवडांगर, तराळा, बटाटा, कलझींगड, काजु

| शिजवून खायचे | कच्चे खायचे |
| --- | --- |
| | |

SCERT TELANGANA

4. शिजवून आणि कच्चे दोन प्रकारे खाण्यायोग्य अन्नपदार्थ कोणते?

5. तांदूळ,गहू यापासून तयार होणारे पदार्थ कोणते?


6. तुमच्या घरी कोणकोणते भांडे आहेत?



### चित्र काढु त्यात रंग भरा.

1. तुमच्या घरी भात कशात शिजवितात?तसेच पालेभाजी, भज्जे कशात बनवितात?

2. तुमच्या आवडीचे फळाचे चित्र काढा. त्यांना रंग भरा.





## समाचार कौशल्य-प्रकल्प कार्य

1. तुमच्या कोणत्याही तीन मित्राला विचारुन परवाच्या दिवशी सकाळी,दुपारी,संध्याकाळच्या जेवनात काय काय खाल्लात विचारुन कोष्टकात लिहा.

| क्र.सं. | मित्राचे नाव | सकाळी | दुपारी | संध्याकाळी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

- सर्वांनी खालेला पदार्थ कोणता?
- संध्याकाळी जास्त जनांनी खाल्लेला पदार्थ कोणता?
- सकाळी जेवन न करणारे किती जन आहेत?

2. तुमच्या घरी भात / दाळ /भाजी ... अशा कोणत्याही एका पदार्थास कसे शिजवितात ते निरीक्षण करा. कशानंतर काय करतात चार्टवर लिहून वर्गात लावा.



## प्रश्न विचारणे

1. मेरी रजनीच्या घरी गेली. रजनीची आई स्वयंपाक करतांना पाहिले.मेरीने तीला स्वयंपाकाबद्दल अनेक प्रश्न विचारले. तिने काय काय प्रश्न विचारले असतील? रजनीच्या आईने भाजीपाल्याबद्दल अनेक सूचना दिल्या. तिने कोणत्या सूचना दिल्या असतील?



## मी हे करु शकतो




1. अन्न का खावे सांगू शकतो. होय / नाही
2. कच्चे खायचे व शिजवून खायचे अन्न पदार्थाचे वर्गीकरण करु शकतो.. होय / नाही
3. विविध भांड्यांचे व , भाजीपाल्याचे चित्र काढू शकतो. होय / नाही
4. स्वयंपाक करण्याचा क्रम सांगू शकतो. होय / नाही
5. पोषक पदार्थ नष्ट न करता स्वयंपाक कसा करतात सांगू शकतो. होय / नाही
6. अन्न पदार्थाबद्दल प्रश्न विचारु शकतो. होय / नाही

SCERT TELANGANA





# 8. आपल्या आहाराच्या सवयी



दसऱ्याच्या सुट्टयात शाळेचे सर्व विद्यार्थी हैद्राबादला सहलीला गेले.तेथे वेगवेगळ्या प्रांताचे मित्र मिळाले.त्यासर्वासोबत यांची मैत्री झाली. प्राणी संग्रहालयात प्राणी पाहता पाहता दुपार झाली. ते एका झाडाखाली जमले. घरुन बांधून आणलेले डबे काढून जेवण करीत आहेत. ते सर्व काय खात आहेत पाहू ?




कोणकोण काय खात आहे ते माहीत झाले ना! मग तुमच्या प्रांतात कोणकोणते आहार पदार्थ खातात?

SCERT TELANGANA



आपल्या राज्यातील डोंगराळ भागात, जंगलात राहणारे जंगलात मिळणारे कंदमूळ, टेंबरं,आवळा, बोर, पेरु, उंबर,चार, इत्यादी फळे खातात. तिथ पिकणाऱ्या पिकानुसार खाण्याच्या सवयी आधारीत असतात.

*राजस्थान राज्यात ज्वारी जास्त पिकते. ते ज्वारीची भाकर खातात. तसेच दिल्ली, गुजराथ, मध्यप्रदेश बिहार, इत्यादी राज्यात गव्हाच्या भाकरी, पुरी, जास्त खातात. तमिळनाडू, कर्नाटक, केरळ, तेलंगाना, आंध्रप्रदेश राज्यात दाळ भात खातात.*

एकेका प्रांतात एकेक खाण्याची सवय असते. तसेच विविध संदर्भात विविध प्रकारचे पकवान करुन खातात.सनाच्या वेळी, लग्न प्रसंगी, स्थानीक जत्रेच्या वेळी अनेक प्रकारचे स्वयंपाक करतात. कधी कोणते स्वयंपाक करुन खातात..

| सन / लग्न कार्य / विशेष संदर्भात | स्वयंपाकाचा प्रकार |
|---|---|
| | |

तुमच्या मित्रांना विचारुन ते कोणकोणते स्वयंपाक करतात ते लिहा.



मुलांचे जेवन झाल्यावर प्राणी पहायला निघाले.   .

शरद : सुजाता ! ते कबूतर बघ दाणे खात आहे.

सुजाता : होय ! सर्व कबूतर एकत्र जमून कसे दाणे खात आहेत !

रघू : अली, ते पहा हत्ती ! काय खात आहेत



SCERT TELANGANA







!

अली : अबब ! किती मोठे उसाचे भारे सोंडने तोंडात घालून खात आहे.

आणखी उरलेल्या प्राण्यांना पाहू या.



तुम्हाला ठावूक असलेले प्राणी काय काय खातात ते खालील कोष्टकात लिहा.










| प्राणी /पक्षाचे नाव | त्यांचा आहार |
|---|---|
| गाय | गवत |














आपल्या परिसरात अनेक प्रकारचे प्राणी पक्षी आहेत. आपल्याप्रमाणेच त्यांना सुध्दा आहाराची गरज असते.सर्व प्राण्यांचा आहार एकसारखा नसतो. त्यांच्या आहाराच्या वेगवेगळ्या सवयी असतात. प्राणी,पक्षी निरनिराळे आहार पदार्थ खातात. दाणे,गवत, मांस, मध, दूध.... असे निरनिराळे आहार घेतात.

SCERT TELANGANA





सोनालीच्या घरी आई, बाबा, दादा राहतात. ते कसे जेवन करत आहे ते पहा.



रंगय्याच्या घरी आई बाबासोबत मामा सुध्दा राहतात.ते कसे जेवन करीत आहेत ते पहा.



वरील दोन चित्रात पाहीलात ना। सोनालीच्या घरी कसे जेवत आहेत?

रंगय्याच्या घरी कसे जेवन करीत आहेत?


कुणाप्रमाणे जेवन करणे चांगले असते? का?

कुटूंब सदस्य केव्हा मिळून जेवन करतात? मिळून का जेवन करावे?

SCERT TELANGANA








सनाच्या दिवशी सोनालीच्या घरी पाहूणे आले. सर्वांना एकत्र जेवनाची व्यवस्था करण्यात आली. यांना सोनालीचा भाऊ,बाबा जेवायला वाडले,



वरील चित्राप्रमाणे केव्हा जास्त मानंसं एकत्र मिळून जेवतात.?

जास्त मानंसं जेवत असतांना तुम्ही काय कराल?

साधारणतः लग्नात, वाढ दिवशी, सनाच्या दिवशी सगळे मिळून जेवन करतात, असे जेवल्याने आपण सर्वजन एक आहोत अशी भावना निर्मान होते. दररोज सर्वांनी एकत्र बसुन जेवणे आणि दिवसातल्या घटनां बद्दल ऐकमेकांशी चर्चा करणे चांगले असते.



## सर्वजन सर्व पदार्थ खाऊ शकतात का?


महेश शाळेतून घरी आल्यावर एक भाजलेले मक्काचे कनीस विकत आणले. पाळण्यातल्या भावाला कनीस चारविण्याचा प्रयत्न केला.अरे, लहान मुलाला कनीस चारवू नये, आई म्हणाली. तेव्हा आजोबाला कनीस द्यायला आजोबाकडे गेला व कनीस खा आजोबा, म्हणाला !मला नको, मी खाऊ शकत नाही. आजोबा म्हणाले.

पाळण्यातल्या लहान भाऊला मक्काचे कनीस खाऊ घालू नये असे आई का म्हणते?

आजोबा कनीस का खाऊ शकत नाही म्हणाले?

तुमच्या घरात कनीस कोणकोण खाऊ शकतो?

SCERT TELANGANA





लहान बाळ, म्हातारे मानंसं आनखी खाय काय खाऊ शकत नाहीत? तुमच्या मोठ्यांना विचारुन माहित करुन घ्या की, वयस्क मानंस कोणते पदार्थ खाऊ शकतात? लहान बाळ काय खाऊ शकतो? खालील तक्ता भरा.

| | खाता येणारे पदार्थ | खाता न येणारे पदार्थ |
|---|---|---|
| लहान बाळ | | |
| म्हातारे मानंस | | |
| इतर | | |

म्हाताऱ्यांचे दात पडतात, लहान बाळांना दात नसतात. चावून खाऊ शकत नाहीत. म्हणून त्यांना दुध,मऊ आहार देतात. तसेच म्हातारे मानंसं सुध्दा चावू शकत नाही. अशाप्रकारे वयानुसार सुध्दा आहाराच्या सवयीत फरक असतो.चांगले जेवन जितके महत्वाचे आहे, तितकेच महत्वाचे चांगल्या सवयी आहेत. जेवना आधी हात पाय साबनाने स्वच्छ धुवावे. जेवनानंतर ती जागा स्वच्छ करावी..अन्न पदार्थ जमिनीवर सांडु नये, वाया घालु नये.

## महत्वाचे शब्द

1. मिळून जेवने
2. आहार पदार्थ
3. आहाराच्या सवयी
4. हात पाय धुने

## आपण हे शिकलो

★ एखाद्या प्रांतातील आहाराच्या सवयी तिथल्या पिकावर, तिथल्या मिळणाऱ्या आहारावर आधारीत असते.

★ सणाच्यावेळी, लग्नाच्यावेळी विशिष्ट प्रकारचा स्वयंपाक केला जातो.

★ प्राण्यांना,पक्षांना सुध्दा आहार आवश्यक आहे. यांना सुध्दा निरनिराळया आहाराच्या सवयी असतात.


★ घरी सगळे जन मिळून जेवन करावे. यामुळे सर्वजनांना सर्व आहार पदार्थ मिळतात.तसेच आनंद मिळतो.

★ वयानुसार आहाराच्या सवयी बदलतात.

★ जेवना आधी हात पाय साबणाने स्वच्छ धुवावेत.

SCERT TELANGANA





## हे करा

### विषय आकलन

1. तुमच्या प्रांतात कोणकोणते आहार पदार्थ जास्त जन खातात?
2. गवत खाणाऱ्या व दाणे खाणाऱ्या प्राण्याचे उदाहरण द्या.
3. अन्न अत्यंत मौल्यवान आहे. अन्न वाया जाऊ नये म्हणुन काय करावे? कसे टाळावे?
4. कुत्र्याच्या आहार सवयी व शेळीच्या आहार सवयीतील फरक सांगा?
5. सर्व जन मिळून जेवन करणे का चांगले आहे?
6. खालील पैकी तुम्हाला आहार सवय असेल तर त्या पुढे '✓' करा.

- ◆ जेवन करण्यापुर्वी, नंतर हात पाय स्वच्छ धुतो. ☐
- ◆ जेवतांना ताटाखाली अन्न सांडू देनार नाही. ☐
- ◆ जेवनाच्या भांड्यावर झाकन झापून ठेवतो. ☐
- ◆ अन्न वाया घालनार नाही. ☐
- ◆ रस्त्यावरील अन्न पदार्थ विकत घेणार किवा खानार नाही. ☐
- ◆ सर्वांसोबत मिळून जेवतो. ☐
- ◆ जेवणाआधी व जेवणानंतर प्लेट धुतो. ☐

### चित्र काढा.रंग भरा.

1. खालचे चित्र बघा. त्यात रंग भरा. चित्राबद्दल लिहा.




SCERT TELANGANA



## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. तुमच्या कोणत्याही पाच मित्रांना विचारा की, त्यांच्या घरी केंव्हा मिळून जेवन करतात.खालील कोष्टकात वेळेच्या समोर '✓' लिहा.केव्हा एकत्र बसुन जेवण करतात.


| क्र.सं. | मित्राचे नाव | सकाळी | दुपारी | संध्याकाळी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

कुणाच्या घरात जास्त वेळा सर्वजन मिळून जेवतात? एकत्र सर्वजन केव्हा जेवतात? कोणत्या प्रसंगी?



## कौतूक करणे

1. तुमच्या शाळेतील मित्रापैकी कोणकोण जेवण्याआधी हात पाय स्वच्छ धुतात? प्लेटात शिल्लक जेवन न ठेवता कोण कोण जेवतो? जेवणानंतर जागा कोण कोण स्वच्छ करतो? जर त्या जागी तुम्ही असता तर काय केले असते?



## प्रश्न विचारणे

1. गोपी दुपारी शाळेत हात पाय न धुताच ताट घेवून जेवायला बसला. गोपीचे मित्र त्याला हात पाय धुवून यायला सांगीतले. गोपीने मित्रांना प्रश्न विचारलेय ते प्रश्न कोणते असतील? ते खरे आहेत काय? तुम्ही गोपीला काय सांगाल?




## मी हे करु शकतो



1. प्रांताला अनुसरून आहाराच्या सवयी वेगवेगळ्या असतात हे कळले. होय / नाही
2. प्राणी आणि पक्षांच्या आहाराच्या सवयी विषई सांगू शकतो. होय / नाही
3. सर्वजन मिळून जेवन करण्याचे फायदे सांगू शकतो. होय / नाही
4. आहार पदार्थाचे कोष्टक तयार करु शकतो. होय / नाही
5. चांगल्या आहार सवयी सांगू शकतो, पाळू शकतो. होय / नाही
6. आहाराच्या सवयी विषई प्रश्न विचारू शकतो. होय / नाही

SCERT TELANGANA






# 9. आपले गाव



रंगापुरम गावाभोवताली, लहान लहान टेकड्या आहेत. गावच्या जवळून एक नदी वाहते. गावाला नदी ही एकमेव पाण्याचा आधार आहे. गावात घर जवळ जवळ आहे. गावात एक पाण्याची टाकी आहे. पाणि नळाद्वारे पुरवठा करतात.गावात अनेक काम करणारे लोक राहतात. आता रंगापूर **गावाच्या चित्राचे निरिक्षण करु या.**



वरील चित्राला एका खेड्या गावचे चित्र का म्हणता येते?

वरील चित्राचे निरीक्षण करुन त्या बद्दल चर्चा करा?

वरील चित्राच्या आधारे तुमच्या मते गाव म्हणजे काय असु शकते?






तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21



रंगापूर गाव कसे आहे ते चित्रात पाहिलात ना !रंगापूर गावात आनखी काय काय आहेत ते खालील चित्रात पहा. सांगा.



रंगापूर गावात काय काय आहे?
तुमच्या गावात काय काय आहे?



रंगापूर गावात गल्ली, अनेक प्रकारची घरे, शाळा,मंदीर,मसीद,चर्च,ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र,पशु वैद्यशाळा, शाळा, पोस्ट ऑफीस आहेत ना !हे तुम्हाला माहीत आहे.या सर्वाबद्दल तुम्हाला माहीत आहे काय?

## ग्रामपंचायत कार्यालय,(ग्राम सचिवालय)



हे रंगापूरचे ग्रामपंचायत कार्यालय आहे. गावाला शुध्द पाणि पुरवठा करते, गावातील रस्ते, नाल्या स्वच्छ करते,रस्त्यावरील विद्युत दिवे लावने, हे ग्राम पंचायतीच्या **सदस्याचे** काम आहे.

तुमच्या गावची ग्राम पंचायत काय काय काम करत?.




SCERT TELANGANA

## पोस्ट ऑफीस (डाक घर)




ही टपाल कचेरी आहे. या द्वारे पत्र पोहोंचविने, पैसे जमा करणे, जीवन बिमा यासारखी कामे होतात.

तुमच्या गावातील पोस्ट बॉक्स पाहीलात काय? त्यात काय पोस्ट केले जात असेल?
पोस्ट मॅन कोणती कामे करतो? त्यांचे नाव काय?




## प्राथमिक आरोग्य उपकेंद्र

गावात प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे.यात वैद्य(डॉक्टर), आरोग्य कार्यकर्ते असतात. कार्यकर्ते लोकांना आरोग्याची माहीती देतात.पल्स पोलीओ कार्यक्रम राबवितात. लहान सहान रोगांचे औषध देतात.

तुमच्या गावात पल्स पोलीओचे थेंब कोण पाजतात?
तुमच्या गावात आरोग्य केंद्र आहे का?
ते कोणकोणते कार्य करते?

## पशू वैद्यशाळा

आपण आजारी पडल्यास दवाखान्यात कसे जातो त्याच प्रमाणे प्राणी आजारी पडल्यास त्यांना पशू वैद्य शाळेत घेवून जातात..





प्राण्यांना केंव्हा दवाखान्यात घेवून जातात? विचारुन लिहा. पशू वैद्यशाळा नसती तर काय झाले असते?




## बँक

रंगापुरात लोकसंख्या जास्त असल्यामुळे तिथे ग्रामीण बँक आहे. लोक बँकेमध्ये रुपये जमा करतात. बैंका कर्ज सुध्दा देतात. गावकऱ्यांच्या गरजापूर्ण करण्यासाठी कर्ज हप्त्या हप्त्याने फेडता येते.

बँकमुळे काय काय फायदे आहेत घरच्या वडीलांना विचारुन सांगा.





SCERT TELANGANA

## शाळा



रंगापूर गावात उच्च प्राथमिक शाळा आहे. इथे शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी पुढचे शिक्षण देण्याकरिता नगरात जातात.

> शाळा नसत्या तर काय झाले असते?
> तुमच्या गावातून लोक उच्च शिक्षणासाठी कुठे जातात.



## पाण्याची टाकी

पाण्याच्या टाकीद्वारे पाणी नळात सोडले जाते. आठवड्यातुन एकदा पाण्याची टाकी स्वच्छ केली जाते. त्याआधी पाण्यात क्लोरीन वायू सोडून पाणि शुध्द केले जाते. पाणी वाया घालू नये. नळाचे पाणि वाया घालू नये. जर पाणि वाया जात असेल, कुठे लिकेज असेल तर सरपंचला सुचना करावी. शुध्द पाणी नळात सोडले जाते.

> तुमच्या गावात पाणि कुठून आनतात?
> पाण्याच्या टाकीचे काय फायदे आहेत?

## प्रार्थना मंदीर

खालील चित्र पहा. त्यात काय काय आहे? तिथे कोण कोण जातात? कधी जातात.



असे तुमच्या गावात काय काय आहे? तिथे कोण कोण जातात? कधी कधी जातात.?

SCERT TELANGANA



## रंगापूर गावची वाहतूक

आपण गावाला कसे जातो?

रंगापूर गावाची वाहतूक पाहू या. रंगापूर मध्ये कोणकोणते वाहनं आहेत ते **चित्र पाहुन** सांगा.



रंगापूर गावात सकाळी संध्याकाळी बस येते. जवळपासच्या गावाला जाण्यासाठी लोक ऑटोत जातात. शेतकरी बैलगाडीने शेतीचे काम करतात. विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जवळच्या गावी बसने जातात.

SCERT TELANGANA

तुमच्या गावी कोणकोणते वाहंनं येतात जातात.?
तुमच्या गावचे लोक कशा कशान प्रवास करतात?

रंगापूर गावात आसलेल्या सामाजिक संस्था, प्रवासाच्या साधनाबद्दल मीहीती मिळाली ना**1**!

पण त्या गावचे लोक काय करतात ठाऊक आहे काय? जास्त लोक शेतीच करतात. काही जन मजुरी करतात. गावात अजून अनेक काम करणारे लोक आहेत. कांही गावकरी शिकलेले आहेत आणि कार्यालयात नौकरी करतात. कुंभार, लोहार सुध्दा आहेत. तसेच उच्च कर्मचारी सुध्दा आहेत. तर काही लोक छोटे छोटे दुकान लावुन व्यापार करतात. विद्यार्थी त्या गावच्या शाळेतच शिकतात. मोठी मुल उच्च शिक्षणासाठी दुसऱ्या गावी जातात. गावातील सर्व स्त्रिया सुध्दा शिकलेल्या आहेत. त्या पण काहीना काही काम करुन पैसे कमावतात.

**तुमच्या गावात कोणकोणती कामे करणारे लोक आहेत?**

रंगापूर गावात काय काय आहे माहीत झाले ना !अशा सोई प्रत्येक गावात नसनार नाहीत.सर्व सोई असताल तरच गाव प्रगती करेल.

## महत्वाचे शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | गाव | 2. | ग्रामपंचायत | 3. | बैंक |
| 4. | पशू वैद्यशाळा | 5. | प्राथमिक आरोग्य उपकेंद्र | 6. | पोस्ट ऑफीस |
| 7. | आरोग्य कार्यकर्ता | 8. | प्रार्थना मंदीरे | 9. | दळन वळनाची साधने |
| 10.. | सामाजिक संस्था | 11. | जीवन बीमा | 12. | पोलीओचे थेंब |

## आपण काय शिकलो?

★ साधारणतः गावात ग्रामपंचायत, बँक, पशू वैद्यशाळा,शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, पोष्ट ऑफीस,मंदीर, मसीद, चर्च असतात.

★ ग्रामपंचायत नाल्या स्वच्छ करुन घेने, रस्त्यावरील विद्युत दिवे लावणे,रस्ते स्वच्छ करणे,शुध्द पाणि पुरवठा करणे, यासारखी कामे करते.

★ गावात, बँक, पोष्ट ऑफीस,शाळा, पशू वैद्यशाळा, आरोग्य केंद्र सारख्या संस्था असल्यामुळे खूप फायदा होतो.

★ गावात दळण-वळणाच्या सोयी असतात..मार्गवर अनेक प्रकारची वाहणे येत जात असतात.

★ गावात विविध कामे करणारे लोक राहतात.

SCERT TELANGANA

## हे करा




### विषय आकलन

1. रंगापूर गावात काय काय आहे?
2. तुमच्या गावात / गल्लीत असलेल्या प्रार्थना मंदिराची नावे लिहा.
3. तुमच्या गावात शाळा नसेल तर काय होईल?
4. गावा-गावात बँक असल्याने काय फायदे होतात?
5. बँक व पोस्ट ऑफीस मधील साम्य आणि फरक सांगा?



### चित्र काढा रंग भरा

1. शाळेचे चित्र काढून त्यात रंग भरा.






### समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. रंगापूर गावात काय काय संस्था आहे ते खालील कोष्टकात लिहा.त्यापैकी तुमच्या गावात काय काय आहे त्या समोर ' ✓ ' लिहा.

| | रंगापूर गावात असणारे संस्था | तुमच्या गावात असणारे संस्था |
|---|---|---|
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |
| 5. | | |


SCERT TELANGANA



- रंगापूर गावासारखे संस्था तुमच्या गावात काय काय आहे?
- रंगापूर गावासारखे तुमच्या गावात काय नाही?
- रंगापूर गावात नसून तुमच्या गावात असलेले काय आहे?

2. तुमच्या गावातील सामाजिक संस्थांची नावे लिहून त्यांचे कार्य लिहा.

| क्र.सं.. | सामाजिक संस्थांची नावे | त्यांचे कार्य |
|---|---|---|
| | | |



## कौतूक करणे

1. गावात, शाळा, बॅंक, पोस्ट ऑफीस, वैद्यशाळा, इत्यादीचे काय फायदे आहेत ते आपण पाहिलेत ना !त्यांच्या सेवेचे माहिती करुन सांगा.



## प्रश्न विचारने

1. चिन्नय्या रंगापूरला गेला. रंगापूर बद्दल त्याला माहीती घ्यावीसी वाटली. म्हणून तो शाळेत जावून शिक्षकांना मिळाला. गावाबद्दल विचारला.चिन्नय्याने कोणते प्रश्न विचारले असतील? शिक्षक कोणती उत्तरे दिले असतील? .





## मी हे करु शकतो का?

1. गाव म्हणजे काय? सांगू शकतो. होय / नाही
2. गावातील सामाजिक संस्थां कोणत्या व त्यांचे कार्य सांगू शकतो. होय / नाही
3. गावातील संस्था व त्याची कार्ये ठऊक झाली. त्यांचा उपयोग करु शकतो. होय / नाही
4. शाळेचे चित्र काढून रंग भरु शकतो. होय / नाही
5. गावाबद्दल प्रश्न विचारु शकतो. होय / नाही

SCERT TELANGANA

# 10. घराचे विविध प्रकार




आपल्या सर्वांना राहण्यासाठी घर पाहीजे. ऊन, पाऊस, थंडी, धूळ, यापासून आपले रक्षन करण्यासाठी आपण घरात राहतो. आपल्याप्रमाणेच पक्षी,प्राणी सुध्दा घर तयार करतात. आपली घरे एकसारखी असतात काय? एके दिवशी सायंकाळी शेतातून आई,बाबा सोबत संतोष, सरला घरी येत आहेत. सरला,संतोष बाजूच्या टेकडीवर चढले. टेकडीवरुन गावातील घंरं पाहीले. ते कसे दिसले, त्यात कोणत्या प्रकारची घरे आहेत पाहू या का !



घरं सगळी एक सारखी आहेत काय? कोण कोणत्या प्रकारची घरं आहेत? गावतील घरं बाजू बाजूला आहेत का दूर दूर आहेत?



सरलाच्या गावातील घरे कशी असतात पाहीलस ना ! गावाना घरे बाजु-बाजूला असतात. मग तुमच्या गावात सुध्दा तशीच घरं आहेत का? तुमच्या गावात कोणकोणत्या प्रकारची घरं आहेत ते लिहा. गावातील घरे बाजू बाजूला असल्याचे फायदे सांगा?





SCERT TELANGANA

## तात्कालिन घर:



संतोष शाळेत आला.तो चिंतीत असलेला जोसफने पाहीले. 'का चितीत आहेस?' जोसफने विचारले. 'रात्री वारा पाऊस आला होता ना ! आमच्या झोपड्या सर्व पडून गेल्या' असे संतोष म्हणाला. 'आता तुम्ही कुठे राहात आहात?' जोसफने विचारले. 'आमच्यासाठी गावाबाहेर तंबू घातले आहेत' असे संतोष म्हणाला.

तुम्ही कधी तंबू पाहीलात काय? कधी पाहीलात? तंबू का घालतात? विचार करा.




गाव गाव भटकनारे लोक ,सर्कसवाले. तात्कालिक घर तयार करतात.पूर, तूफान, सुनामी,भूकंप, अग्नी अपघात झाल्यास बेघर झालेल्या लोकांसाठी तात्कालिक तंबू तयार करतात..

संतोष त्याच्या मामच्या गावी हैद्राबादला लग्नासाठी गेला.गावी जात असतांना त्याने मोठ मोठे पाईप पाहीले. त्यात काही जन रहात होते. ते पाहून संतोषला आश्चर्य वाटले. असे पाईप मध्ये सूध्दा लोक राहातात का? मनातल्या मनात म्हणाला. 'पाईप मध्ये का राहात आहेत?' असे मामाला विचारले. मामा काय उत्तर दिले असतील विचार करा. .









तंबूत, पाईपमध्ये राहणाऱ्या लोकांना कोणत्या सोई राहात नाहीत ते लिहा.
तंबूत, पाईपमध्ये राहणाऱ्या लोकांना कोण कोणत्या अडचणी असतात? विचार करा आणि लिहा

दुष्काळाच्या वेळी, गावात कामे नसतांना काही जन रोजगारासाठी शहरात जातात. अशा लोकांना राहण्यासाठी घरं राहात नाहीत. म्हणून असे लोक रस्त्याच्या बाजूच्या पाईपात, रिकाम्या जागी तंबू किंवा झोपडी घालून राहातात.




संतोषने शहरातले मोठंमोठे घरं पाहीले. 'अबब ! किती उंच घरात कोण राहतात असे त्याने मामाला विचारले.शहरात जागा खूप कमी राहते. म्हणून कमी जागेत जास्त मानंसं राहण्यायोग्य मोठ मोठे घरं बांधतात. यांना अपार्टमेंट म्हणतात. असे मामा म्हणाले.




असे घरं तुम्ही कधी पाहीलात का?

अपार्टमेंट शहरात जास्त असतात.साधारणतः एका घरात एक कुटुंब राहाते.अपार्टमेंटध्ये खूप कुटूंब राहातात.असे खूप कुटुंब राहण्या योग्य अपार्टमेंट बांधतात. यात एक कुटूंब राहण्याच्या जागेला फ्लॅट म्हणतात. एका अपार्टमेंट 10 ते 30 कुटींब राहण्यासाठी प्लॉट असतात.मोठ्या शहरात 100 प्लॉट असनारे सुध्दा अपार्टमेंट असतात.

SCERT TELANGANA





तंबू,पाईप,अपार्टमेंट बद्दल माहीती मिळाली ना ! आता खालील चित्र बघा.यापैकी तुमचे घर कसले आहे ते सांगा.





तुमच्या मित्राचे घर कसे आहे ते कशा घरात राहतात विचारा व खालील कोष्टकात लिहा.

| मित्राचे नाव | घराचा प्रकार |
|---|---|
| 1 | |
| 2 | |
| 3 | |
| 4 | |
| 5 | |

तुमच्या प्रमाणेच तुमच्या मित्राने सुध्दा कोष्टक तयार केले ना ! तुमच्या वर्गातील मित्र कशा घरात राहतात त्यांना विचारुन माहीती घ्या. जास्त जन कशा घरात राहात आहेत ते लिहा.

## तुम्हाला हे माहीत आहे का?



हे लाकडाने बांधलेले घर आहे. हो भूकंप येणाऱ्या प्रांतात बांधतात.




हे जहाजातले घर आहे.कश्मीर, केरळ, राष्ट्रात अशी घरे आहेत.



हे बर्फाने बांधलेले घर आहे. याला इग्लू म्हणतात.ही बर्फाळ भागात राहतात.

SCERT TELANGANA







## घराचे छप्पर

घराबद्दल माहीती मिळाली ना !

घराचे छप्पर म्हणजे माहीत आहे का मग ! घरावर झाकलेल्या भागाला छप्पर म्हणतात. खाली काही छप्पराचे चित्र दिलेले आहेत ते पहा.




सर्व घराचे छप्पर एकसारखे असतात का? काही घराचे छप्पर पाटीसारखे सपाट असतात तर काहीचे तिरपे असतात. तुमच्या गावातील घरांचे छप्पर जास्त कोणत्या प्रकारचे आहेत ते सांगा.

घराचे छप्पर तिरपे का असते माहीत आहे का?



**हे करुन पहा:-** तीन पत्रे /पाट्या /अड्डे घ्या. त्यापैकी एकाला जमीनीवर ठेवा. दुसऱ्याला एका विटेवर ठेवा. तिसऱ्याला दोन विटेवर ठेवा.यापैकी कोणते तिरपे आहे?



जमीनीवर ठेवलेले पत्र    एका विटेवर ठेवलेले पत्र    दोन विटेवर ठेवलेले पत्र

SCERT TELANGANA



आता एका ग्लास मध्ये पाणी घेवून पहील्या पत्रावर ओता.नंतर दुसऱ्या पत्रावर ओता. नंतर तीसऱ्या पत्रावर ओता. कोणत्या पत्रावरील पाणी लवकर जमीनीवर पडते?

## कारण सांगा.

छप्पर तिरपे असल्याने पाणी वेगात खाली पडते. म्हणूनच घराचे छप्पर तिरपे बांधतात.यामुळे पावसाळ्यात पाऊस पडतांना छप्परावरचे पाणी घसरुन खाली पडते आणि पाणी एकाच ठिकाणी साचुन राहत नाही.

इमारतीचे छप्पर तिरपे राहात नाही ना.. मग छप्परावरचे पाणी घसरुन कसे पडते?

इमारती, अपार्टमेंटचे छप्पर सपाट दिसत असले तरी थोडे तिरपे असते.छप्परावर पडलेले पाणि एका बाजूला जमा होण्याची सोय केली जाते.तिथून पाइपाद्वारे पाणि खाली सोडले जाते.

आपले घरं विविध प्रकारची असतात. जसे-कवलुचे घर,गवताचे घर, झोपडी,तंबू घर,पत्राचे घर, सारखी घरे अधिक पहायला मिळतात.हे शाश्वत निवास आहेत. तंबू, पाइप सारखे तात्कालीक निवास सुध्दा असतात.शहरात अपार्टमेंट असतात.तसेच काही ठीकाणी गरजेला अनुसरुन घरे बांधली जातात.

## महत्वाचे शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | घराचे प्रकार | 2 | संचार करणारे लोक | 3. | अपार्टमेंट |
| 4. | प्लॉट | 5. | तिरपे छप्पर | 6. | घराचे छप्पर |
| 7. | इग्लू | 8. | जहाज घर | 9. | तात्कालीक निवास |

## आपण काय शिकलो.

★ झोपडी, गवताचे घर, कवेलुचे घर,पत्राचे घर, तंबू घर,अपार्टमेंट अशा प्रकारची घरं असतात.


★ पूर, तूफान आल्यावेळी तात्काळीक घर तयार करतात.भटके लोक, स्थलांतरीत लोक तंबू घरा सारख्या तात्कालिक घरात राहतात.

★ शहरात अपार्टमेंट असतात त्याचप्रमाणे काही प्रांतात बर्फाची घर, लाकडाची घरे, जहाज घर सुध्दा असतात.

★ घराचे छप्पर तिरपे असल्यामुळे पावसाचे पाणी लवकर घसरुन खाली पडते.

SCERT TELANGANA





## हे करा

### विषय आकलन

1. खालील दिलेल्या घरापैकी तात्कलीक घरे ओळखा? कारणे सांगा.

   तंबू घर, अपार्टमेंट,  पत्राचे घर,पाइपाचे घर.

2. तुमच्या परिसरातील चार प्रकारच्या घरांची नावे सांगा.

3. घराचे छप्पर तिरपे का असते?


4. खालील दोन घरातील साम्य आणि फरक सांगा. लिहा.





### चित्र काढा रंग भरा

1. खालील चित्र काढा व त्यात रंग भरा.



.2. तुमच्या घराचे चित्र काढून त्यात रंग भरा. घराबद्दल माहिती लिहा?

SCERT TELANGANA





## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. तुमच्या आजु बाजूचे काही घरं पहा. त्यांचे छप्पर कसे आहे ते खालील कोष्टकात लिहा.

| क्र.सं. | घराचा प्रकार | घराचे छप्पर | |
|---|---|---|---|
| | | सपाट छप्पर | तिरपे छप्पर |
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |
| 6. | | | |

1) कोणत्या प्रकारची घरे जास्त आहेत? ................................


2) घराच्या छप्परा बद्दल लिहा? ................................

2. बेंड, कागद, अट्टे, लाकडाच्या काड्या, गवताचा उपयोग करुन घराचा नमूना तयार करा.




## कौतूक करणे

1. झोपडीत, तंबू घरात राहणाऱ्या लोकांना आपण काय मदत करु शकतो.




## प्रश्न विचारने

1. हैद्राबादमध्ये जोसफ अपार्टमेंटमध्य राहणाऱ्या, पाईप घरात राहणाऱ्या लोकांना पाहीला ना ! त्या घराबद्दल जोसफने मामाला अनेक प्रश्न विचारले. त्याने कोणते प्रश्न विचारले असतील? तुम्ही कोणते प्रश्न विचाराल?




## मी हे करु शकतो



| | | |
|---|---|---|
| 1. | विविध प्रकारच्या घरा बद्दल माहीती सांगू शकतो. | होय/ नाही |
| 2. | सपाट छप्पर व तिरप्या छप्परामधील फरक सांगू शकतो. | होय/ नाह |
| 3. | विविध प्रकारची घरे काढून त्यात रंग भरु शकतो. | होय/ नाही |
| 4. | घरासंबंधी माहीती गोळा करुन कोष्टकात लिहू शकतो. | होय/ नाही |
| 5. | विविध प्रकारच्या घरासंबंधी प्रश्न विचारु शकतो. | होय/ नाही |

SCERT TELANGANA





# 11. स्वच्छ घर - सुंदर घर



एके दिवशी रंगय्या अणि मुलगा मुरली त्यांचा मित्र केशवला भेटायला इंद्रवेल्ली गावला गेले. ते एक आदिवाशांचे गाव आहे. त्या गावात रंगय्याच्या ओळखीचे पुष्कळ लोक आहेत. रस्त्यातील ओळखीच्या मानसांना बोलत बोलत तो केशवच्या घरी पोहोंचला.मुरली ! “हेच केशव मामाचे घर” रंगय्या म्हणाला.


मग केशवचे घर कसे आहे पाहू या का?



मामाचे घर किती छान आहे, असे मुरली का म्हणाला?

घराच्या भिंतीवर काय आहे?

तुमचे घर सुध्दा असेच आहे का? काय फरक आहे?





रंगय्या मुरली चार दिवसानंतर परत त्यांच्या घरी आले.शाळेत मुरलीची जहांगीर सोबत पक्की मैत्री झाली.



जहांगीरने मुरलीला त्याच्या घरी घेवून गेला. जहांगीरच्या घरासमोर फुलांची झाडे होती . ते पाहून मुरली म्हणाला, फुले किती सुंदर आहेत ! आमच्या घराच्या भोवताली आणखी खूप फुलझाडे आहेत असे जहांगीर म्हणाला.



जहांगीरच्या घरासमोर काय काय आहे?
चप्पल कुठे आहेत?


जहांगीर, मुरली घरात गेले जहांगीरचे घर पाहून मुरलीला फार आनंद झाला.तुमचे घर खूप छान आहे, मुरली म्हणाला. मुरली असे का म्हटला असेल?



घरात पुस्तके कुठे आहेत? कसे आहेत?
कपडे कुठे आहेत?
घराच्या भिंती कशा आहेत?

SCERT TELANGANA







रविवारी मुरली आणि तिची ताई सरीता मिळून विजयच्या घरी गेले. विजयचे घर बघा.



विजयच्या घरासमोर फेकून दिलेल्या प्लास्टीक पिशव्या, फाडलेले कागंदं,दिसले.मुरली, सरीता दोघे विजयच्या घरी गेले.विजयच्या घरात असे दिसले.




विजयचे घर कसे आहे पाहीलेत ना ! घर असेच असावे का? विचार करा?





SCERT TELANGANA



विजयच्या घरासमोर काढून व भरुन टाकायचे काय काय आहे. सांगा. लिहा.

घरा समोरची जागा कशी स्वच्छ ठेवता येते ते सांगा?

चप्पल कुठे आहेत ते कसे ठेवावते?

घरात डॉस, माशा, का आहेत?

कपडे कुठे आहेत? कपडे कसे ठेवावेत?

पुस्तके खेळ सामुग्री कुठे आहेत? तुम्ही असता तर कुठे ठेवले असते?

जहॉगीर, विजयच्या पैकी तुम्हाला कुणाचे घर आवडले? का?




मुरलीचे बाबा, आई, अक्का सगळे मिळून पाहूण्यांच्या घरी लग्नाला गेले. आठवड्यानंतर घरी परत आले. त्यांचे एका खोलीचे लहान घर आहे.घरी येताच समोर वाऱ्याने उडून आलेला कचरा दिसला. फर्शीवर सगळी धूळ जमली होती. झाडूने कचरा गोळा करुन कचरा कुंडीत टाकला. पाण्याने घर स्वच्छ धूतले.सर्वजन मिळून घर स्वच्छ करु लागले.सरीता व मुरलीने खोलीतील पुस्तकांना अलमारीत ठेवले.

झाडांना पाणी टाकले.सरीताने टी.व्ही. वरचा कचरा पुसून काढला. टी.व्ही वर फोटो आणि खेळण्या ठेवल्या. मुरलीचे आई,बाबाने स्वयंपाक घरातील सामान सावरुन घेतले.ते कसे घर सावरले ते चित्रात बघा.



SCERT TELANGANA







मुरली व सरीता प्रमाणे तुम्ही सुध्दा घर स्वच्छ करता काय?

तुमच्या घराला स्वच्छ ठेवाल काय? कसे?

अभ्यास केल्यानंतर पेन, पेंन्सील, वह्या, पुस्तके कुठे ठेवाल?

तुमचे कपडे तुम्हीच सावरुन घेत आहात काय? नाही तर मग कोण सावरत आहे?

घरी फाडलेले कागदं, जमा झालेली धूळ दिसली तर तू काय करशील?

काही घरं पहायला सुंदर असतात. काही घरांना पाहील्यास त्याला आणखी सावरु शकतो असे वाटते. काही घरांना पाहील्यास खूपच घान दिसतात. गवताचे घर असो की कवेलूचे घर असो, घरातल्या वस्तू व्यवस्थीत मांडून, स्व च्छ ठेवल्यास  ते सुंदर दिसतात.

आपल्या घरातील जमा झालेली धूळ,धूर, व्यर्थ पदार्थ स्वच्छ न करता तसाच ठेवला तर काय होईल?



प्रत्येक घरात थोडा फार कचरा असतोच तुम्हीच ते झाडून स्वच्छ करावे.आपल्या घरातील कचरा, धूळ व्यर्थ पदार्थ कुठे टाकल्यास ठीक राहील ते सांगा. खालील चित्र पहा.







चित्रात कचरा कुठे फेकत आहेत?

कचरा कुठे टाकावा?

तुमच्या घरचा कचरा कुठे टाकतात?

तुमच्या गल्लीतील कचरा कोण व केंव्हा काढतो?

SCERT TELANGANA

घरातील कचरा,व्यर्थ पदार्थ, धूळ स्वच्छ न करता तसेच ठेवल्यास घान वास सुटतो. माशा,डास घरी येतात. असे अस्वच्छ घर पहायला घान दिसते. अशा घरात रहायला नको वाटते. तसेच आरोग्य बिघडते.म्हणून व्यर्थ पदार्थ जमा झाला की लगेच काढून टाकावा. घर स्वच्छ ठेवावे.

## महत्वाचे शब्द

1. सुंदर घर
2. वस्तू सावरने
3. घर स्वच्छ करणे
4. घरातील व्यर्थ पदार्थ

## आपण काय शिकलो

★ घर स्वच्छ ठेवणे, घरातील वस्तू नीट सावरुन ठेवण्यामुळे घर स्वच्छ दिसते.

★ घरातील वस्तू अस्त व्यस्त ठेवल्यामुळे अस्वच्छ दिसते. तसेच आपली गैरसोय होते.

★ घराला स्वच्छ ठेवण्यासाठी घरातील कचरा, कचरा कुंडीत टाकावा.

★ घर स्वच्छ ठेवण्यासाठी आवश्यक कामात मदत करावी.

## हे करा



### विषय आकलन

1. घर कशाने अस्वच्छ होते?
2. तुम्ही घर स्वच्छ करण्यासाठी केलेले चार काम सांगा. लिहा.
3. तुमचे घर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज जे काम करता त्यावर '✓' लिहा.

◆ पुस्तके सावरतो. ☐

◆ झोपेतून उठल्यावर माझे मी अंथरुन काढतो.. ☐

◆ चप्पल दररोज ठेवायच्या जागीच ठेवतो. ☐

◆ फर्शी झाडतो व पाण्याने पुसून स्वच्छ करतो. ☐

◆ घरातील कातीनीचे जाळे काढतो.. ☐

◆ झाडांना दररोज पाणी घालतो. ☐

◆ घरातील कचरा कचऱ्याच्या कुंडीतच टाकतो. ☐

◆ प्लास्टीक बॅग वापरणार नाही. ☐

4. घरातील कचरा वेळोवेळी काढून टाकला नाही तर काय होईल?
5. स्वच्छ घर हेच सुंदर घर असे का म्हणतात?

SCERT TELANGANA







## चित्र काढा रंग भरा

1. या धड्यातील सुंदर सुंदर घरांचे चित्र काढून त्यात रंग भरा.




## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. तुमच्या मित्राच्या घरी जा.त्यांचे घर कसे आहे ते कोष्टकात लिहा.

| | मित्राचे नाव | घर स्वच्छ आहे की नाही | कशामुळे |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |

कुणाकुणाची घरे स्वच्छ आहेत? कशामुळे?कुणाकुणाची घरे अस्वच्छ आहेत? कशामुळे? स्वच्छ राहण्यासाठी तुम्ही काय कराल?



## कौतूक करणे

1. रवी सायंकाळी शाळेतून घरी आला.घरासमोर अस्तव्यस्त चप्पल पडून अस्तव्यस्त पडून होत. वाळू घातलेले कपडे खाली पडून लोळत आहेत.हे सगळे न पाहता रवि बॅग फेकून खेळायला निघून गेला.असे करणे बरोबर आहे का? रविच्या जागी तुम्ही असता तर काय केला असता?



## प्रश्न विचारने

1. मुरली, सरिता मिळून विजयच्या घरी गेले. विजयचे घर अस्वच्छ होते.त्या अस्वच्छ घराविषई मुरली सरिताने कोणते प्रश्न विचारले असतील.विजयने कोणती उत्तरे दिले असतील?





## मी हे करु शकतो का?

| | | |
|---|---|---|
| 1.. | स्वच्छ व अस्वच्छ घरातील फरक सांगू शकतो. | होय / नाही |
| 2. | घर स्वच्छ करण्यासाठी मी सुध्दा मदत करेन. | होय / नाही |
| 3. | कुणाकुणाची घरे स्वच्छ आहेत? त्याचे कारण काय? याची माहीती गोळा करुन कोष्टकात लिहू शकतो. | होय / नाही |
| 4 | सुंदर घराचे चित्र काढू शकतो. | होय / नाही |
| 5. | अस्वच्छ घराबद्दल प्रश्न विचारु शकतो. | होय / नाही |

SCERT TELANGANA



# 12. मातीचे मोती



गणेश चर्तुर्थी सण आला. गौतमीने तीच्या घरी बाहूल्याची गॅलरी लावायचे ठरविले. त्यासाठी ती आजोबाला बाहुल्या विकत आणु अशी म्हणाली. गौतमी व तिचे आजोबा बाजारात गेले. बाजारात एका ठिकाणी रंगबिरंगी बाहुल्या दिसल्या

गौतमी : आजोबा ! ही टेलीफोन रीमोटची बाहुली बघा. किती छान आहे !

आजोबा : त्या प्लास्टीकने बनविलेल्या बाहुल्या आहेत.





गौतमी : आजोबा ! ह्या बाहुल्या बघा, बघा गुळगुळीत आहेत !

आजोबा : त्या लाकडाने तयार केलेल्या बाहुल्या आहेत.आपल्या राज्यात निर्मल प्रांतात ह्या बाहुल्या प्रसीध्द आहेत.



गौतमी : आजोबा ! ह्या गणपतीच्या मुर्त्या बघा. किती छान आहेत? या विकत घेवू या.


आजोबा : त्या बाहुल्या दिसण्यास छान, सुंदर आहे पण त्या प्लास्टट ऑफ पॅरीस नी बवविलेल्या आहेत. पर्यावरणास त्या हानिकारक आहेत. या मातीच्या बाहुल्या आहेत. ह्या बाहुल्या सर्व बाहुल्या पेक्षा स्वस्त आहेत. या बाहुल्या मुळे पर्यावरणास कसलीच हानी होत नाही.



गौतमीला त्या मातीच्या बाहुल्या फार आवडल्या. त्यांनी ते विकत घेवून पुढे निघाले. थोडे दूर गेल्यावर तिथे निरनिराळे दिवे दिसले. आजोबा ! हे पण विकत घेवू या गौतमी म्हणाली. ह्या बाहूल्या सुध्दा मातीनेच तयार केलेल्या आहेत, ठाऊक आहे का तुला? आजोबा म्हणाले. गौतमीने आश्चर्याने त्या पणत्यांना पाहिले.

SCERT TELANGANA







# तुम्हाला हे माहीत आहे का?



SCERT TELANGANA



विनायक चतुर्थीसाठी मातीच्या किंवा प्लास्टट ऑफ पॅरीसच्या मुर्त्या तयार केल्या जातात. आपण मातीच्या मुर्त्यांचाच वापर केला पाहिजे. कारण त्या पाण्यात सहजपणे विरघळतात ज्यामुळे पाण्याचे प्रदुषण होत नाही.



## मातीने बाहुल्याच नव्हे तर आणखी काय काय बनवितात



खालील चित्र बघा.यांना काय म्हणतात? हे सर्व कशाने तयार करतात ठाऊक आहे काय? याचा कशासाठी उपयोग करतात?













अशाप्रकारच्या मातीने तयार केलेल्या वस्तू तुमच्या घरी आहेत काय? त्यांची नावे सांगा.




मातीने तयार होणाऱ्या वस्तू आपण शिकलो. रांजने, सुरई, मडके, यांना पाणि भरुन ठेवण्यासाठी वापरतात. उन्हाळ्यात यात पाणि खूप थंड राहते. आपल्या राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातील रांजने प्रसीध्द आहेत. मातीच्या मोठ्या भांड्यात धान्य (तांदूळ, ज्वारी) साठवीतात. जनावरांना पाणि पाजण्यासाठी मातीच्या मोठया भांड्याचा वापर करतात. ज्याला ड्रम म्हणतात.

दिवाळी सणाच्या दिवशी मातीच्या दिवटाण्यात दिवे लावतात. धातु आणि ग्लास दिवे पण असतात. कुंडीत फुलाची झाडे लावतात.त्या कुंड्या सुध्दा मातीनेच बनविलेल्या असतात. तुम्हाला माहित आहे का हे कसे करतात?

SCERT TELANGANA







मातीच्या वस्तू कशा बनवितात, तुम्हाला ठाऊक आहे का? राजय्या माती आणून मडके तयार करतो. तो मडके कसे तयार करतो खालील चित्रात पहा.



मडके तयार करण्यासाठी राजय्या चिकन माती आनतो.




चिकण मातीत पाणि टाकून, भिजवून पायाने खूप वेळ चिखलाला तुडवून नऊ बनवितो.




चिखलाचे उंडे घेवून फीरत्या चाकावर ठेवतो. हाताने मडक्याचा आकार देतो.



(सरे)
चाकावर तयार झालेल्या मडक्याला योग्य आकार देण्यासाठी लाकडाच्या फळीने (सालपा)मारतो.



तयार झालेले मडके आधी सावलीत वाळू घालतो. नंतर उन्हात वाळवितो.



वाळलेल्या मडक्यांना भट्टीत भाजतो.

SCERT TELANGANA



अशाप्रकारे तयार झालेले मडके,रांजनं, कुंड्यांना बाजारात नेवून विकतात. मडके विकत घेतांना त्यावर बोटाने मारल्यास टंग असा आवाज येतो.असा आवाज आला तरच विकत घेतात. तसे का करतात विचार करा.



मातीचे भांडे वापरण्यास फार छान असतात. आपले पुर्वज अधिक तर मातीचे भांडेच वापरायचे. याची किंमत सुद्धा फार कमी असते.




मातीने वेगवेगळ्या वस्तू तयार करतात. त्याचा आपण वापर करतो. गौतमी एकदा तिच्या नातेवाईकांच्या घरी गेली. त्यांच्या घरी अनेक प्रकारच्या वस्तू पाहीली. त्या वस्तू प्लास्टीक, ॲल्यूनियम, माती, लोखंड, स्टील, लाकूड इत्यादीने तयार केलेले होते. तीने घरात काय काय पाहीले असेल? ते कशाने बनलेले असतील? माती आणि इतर सामग्रीने तयार केले असतीतल का? ते खालील कोष्टकात लिहा.

| क्र. सं. | पाहीलेल्या वस्तू | ती कशाने तयार केलेली आहेत त्यावर ‘ ✓ ’लिहा | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्टील | प्लास्टीक | ॲल्यूमिनीयम | माती | लाकूड | लोखंड |
| 1. | बकीट | | ✓ | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

घरामध्ये कशाने तयार केलेले भांडे जास्त वापरतात?
घरामध्ये कशाने तयार केलेले भांडे कमी वापरतात?
दिवसंदिवस मातीच्या भांड्याचा वापर का कमी होत आहे.?

SCERT TELANGANA





## अबब ! किती छान आहेत!



गौतमीने तिच्या नातेवाईकांच्या घरी विविध प्रकारच्या पालेभाज्या,फळे पाहून किती छान आहेत असे ती म्हणाली. त्यांना हातात घेवून बघीतली. आश्चर्य चकीत झाली. कारण माहीत आहे ! ते सर्व मातीचे असून त्यांना रंग दिला होता. ते नमुने तुम्ही पण पहा. असे तुम्ही पण तयार करु शकाल. चिकन माती घेवून त्यात पाणि मिसळा.नीट चुरुन मऊ बनवा, त्या मातीने पाले भाज्यांचे आणि फळांचे आकार बनवा. त्यास रंगवा.


### महत्वाचे शब्द

1. लाकडी खेळणी, बाहुल्या
2. मातीच्या बाहुल्या
3. मातीचे भांडे
4. चिकन माती
5. फळी
6. कुंभाराचे चाक

### आपण काय शिकलो ?

★ मातीने मडके, रांजनं, सुरई, कुंड्या, बाहुल्या तयार करतात.
★ बाहुल्यांच्या गॅलरीत मातीच्या बाहुल्या सुध्दा ठेवतात.
★ चिकन माती आणि चाकाच्या सहायाने मडके तयार करतात.
★ विनायक चवतीच्या दिवशी मातीने तयार केलेल्या मुर्त्यांच वापराव्या.
★ आपले पूर्वज मातीचे भांडेच वापरत होते.
★ या काळात मातीच्या भांड्यांचा वापर कमी झाला आहे.

### हे करा



### विषय आकलन

1. मातीपासुन तयार केलेल्या तीन वस्तुची उदाहरणे सांगा. लिहा.
2. स्टीलचे भांडे व मातीचे भांडे यातील फरक सांगा. लिहा.
3. तुमच्या घरात मातीच्या कोणकोणत्या वस्तू आहेत? त्याचा काय उपयोग होतो?







SCERT TELANGANA



## चित्र काढा रंग भरा

1. खालील चित्र काढा व रंग भरा.







## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. बाजारला जावून तिथे कोणकोणते मातीचे भांडे विकत आहेत ते लिहा. तसेच त्यांचा भाव माहीत करुन घ्या आणि एक कोष्टक तयार करा?

2. मातीने वेगवेगळया पालेभाज्या, फळे तयार करा. त्यांना रंग द्या.



## कौतूक करणे

1. मातीने वेगवेगळया पालेभाज्या, फळे, बाहुल्याचे नमुने तयार करता येतात हे शिकलात. अशा मातीने तयार केलेल्या वस्तू वापरल्याने काय फयदा होतो. राजय्या सारखा मानंसं भेटली तर त्यांचे कसे अभिनंदन कराल?



## प्रश्न विचारणे

1. तुमच्या वर्गात मातीच भांडे बनविणारा राजय्या, बाहुल्या तयार करणारी सीतम्मा आल्यास तुम्ही कोणते प्रश्न विचाराल.




## मी हे करु शकतो का?



| | | |
|---|---|---|
| 1. | मातीचे भांडे व इतर भांड्यामधे काय साम्य आणि फरक आहे सांगू शकतो. | होय /नाही |
| 2. | मातीचे मडके कसे तयार करतात ते सांगू शकतो. | होय /नाही |
| 3. | मातीने विविध प्रकारचे फळे भाज्या, बाहुल्यांचे नमुने बनवू शकतो. | होय /नाही |
| 4. | मातीच्या भांड्यांचे चित्र काढून त्यात रंग भरु शकतो. | होय /नाही |
| 5. | मातीने कोणकोणत्या वस्तू बनवितात ते सांगू शकतो. | होय /नाही |
| 6. | मातीच्या भांड्या आणि बाहुल्या विषयी प्रश्न विचारु शकतो. | होय /नाही |

SCERT TELANGANA





# 13. रंगीबेरंगी कपडे



लक्ष्मी तिच्या आई बाबा सोबत बाजारात सणा निमित्त नवीन कपडे घ्यायला गेली. त्यांनी दुकानात अनेक प्रकारचे कपडे पाहीले. आई बाबाने लक्ष्मीसाठी व तिच्या भावासीठी कपडे विकत घेतले. आई बाबाने सुध्दा त्यांच्यासाठी कपडे विकत घेतले. कुणाकुणासाठी कोणकोणते कपडे विकत घेतले कल्पना करा.त्यांची नावे खालील कोष्टकात लिहा..

| लक्ष्मीसाठी विकत घेतलेल कपडे | लक्ष्मीच्या भावासाठी घेतलेले कपडे | आईसाठी घेतलेले कपडे | बाबासाठी घेतलेले कपडे |
|---|---|---|---|
| | | | |



लक्ष्मी व तिचा भाऊ लहान आहेत! आई बाबा मोठे आहेत. यांनी सर्वांसाठी सारखे कपडे विकत घेतले का? वेगवेगळे कपडे घेतले? खालील कपड्यांचे चित्र बघा. या पैकी लहान मुलांचे कपडे व मोठ्यांचे कपडे ओळखा. सांगा.




SCERT TELANGANA




लहान मुलांचे कपडे, मोठ्या मानसाचे कपडे वेगवेगळे असतात. तर मग तुमच्या घरी लहान मुले, मुली, स्त्रि, पुरुष कोणते कपडे घालतात? खालील कोष्टकात लिहा.

| मुलां,मुलीचे कपडे | पुरुषांचे कपडे | स्त्रियांचे कपडे |
|---|---|---|
| | | |

वरील कपड्यापैकी तुम्हाला कोणते कपडे आवडतात? का आवडतात?


लक्ष्मी नवीन गाऊन घालुन मेरीच्या घरी गेली. हि गाऊन खूप छान आहे, कुठे विकत घेतली? असे मेरीने विचारले. तिच्या बाबाने तिच्यासाठी दुकानातून आनले आहे असे लक्ष्मी म्हणाली. मेरीच्या बाबाने सुध्दा क्रिसमस निमित्त दुकानातून कापड आणुन मेरीसाठी एक गाऊन शिवले. लक्ष्मीने तयार असलेली रेडीमेड गाऊन घातली. मेरीला तिच्या बाबाने कपडा आणून गाऊन शिवले.

> तुम्ही कोणकोणते कपडे शिवून घालता?
>
> न शिवता थेट विकत घेवून घालायचे कपडे कोणते?

आपल्या शरिराचे ऊन,वारा,पाऊस या पासून रक्षण करण्यासाठी कपडे घालतो. हिवाळयात थंडीपासून रक्षण करण्यासाठी, पावसाळयात भिजू नये म्हणून विशिष्ठ प्रकारचे कपडे घालतो. खालील चित्र बघा. असे कपडे कधी घातलात ते सांगा.



SCERT TELANGANA



आपण सर्वजण कपडे घालतो, कपडे घालणे आवश्यक आहे. विविध प्रांताचे लोक, विविध धर्माचे लोक विविध परंपरा, संस्कृतिला अनुसरूण विविध प्रकारचे कपडे वापरतात. खालील चित्र बघा. अशा कपड्यांना कोण घालतात? त्याचे काय महत्व आहे सांगा.







साधारणतः सणाच्या दिवशी, लग्न आणि इतर प्रसंगी खास कपडे घालतात.

तुम्ही सुध्दा सनाच्यावेळी किंवा शुभकार्याच्यावेळी किवा वाढ दिवसाच्या प्रसंगी खास कपडे घालता का? कोणते खास कपडे घालतात? तुमचे मित्र सुध्दा तुमच्यासारखेच कपडे घालतात का?

शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष कपडे असतात. म्हणजेच युनीफार्म असतो.त्याच प्रमाणे वेगवेगळ्या हुद्यावर असणारे व्यक्ती काम करतांना विशेष प्रकारचे कपडे घालतात. पोलीस, डॉक्टर, नर्स, वकील, विमान चालविणारे पायलेट, मोठ मोठ्या हॉटेल मध्ये  स्वयंपाक करणारे (शेफ) विशेष कपडे घालतात. खालील चित्र बघा. ते कोण, कोणते कपडे घालतात ते सांगा?













SCERT TELANGANA



बस चालविणारे ड्राईवर, कंडक्टर,कारखाण्यात काम करणारे कामगार, बँका, मोठ मोठ्या कंपनीत काम करणारे सेक्युरीटी गार्ड इत्यादी लोक काम करीत असतांना विशेष कपडे घालतात. आपल्या देशातर्फे खेळणारे खेळाडू, सुध्दा खेळ खेळतांना विशेष कपडे घालतात. हे खेळाडु जिल्हा, राज्य, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करतात, ते पण खेळ-खेळतातंना विशेष कपडे घालतात.

मग तुमच्या प्रांतात असे कोण कोण काम करणारे मानंसं आहेत? ते कोणते कपडे घालतात?

आपण अनेक प्रकारचे कपडे वापरतो हे ठाऊक झाले ना ! जितके कपडे घालने महत्वाचे आहे तितकेच स्वच्छ कपडे घालने तेवढेच महत्वाचे आहे. दररोज सकाळी अंघोळ केल्यावर स्वच्छ धुतलेले कपडे घालावे. आपण वापरतो तो हात रुमाल (दस्ती ), टॉवेल सुध्दा दररोज धूवूनच वापरावेत.

**तुम्हाला माहीत आहे का?**

सुती कपडे कापसाच्या धाग्यापासून बनवितात. रेशमी किड्यापासून बनलेल्या धाग्याने रेशमी कपडे विणतात.



## आधीच्या काळात कसे कपडे घालत होते ?

आता आपण निरनिराळे कपडे वापरत आहोत. या पैकी काही कपडे विकत घेवून शिवलेले असतात तर काही तयार रेडीमेड असतात. आधीच्या काळी म्हणजे आजोबा, आजी, कसे कपडे घालत होते? तसेच आई,बाबांच्या लहान पणी कसले कपडे घालत होते? आता लहान मुले कपडे घालत आहेत तसेच होते का? माहीत करुन खालील कोष्टकात लिहा.

| आई बाबाच्या लहान पणी घातलेले कपडे. | आजोबा आजीच्या लहान पणी घातलेले कपडे. | आताचे लहान मुलं मुली घालत असलेले कपडे |
|---|---|---|
| | | |

SCERT TELANGANA




## आपण डिझाइन काढू या !

कोणतेही कपडे त्याच्या रंगामुळे व डीझाइन मुळे सुंदर दिसतात. याच्या आधारेच कपड्यांची निवड केली जाते. खालील चित्र बघा. ते कसे आहेत? त्या पैकी तुम्हाला कोणते आवडले? का आवडले ते सांगा?











तुम्हाला माहीत आहे का, अशा डिझाइन आपण सुध्दा काढू शकतो.



## डिझाइन काढु या.

तुमच्या जवळच्या शिंप्याकडे (टेलरकडे) जावून कपड्याचे तुकडे घ्या.

एक भेंडी घ्या. त्याला आडवे कापा. त्या तुकड्याला रंगात किंवा शाईत बुडवा. पांढऱ्या कागदावर किंवा कपड्यावर ठसा मारा. तुमची मनपसंद डिझाइन काढा.

अशाप्रकारे भेंडीचे, तुकडे आलूचे तुकडे, अंगटयाचे ठसे, पायाचे ठसे रंगात बुडवून सुध्दा अनेक प्रकारचे डिझाइन काढू शकतो.



### महत्वाचे शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कपड्याची गरज | 2. | विविध प्रकारचे कपडे | 3. | कामाला अनुसरुन कपडे |
| 4. | वातावरणानुसार कपडे | 5. | स्वच्छ कपडे | 6. | डिझाइन |
| 7. | रेडीमेड कपडे | 8. | शिवून घ्यायचे कपडे | 9. | गणवेश (युनीफार्म) |





SCERT TELANGANA

## आपण काय शिकलो?

★ कपडे आपली मुलभूत गरज आहे. मुले मुली, स्त्रिया, पुरुष,विविध प्रकारचे कपडे घालतात.

★ काहीजण रेडीमेड कपडे विकत घेतात तर कांहीजण कापड विकत घेवून कपडे शिवतात.

★ सांप्रदायाला अनुसरुन सन, लग्नासारख्या शुभकार्यात विशेष कपडे नेसतात.

★ विविध वृत्तीचे लोक त्यांचे काम करीत असतांना त्या वृत्तीसी संबंधीत कपडे घालतात.

★ वातावरणाला अनुसरुन विविध प्रकारचे कपडे वापरतात.

★ कपड्यावर रंगाने विविध प्रकारचे डिझाइन काढता येतात.

## हे करा




### विषय आकलन

1. आपण कपडे का घालतो?
2. मुले, स्त्रिया, पुरुष, यांच्या कपड्यांची तीन उदाहरणे लिहा.
3. कोणत्या वृत्तीचे लोक कोणते कपडे घालतात?
4. पुरुष व स्त्रियांच्या कपड्यातील फरक आणि साम्य लिहा.
5. शिवून घेतलेले कपडे, रेडीमेड कपडे यापैकी तुम्हाला कोणते कपडे आवडते, तीन उदा. लिहा?
6. आपण स्वच्छ कपडे का घालावेत?



### चित्र काढा रंग भरा

1. खालील डिझाइन बघा. चित्र काढा. तुमच्या आवडीचे रंग भरा?



2.. तुम्हाला आवडलेल्या कपड्याचे चित्र काढून त्यात रंग भरा.

3. साडीवर निरनिराळ्या डिझाइन असतात ना ! तुमच्या घरच्या साडीवरील एखादी आवडीची डिझाइन वहीवर काढा. वर्गात दाखवा.

SCERT TELANGANA



## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. तुमच्या मित्राला विचारुन त्यांनी सनाला घेतलेल्या कपड्याची माहीती घेवून कोष्टकात लिहा.

| क्र.सं. | मित्राचे नाव | सनाचे नाव | कोणते कपडे घेतले? | रेडीमेड का शिवून घ्यायचे? |
|---|---|---|---|---|
| | | | | |

- बहूतेक जनांनी कोणते कपडे घेतले? कोणकोणत्या सनाला घेतले?
- बहूतेक जनांनी रेडीमेड कपडे घेतले का? कापड घेवून शिवून घेतले?

2. तुमची आवडती डिझाइन असलेले कापड गोळा करुन त्यांना चार्टवर चिटकवून वर्गात दाखवा.
3. वेगवेगळ्या प्रांतात राहणारे लोक कोणते कपडे घालतात, त्यांच्या कपड्यांचे चित्र गोळा करुन चार्टवर चिटकवुन वर्गात दाखवा?



## कौतूक करणे

1. काही जनांना घालायला कपडे राहात नाहीत. तसेच अग्नीचे अपघात,पूर,भूकंप, तूफान,इत्यादी मुळे ग्रस्त लोकांना घालायला कपडे राहात नाहीत. अशा लोकांना आपण कशी मदत करु शकतो?



## प्रश्न विचारणे

1. कपडे विकत घेण्यासाठी लक्ष्मी तिच्या आई बाबासोबत दुकानात गेली ना? आईने दुकानदाराला कोण कोणते कपडे प्रश्न विचारले असतील? आपण कपडे घेते वेळी का प्रश्न विचारावे?



## मी हे करु शकतो का?



1. कपड्याची आवश्यकता सांगू शकतो. होय / नाही
2.. विविधप्रकारच्या कपड्याची माहीती कोष्टकात लिहू शकतो. होय / नाही
3. विविध वृत्तीच्या लोकांचे घालावयाचे कपडे ओळखू शकतो. होय / नाही
4 स्वच्छ कपडे घालने आवश्यक आहे ही गोष्ट कळली.
म्हणून दररोज स्वच्छ कपडे घालतो. होय / नाही
5. विविध डिझाइन कपड्यावर काढू शकतो. होय / नाही
6. विविध कपड्याबद्दल प्रश्न विचारु शकतो. होय / नाही

SCERT TELANGANA



# 14. मी इथे, तुम्ही कुठे?



बिंदू तिसऱ्या वर्गात शिकत आहे. बिंदूसोबत राजू, रमा, सतीश, असे खूप विद्यार्थी शिकत आहेत.ते सर्व रांगेत बेंचवर बसलेले आहेत. त्यांचा वर्ग पाहू या !



- समोरच्या ओळीत कोण बसलेले आहे?
- मागच्या ओळीत कोण बसलेले आहे?
- मधल्या ओळीत कोण बसलेले आहेत?
- खाली कोष्टकातील नावे वाचा. यांच्या मागे, पुढे, उजव्या बाजुला आणि डाव्या बाजुला कोण आहेत ते लिहा.

| विद्यार्थ्याचे नाव | पुढे | मागे | डावीकडे | उजविकडे |
|---|---|---|---|---|
| बिंदू | | | | |
| मेरी | | | | |
| इस्माइल | | | | |
| रहींम | | | | |




बिंदूचा वर्ग पाहीलात ना? कोण कोण कुठे कुठे बसलेले ते चर्चा करुन खालील चित्रात लिहा.



SCERT TELANGANA



बिंदूचा वर्ग कसा आहे, कोण कुठे बसलेले आहेत लिहीलात ना ! तर मग तुमच्या वर्गात कितीजण आहेत? तुमच्या वर्गात कोण कुठे बसलेले आहे दाखवू शकाल काय? कल्पना करा की, खालील दिलेला चौकोण हा तुमचा वर्ग आहे. त्याचे निरीक्षण करा आणि सांगा.




- फळा (बोर्ड) कुठे आहे?
- खुर्ची कुठे आहे?
- टेबल कुठे आहे?
- समोरच्या ओळीत कोण कोण बसतो? त्यांची नावे लिहा?
- बाकीच्या रांगेत कोण कोण बसतात त्यांची नावे लिहा.


तुमच्या वर्गात कोण कुठे बसलेले आहे पाहीलात ना? त्यांची नाव पण लिहा आता बिंदुची शाळा पाहू या.



SCERT TELANGANA



बिदूच्या शाळेचे असे चित्र सुध्दा काढू शकतो, तुम्हाला ठाऊक आहे काय? नकाशाचे निरीक्षण करा?



SCERT TELANGANA



बिंदूच्या शाळेत खाली सात वर्ग, वर सुध्दा सात वर्ग आहेत. तसेच मैदानात आठ नारळाची झाडे आहेत. त्या शाळेच्या चित्राला वर दाखविल्याप्रमाणे चिन्हाने सुध्दा दाखवू शकतोय तुमच्या शाळेत किती वर्ग आहेत? रिकाम्या जागेत कोणकोणती झाडे आहेत? किती आहेत?


असेच तुम्ही तुमच्या शाळेला सुध्दा वर दाखविल्याप्रमाणे पांढऱ्या कागदावर नकाशा काढू शकतो.

चित्र काढण्याच्या आधी झाडासाठी एक चिन्ह ठरवावे.

खोल्यांना दार कुठे आहेत पाहून वर दाखविल्या प्रमाणे चित्र काढावे.

शाळेच्या कुंपनाची भिंत, शाळेचे मुख्यद्वार (गेट), झेंड्याचा वटा, कुठे आहे ते ओळखून चिन्हाने चित्रात दाखवावे.

बिंदूच्या गावात काय काय आहे तुम्हाला माहीत आहे? बिंदू व रेखा शाळेला पायीच जातात. बिंदूच्या घरापासून शाळेपर्यंत काय काय आहे? खालील चित्राबद्दल तुमच्या मित्रात चर्चा करा.





SCERT TELANGANA

- शाळेच्या जवळ कुणाचे घर आहे? बिंदुचे की रेखाचे ते सांगा?
- बिंदूच्या घरापासून पार्कमार्गे शाळेपर्यंत काय काय आहे?
- बिंदू तिच्या शाळेला कोण कोणत्या मार्गाने जावू शकते रेषा मारुन दाखवा.





एका प्रांतातील असनारी घरे, शाळा, दवाखाने, बगीचे, बोरवेल इत्यादींना जशास तसे चित्रात दाखवने शक्य नाही. म्हणून यांना चिन्हाने दाखवितात. खालील चिन्हांचा उपयोग करा. बिंदुच्या गावातील विविध स्थळे नाकाशा वर चिन्हांच्या मार्ग दर्शवा





SCERT TELANGANA

बिंदूच्या गावचे चित्र बघीतलात ना! यात चिन्हाचा वापर करण्यात आला आहे. तुम्ही सुध्दा तुमच्या घरापासून शाळेपर्यंतच्या रस्त्याचे चित्र काढू शकाल काय? यासाठी खालील गोष्टी करा.

- आधी मध्यभागी तुमची शाळा ठरवून घ्या. त्याला S हे चिन्ह द्या.
- तुमच्या घराला  हे चिन्ह द्या.
- तसेच तुमच्या मित्राचे घर कुठे आहेत ते ठरवा. त्यांना सुध्दा एखादे चिन्ह द्या.
- आता तुमच्या घरापासून ते शाळेपर्यत रस्ता काढुन मार्ग दर्शवा?
- तसेच तुमच्या मित्राच्या घरापासुन ते शाळेपर्यंत रस्ता काढा. मार्ग दाखवा?



◆ आता तुमच्या घरापासून शाळेपर्यत उजव्या व डाव्या बाजूला काय काय आहे ते बघा. झाड  हे चिन्ह द्या. मंदीर असेल तर  हे चिन्ह द्या. मस्जिद असेल तर  हे चिन्ह द्या. चर्च असेल तर  हे चिन्ह द्या. पोस्ट ऑफीस असेल तर PO हे चिन्ह द्या. दवाखाना असेल तर  हे चिन्ह द्या. बगीचा असेल तर  हे चिन्ह द्या

तुमच्या शाळेपासून घरापर्यतचा रस्ता चित्रात पाहीलात ना ! अशाच प्रकारे गावाचा सुध्दा नकाशा काढू शकतो. अशाचप्रकारे चिन्हांचा वापर करुन आपण गावाचे किंवा इतर स्थळांचे विविध नकाशे काढु शकतो.

## महत्वाचे शब्द

1. नकाशा 2. प्रांत 3. चिन्ह
4. समोर मागे 5. मार्ग (रस्ता)

## आपण काय शिकलो

★ वर्गाचा, शाळेचा, दवाखाण्याचा, बगीच्याचा चिन्हाचा वापर करुन नकाशा काढता येतो.
★ नकाशात शाळेला, दवाखाण्याला, बागेला चिन्हाने दर्शवितात.
★ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठीकाणी ज़ाण्यासाठी चिन्ह आपल्यास मदत करतात.

## हे करा



### विषय आकलन

1. तुमच्या घरापासून शाळेला जातांना डाव्या उजव्या बाजूला काय काय आहे?

डाव्या बाजूला ..................................

उजव्या बाजूला ..................................


2. तुमच्या घराच्या चार बाजूला कुणाची घरे आहेत ते लिहा.

| डाव्या बाजूला | उजव्या बाजूला | मागे | पुढे |
|---|---|---|---|
| | | | |




SCERT TELANGANA







## नकाशा कौशल्य




1. नकाशा बघा.

   - चिन्हाच्या आधारे रामूच्या गावात काय काय आहे ते सांगा.
   - रामुच्या घरापासून दवाखान्याला जायचा रस्ता पेनने लिहून दाखवा.
   - रामुच्या घरापासून शाळेला जायचा वेगवेगळे मार्ग दाखवा?



## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. तुमच्या गावात / गल्लीत काय काय आहे? माहीती गोळा करा. पोस्ट ऑफीस, मंदीर, दवाखाना, बँक, पोलीस स्टेशन, प्राथमिक आरोग्य केंद्र, इत्यादी. प्रत्येक जागेला एक चिन्ह द्या तुमच्या गावाचे रस्ते आणि गल्या काढा, नकाशावर विविध जागा दाखवा. तुमच्या गावाचा नकाशा काढा? मुलांना मदत करण्यासाठी ह्या जागां संबंधी आणि त्यांच्या कार्यासंबंधी मुद्दे लिहुन घ्या?



## प्रश्न विचारणे

1. बिंदूच्या सर्व मित्रांना त्यांच्या गावचा नकाशा काढायचा होता.म्हणून ते सर्व गुरुजीकडे गेले. गुरुजींना अनेक प्रश्न विचारले. त्याचप्रमाणे तुम्ही सुध्दा तुमच्या गावचा / गल्लीचा नकाशा काढण्यासाठी तुमच्या शिक्षकांना कोणकोणते प्रश्न विचाराल? ते प्रश्न लिहा.
2. इतर कोणत्या परिस्थितीत, तुम्ही तुमच्या गुरुजींची मदत घ्याल?



## मी हे करु शकतो काय



| | | |
|---|---|---|
| 1. | मी नकाशा वाचू शकतो. | होय /नाही |
| 2. | नकाशात दिलेल्या चिन्हांना ओळखू शकतो. | होय /नाही |
| 3. | घरापासून शाळेपर्यंतचा मार्ग नकाशाद्वारे दाखवू शकतो. | होय /नाही |
| 4. | वर्गाचा शाळेचा नकाशा काढू शकतो. | होय /नाही |
| 5. | गावचा नकाशा काढण्यासाठी प्रश्न विचारु शकतो. | होय /नाही |






SCERT TELANGANA

# 15.पाणी - आपल्या गरजा





वर्गातील सर्वजन मिळून एक गाणं गातं आहेत. तुम्ही सुध्दा गाऊन बघा. गाण्याबद्दल चर्चा करा. चला गाण गाऊ या!

पाऊस । पाऊस । पाऊस.
तु फार सुरेख आहे ;
बादली भरुन पाणी
नदीमध्ये वाहते;
पाण्याचा प्रवाह
सगळीकडे वाहतो,
पळतो आणि उडी मारतो
जलद, जलद, जलद,

पाऊस। पाऊस । पाऊस।
तु फार सुरेख आहे;
तलाव, विहिरी, सरोवरे
आवाजांनी भरलेले
आकाश चमकते
इंद्रधनुष्याच्या रंगानी;
पान होतात हिरवी
आनंदानी नाचतात;
पाऊस।पाऊस।पाऊस।
तु फार सुरेख आहे.


पावसाचे पाणी कुठे जाते?

पाणी कुठे कुठे मिळते?





नद्या, कालवे, विहरी, तलाव, पाऊस या पासुन आपल्याला पाणी मीळते. आपण साधारणतः विहीर, बोरवेल, नळ याचे पाणी आनून भांड्यात जमा करुन गरजे प्रमाणे वापरतो.

 सलीमच्या घरी पाणी भरुन ठेवण्यासाठी खालील भांडे वापरतात.त्यांना बघा.




वरील चित्रात दाखविलेल्या भांड्यात पाणी भरले तर -

कोणत्या भांड्यात पाणी जास्त मावते?

तुमच्या घरी कशात पाणी साठऊन ठेवतात.

आपल्या घरी पाणी साठऊन ठेवण्यासाठी भांडे, मडके, बकीट, सिमेंटच्या कुंड्या इत्यादीचा वापर करतो. त्यामधील पानी आपण आपल्या गरजेसाठी वापरतो.



## आपल्याला पाणी का आवश्यक आहे?

आपण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अनेक रुपात पाणी वापरतो. खालील चित्र पहा ते काय करीत आहेत?







आपण अजून पाणी कशासाठी वापरतो., तुमच्या मित्रासोबत चर्चा करा.

कोणकोणत्या कामाला पाणी जास्त पाहीजे। कोण कोणत्या कामाला पाणी कमी पाहीजे?

झाडांना जगण्यासाठी पाण्याची गरज आहे का?

आपल्याला पाणी आवश्यक असते हे कळले ना। त्याच प्रमाणे अजून कुणाला पाण्याची गरज आहे? झाडांना जगण्यासाठी पाण्याची गरज आहे का? विचार करा. त्यासाठी खालील प्रमाणे करा.



## हे करुन बघा. काय होते ते बघा?

दोन झाडाचे रोपटे घ्या. त्या पैकी एकाला दररोज पाणी घाला. दुसऱ्याला पाणी घालू नका.असे आठवडा भर करा. नंतर त्या रोपट्यांना बघा. काय फरक दिसतो ते सांगा.तक्याचे निरिक्षण करा.लिहा.

| वार | काय झाले? | |
|---|---|---|
| | 1 ले रोपटे | 2 रे रोपट |
| सोमव ार | | |
| मंगळवार | | |
| बूधवार | | |
| गुरुवार | | |
| शुक्रवार | | |
| शनीवार | | |
| सोमवार | | |



1ले रोपटे



2 रे रोपटे



पाणी नसल्यास रोपटे वाळून जातात. म्हणूनच घरच्या शाळेच्या रोपट्यांना दररोज पाणी घालावे लागते.तेव्हाच रोपटे वाढतात. सुंदर दिसतात.

सलीम शाळेतील स्वच्छता कमिटीचा सदस्य आहे. सर्व मित्र मिळून शाळेत गुलाब, जास्वंद, गनेर ची झाडे आणून लावले. त्यांना दररोज पाणी घातले. काही दिवसानंतर त्यांना फुले लागली. सकाळी प्रार्थनेच्या वेळी सर्व गुरुजींनी सलीमची वाहवा केली. शाळेतील सर्वजन झाडांना पाणी टाकतील असे म्हणाले.

मग तुम्ही पण झाडाला पाणी घालत आहात की नाही? तुमच्या शाळेतील किंवा घरच्या झाडांना पाणी घाला. तुम्ही पाणी घातलेल्या झाडांना फुले लागल्यावर तुम्हाला कसे वाटते ते सांगा. तुमच्या मित्रांबरोबर चर्चा करा?

SCERT TELANGANA





## प्राण्यांना पाणी पाहीजे



एकेदिवशी मधू , किशनच्या घरी आला.त्याला लहान लहान पाण्याची भांडे दिसली. किशनने पाणी टाकल्यावर कोंबड्या त्यातील पाणी पिऊ लागल्या. कोंबडीचे पाणी पिणे बघुन मधूला गंमत वाटली.हे बघून तुम्हाला काय समजले? आपल्याला, झाडांना तसेच प्राण्यांना सुध्दा पाण्याची गरज आहे. प्राम्यांना सुध्दा पाणी आवश्यक आहे. याची काही उदाहरणे सांगा. तुमच्या मित्रांसोबत विचार करा.

तुम्ही कोणकोणत्या प्राण्यांचे पाणी पिणे पाहीले आहे?

पाणी प्राण्यांना पिण्यासाठीच नव्हे तर अजून कशासाठी पाणी आवश्यक आहे?

### तुम्हाला माहित आहे काय?



ऊंट एकदा पाणी पिल्यानंतर कित्तेक दिवस पाणी न पीता राहू शकतो. पाणी मिळाल्यास खूप पाणी पिऊन शरीरात साठवून ठेवतो.

जीवंत राहण्यासाठी झाडांना, प्राण्यांना आणि मानवाला पाणी अत्यंत आवश्यक आहे.

## आपण कोणते पाणी प्यावे?



मधू, किशन शाळेत खेळत आहेत. मधूला तहान लागली. लगेच धावत जावून ग्लास भांड्यात बुडवायला गेला. तेव्हा किशनने मधूचा हात धरला व म्हटले, असे प ाण्यात हात बुडवू नये. असे किशनने मधूला का म्हटले असेल? ग्लास हातात धरुन पाण्यात बुडविल्याने काय होते? विचार करा.

### हे करुन पहा.मग काय होईल ते सांगा.



किशनने मोठे दोन ग्लास घेतले. त्यांना पाण्याने भरले. एका ग्लासात मधूला हात बुडवायला लावले. मधूने ग्लासात हात बुडविला. हात बुडविल्याने काय झाले असेल? तुम्ही सुध्दा तसे करुन बघा. पहील्या ग्लासात हात बुडवा. ग्लासातील पाण्याचा रंग कसा बदलला? दुसऱ्या ग्लासातील पाणी कसे आहे? कोणत्या ग्लासातील पाणी घडूळ झाले? हा घडूळपणा कुठून आला? यावरुन तुम्ही काय शिकलात?




आपण खेळत असतांना, काम करीत असतांना आपल्या हाताला धूळ, धूर, मळ चिकटतो. हात न धुता , पिण्याच्या



SCERT TELANGANA

पाण्यात हात बुडविला तर मळ सगळा पाण्यात मिसळतो.  असे पाणी पिल्यास रोग होतात. म्हणून धूळ,मळ नसलेले स्वच्छ पाणी प्यावे.



विहीरीत, तलावात, कालव्यात पाणी असते हे तुम्हाला माहीत आहे ! खालील तलाव पहा.



तलावात कोण काय करत आहेत?
त्यांनी करीत असलेल्या कामामुळे तलावाचे पाणी काय होते?
या तलावाचे पाणी पिल्याने काय होते?

तलावात, विहीरीत, कचरा, धूळ, कपडे धुने, भांडे धुने, यामुळे मळ जमा होतो. त्यासोबत आरोग्यास हानीकारक सुक्ष्म जीवाणू पाण्यात शिरतात. अशा पाण्याला "अस्वच्छ पाणी किंवा दुषित पाणी" म्हणतात. यालाच प्रदुशित पाणी असे म्हणतात. असे पाणी पिल्यास उलट्या,हगवण,कॉलरा सारखे रोग होतात

## चांगल्या सवयी



आपल्याला बहूतेक आजार अशुध्द पाणी पिल्याने होतात. यासाठी काही गोष्टीची काळजी घेणे आवश्यक आहे! आपल्याला चांगल्या सवयी असाव्या. त्या कोणत्या विचार करा?

मडक्यातील पाणी वाडणीने ग्लासमधे टाकून प्यावे.

ग्लासाने पाणी पितांना ग्लास तोंडाला लावू नये. वरुन प्यावे.

तलावाचे ओसाड विहीरीचे पाणी पिऊ नये.


बोर वेल, नळाचे सुरक्षीत शुध्द पाणीच प्यावे.

गाळलेले पाणी प्यावे.

एकदा वापरलेल्या, पातळ प्लास्टीक शिशीत पाणी पिऊ नये.

प्लास्टीकच्या शिशीतल्या पाण्यात प्लास्टीक विरघळून विषपदार्थ मिसळतात.

म्हणून जाड प्लास्टीकच्या शिशीतच पाणी आणावे..



## स्वच्छ पाणी सर्वांना मिळते का?



रजनीच्या घरी नळ आहे.

त्यांच्या नळाचे पाणी फक्त त्यांनीच वापरतात. वेंकन्नाच्या घरी नळ नाही. तो सार्वजनीक नळाचे पाणी आनतो. त्या नळाजवळचे दृष्य बघा..

अशा ठिकाणचे पाणी आणून पिल्याने काय होते?

गल्लीच्या सार्वजनिक नळाजवळ स्वच्छता राखण्यासाठी काय करावे लागेल?

साधारणतः पाण्याला मडक्यात, भांड्यात भरुन ठेवतात.काही घरी रांजनात सुध्दा पाणी भरुन ठेवतात. रांजनातले पाणी तुम्ही कधी पिलात का? रांजनातले पाणी कसे असते? रांजनात पाणी टाकल्यानंतर एका तासाने पहा. काय होईल?

रांजनातले पाणी थंड राहते. रजनीच्या मामच्या घरी तिने वाटर बबूल पाहीले. तसेच करेंटद्वारे पाणी शुध्द करायची मशीन पाहीली.

SCERT TELANGANA





हे कशाला असे विचारली. 'हे पाण्याला शुध्द करते' असे रजनीच्या मामाने सांगीतले. मग तुमच्या गावात सुध्दा असे पाण्याचे क्यान किंवा बबूल्सने पाणी आणतात का? का आणतात? आणखी कुणकुणाच्या घरी पाणी शुध्द करण्याचे साधन आहे? माहिती गोळा करुन सांगा?

पाण्यात क्लोरीनच्या गोळया किंवा ब्लीचींग पावडर टाकल्याल पाणी शुध्द होते.



## पाण्याची टंचाई



रजनीच्या घरी विहीर आहे. उन्हाळ्यात एके दिवशी रजनीची आई पाणी विहीरीतून पाणी काढत होती. तिने बकीट विहीरीत सोडले. पण बकीटाला पाणी पुरले नाही. आईने रजनीला दोरी आणायला सांगीतले.दोरी आहे ना ! मग अजून कशाला? रजनी म्हणाली. उन्हाळा आहे ना ! विहीरीचे पाणी खोल गेले आहे. बकीटाला पाणी पुरत नाही असे आई म्हणाली.

अशाप्रकारे विहीरीचे पाणी खोल का जाते?

विहीरीतले पाणी कधी कमी होते?

उन्हाळ्यात विहरी तलाव कोरड्या पडतात. बोर वेलचे पाणी सुध्दा खोल जाते. गावातील लोकांना आवश्यक तेवढे पाणी मिळत नाही. अशा परिस्थीतीला 'पाण्याची टंचाई' असे म्हणतात. अशा टंचाई ग्रस्त भागात शासन टॅंकरने पाणी पुरवठा करते. अशी पाण्याची टंचाई तुमच्या गावात झाली काय? पाण्याची टॅंकर कधी गावात का आली ? अशा अजून कोणत्या संदर्भात टॅंकरने पाणी आणतात?






SCERT TELANGANA



उन्हाळ्यात पाण्याच्या टंचाइमुळे कोणता त्रास होतो?
उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासू नये म्हणून काय करावे?




## पाण्याचे रक्षण करणे

रहीम उन्हाळ्याच्या सुट्ट्यात हैद्राबादला गेला. काकाच्या घराच्या अंगणातला खड्डा त्याने पाहीला. 'हा खड्डा कशाला?' असे रहीमने विचारले. हे पाणी जिरविण्याचा खड्डा आहे. पावसाळ्यात पावसाचे पाणी या खड्डयात वळवितात. या खड्डयात पावसाचे पाणी साचून जमीनीत झिरपत जाते. यामुळे जमीनीतील पाण्याचा साठा वाढतो. जमीनीतील पाण्याचा साठा वाढवीने व पाणी वाचविणे तेवढेच महत्वाचे आहे. असे काका म्हणाले.

पाण्याचा जपून योग्य वापर करावा हे आपण शिकलो. खालील चित्र बघा. चित्र पाहून तुम्हाला काय समजले?







- ❑ पहील्या चित्रात काय होत आहे? असे का होत आहे?
- ❑ दुसऱ्या चित्रात काय होत आहे? असेच कधी कधी पाणी वाया जाते?
- ❑ तीसरे चित्र बघा. पाणी कसे वाया जात आहे. यामुळे कुणाला त्रास होतो?
- ❑ पाणी वाया जाऊ नये म्हणुन काय केले पाहिजे?


तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

पाणी आपल्यासाठी फार महत्वाचे आहे. जीवंत राहण्यासाठी पाणी आवश्यक आहे. या पाण्याला वाया घालू नये. जपून वापरावे. स्वच्छ पाणी प्यावे. पाणी वापरतांना पाणी वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी. दुषित पाणी पिल्याने अनेक आजार होतात.

**पाणी वाया जाणे थांबवू या - पाण्याची बचत करु या - आपले कर्तव्य आहे.**

## महत्वाचे शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पाण्याचे साठे | 2. | पाण्याचे उपयोग | 3. | शुध्द पाणी |
| 4. | प्रदुषित पाणी | 5. | पाणी काया घालने | 6. | पाणी भरण खड्डा |

## आपण हे शिकलो

★ नद्या, कालवे, विहीरी, तलाव व पावसापासून पाणी मिळते,

★ पिण्यासाठी, कपडे धुण्यासाठी, भांडे विसरळण्यासाठी अंघोळ करण्यासाठी पाणी उपयोगी पडते.

★ प्राणी, मानव आणि झाडांना (वनस्पतींना) जिवंत राहण्यासाठी पाण्याची गरज आहे.

★ साधारणतः पाण्याला भांड्यात, मडक्यात, बकीटात, रांजनात, टब, स्टील ड्रम, टाकी पाणी साठवितात.


★ प्रदुषित पाणी पिल्याने अनेक आजार होतात.

★ पाणी काटकसरीने वापरावे. शुध्द पाणीच प्यावे.

★ पाईपातून, टाकीतून, नळाचे पाणी वाया घालू नये.

SCERT TELANGANA

## हे करा



### विषय आकलन

1. पाणी नसल्यास काय होते? तुमच्या प्रांतात पाण्याचे कोणते स्त्रोत आहे?
2. पाण्याच्या काही श्रोतांची उदाहरणे द्या?
3. तुमच्या घरी पाणी कशात साठवून ठेवत असता?
4. तुमच्या घरी कधी कधी पाणी वाया जाते? ते वाया जाऊ नये म्हणुन तुम्ही काय कराल?
5. तुमच्या परिसरात कुठे कुठे पाणी वाया जात आहे?
6. पिण्यासाठी तलावाचे पाणी चांगले का नळाचे पाणी? का?
7. पाणी काटकसरीने वापरण्याचे पाच उपाय सांगा?





8. आपण सर्वांनी शुध्द पाणी का प्यावे? ................................

9. काही प्रांतात पिण्यासाठी, इतर कामासाठी सुध्दा पाणी टँकरने पुरवठा करतात. त्या प्रांतात पाण्याचा वापर कसा करावा? पाणी वाया जावू नये म्हणून काय करावे?



## चित्र काढा. रंग भरा

1. तुमच्या घरात पाणी कशात भरता? त्यांचे चित्र काढा.



## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. आपण दररोज पाणी पितो ना ! किती वेळा पितो? माहीत करुन घ्यायचं आहे का? तर मग असे करा. तुम्ही सकाळपासून झोपेपर्यंत किती ग्लास पाणी पीता ते मोजा. त्यांची माहीती खालील कोष्टकात लिहा.

| पाणी पिलेली वेळ | किती ग्लास पाणी पिले? |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

SCERT TELANGANA




- तुम्ही कितीदा पाणी पिलात ?
- कोणत्या वेळी जास्त पाणी पिलात?
- तुमच्या सारखेच तुमच्या मित्राने सुध्दा लिहीले असेल ! त्यांनी पण किती ग्लास पाणी पिले ते लिहा?
- तुमच्या पेक्षा जास्त पाणी कोण कोण पिले?
- तुमच्या पेक्षा कमी पाणी कोण कोण पिले? सर्वात जास्त पाणी कोण पिले?
- सर्वात कमी पाणी कोण पिले?




## कौतूक करणे

1. लता खेळण्यासाठी तिच्या मैत्रिणीच्या घरी जात होती. तिला रस्त्यात काही माणसं नळ न बंद करता कपडे धुतांना दिसले, ते पाहून लता त्यांना पाणी वाया घालू नये म्हणून समजावते. लताने केलेले काम चांगले आहे का वाईट आहे? का?

## प्रश्न विचारणे



1. सोमुला, पाण्याची बचत कशी करायची, पाण्याला शुध्द कसे करायचे याबद्दल माहीती पाहीजे. त्यासाठी तो गुरुजी जवळ गेला. सोमुने गुररुजीला कोणते प्रश्न विचारले असतील? गुरुजी काय उत्तर दिले असतील?
2. जंगू एकदा हैद्राबादला आला. तिथे एक टँकर पाणी आणतांना पाहीला. जंगुला खूप आश्चर्य वाटले. टँकरमधे पाणी आणने कशासाठी? असे हुसेनच्या आजोबाला विचारले. जंगू काय विचारला असेल? आजोबाने काय उत्तर दिले असेल? जर तुम्ही तुम्ही त्याच्या जागी असता तर कोणते प्रश्न विचारले असता?



## मी हे करु शकतो का?




| | | |
|---|---|---|
| 1. | पाणी कशापासून मिळते सांगू शकतो. | होय / नाही |
| 2. | पाणी अस्वच्छ कसे होते सांगू शकतो. | होय / नाही |
| 3. | पाणी काटकसरीने कसे व का वापरावे सांगू शकतो. | होय / नाही |
| 4. | आमच्या प्रांतातील पाण्याचे श्रोत ओळखू शकतो. | होय / नाही |
| 5. | पाणी वाया जाने व पाण्याची बचत यावर प्रश्न विचारु शकतो. | होय / नाही |




SCERT TELANGANA





# 16. गावाला जावू या



अब्दूल्ला त्यांच्या नातेवाईच्या घरी मुंबईला आई बाबासोबत लग्नाला गेला. ते सगळे घरापासून रेल्वे स्टेशनला  ने गेले. मुंबईला जाणारी  येवून थांबली. अब्दुल्ला, त्याचे आईबाबा मुंबई जाणाऱ्या  वर चढले. रात्रभर प्रवास करुन सकाळी मुंबईत पोहोंचले. रेल्वे स्टेशनच्या जवळ असलेल्या नातेवाईकाच्या घरी  मधे गेले. सकाळी अमेरीकाहून लग्नसाठी येणाऱ्या, मामांना भेटण्यासाठी  ने विमान तळाला गेले. तिथे  पाहीले.  उतरलेल्या मामांना मिळून सगळे  मध्ये बसून घरी पोहोंचले. संध्याकाळी  मध्ये समुद्रात असलेल्या इलेफेंटा गुहेकडे गेले. दूसऱ्या दिवशी लग्न चांगले झाले. लग्नाचे सामान  मध्ये भरुन परत आले. लग्नानंतर सगळे परत गेले.


SCERT TELANGANA

प्रवास म्हणजे काय?

अबदुल्लाने कोण कोणत्या वाहणामध्ये प्रवास केला?

तो कोण कोणती वाहणे पाहीला?

वरील परिच्छेदेत तुम्ही कोणते वाहन पाहीलात? तुम्ही कोणत्या वाहनाने प्रवास करता?





तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21



अब्दुल्लाने कोणकोणती वाहने बघीतली, त्याने कशात बसून प्रवास केला हे तुम्हाला कळले. एका ठीकाणाहून दुसऱ्या ठीकाणी जाण्यासाठी वाहणे उपयोगी पडतात. यात प्रवास करुन आपणास हव्या त्या ठीकाणी पोहोंचू शकतो.

आतापर्यंत आपण विविध वाहणांची माहीती घेतली. यापैकी काही पाण्यावर चालतात, तर काही हवेत चालतात, तर काही जमीनीवर चालतात. खालील चित्राला पहा. कोणती वाहणे कुठे चालत आहेत, ते सांगा?




SCERT TELANGANA



जमीनीवर,पाण्यावर, हवेमध्ये प्रवास करणारे वाहनं तुम्हाला माहीत आहेत काय? त्यांची नावे खालील कोष्टकात लिहा.


| रस्त्यावर प्रवास करणारे | पाण्यात प्रवास करणारे | हवेमध्ये प्रवास करणारे |
|---|---|---|
| | | |








तुमच्या गावात/शहरात सुध्दा वेगवेगळ्या प्रकारची वाहणे असतील? त्यांची नावे लिहा. खालील चित्रांना बघा. या पैकी तुमच्या गावात/शहरात असलेल्या वाहणांना रंग भरा.



वरील चित्रातील वाहनांना तुम्ही ओळखलात का? तुमच्या गावात यांचा प्रवासासाठी वापर करतात का? आणखी कोणत्या वाहणांचा वापर करतात? जे वरील चित्रात नाही आहे.

SCERT TELANGANA





तुमच्या घरापासून जवळच्या ठीकाणी जाण्यासाठी कशाचा उपयोग करतात. दूर गावी कशात प्रवास करतात? खूप दूर जाण्यासाठी कशाचा वापर करतात. ह्या लागणाऱ्या वाहनांची नावे लिहून खालील कोष्टक पूर्ण करा?.

| जवळच्या ठीकाणी जाण्यासाठी | दूरच्या ठीकाणी जाण्यासाठी | खूप दुरच्या ठीकाणी जाण्यासाठी |
|---|---|---|
| | | |

प्रवासाचे अंतर, आणि वेळ आवश्यकतेनुसार विविध प्रकारच्या वाहणांचा वापर करतात. खूप जवळच्या ठीकाणी जाण्यासाठी पायी जातात. साइकल,ऑटो, रिक्षा, जहाज, घोडा गाडी या वाहनावर सुध्दा प्रवास करतात. दूर गावी जाण्यासाठी बस,रेल, कार, मोटार साइकल, जीप, यात जातात. खूप खूप दूर जाण्यासाठी, विदेशास जाण्यासाठी विमानात व जहाजात प्रवास करतात.




सुरारम हे गाव जंगलाच्या जवळ आहे. त्या गावचे लोक कधी कधी जंगलात जातात. डींक, मध, रिटा इत्यादी साठी जंगलात जातात. पण जंगलात जायला रोड नाही.

इथले लोक जंगलात कशावर जातात. विचार करा.

सुरारम गावला बस पण येते. सुरारमहून आणखी दूर गावाला सोय नसल्यामुळे बस जात नाही. मग अशा गावला कसे जायचे? शिवरात्रीला गावातील सर्व लोक मलन्नाच्या जत्रेला जाणार होते. यासाठी त्यांनी एक बस आरक्षण केली. बसमध्ये सर्वजन कोमरवेल्ली जत्रेला जावून परत त्याच बसमध्ये आले.

असे कोणकोणत्या प्रसंगी विशेष बस करुन गावी जातात.

जर त्या गावत बस नसेल तर कसे जातात.




सुरारम सारखे अनेक गाव आहेत. जिथे बस सुविधा नाही, अशा गावाला जायला कोणते वाहन असतात? तसेच काही गावांना बस जात नाही. अशा गावचे लोक कसा प्रवास करतात?

खालील प्रवासाच्या साधनांची नावे वाचा. त्यापैकी कोणते कशा प्रवासा साठी वापरतात. ते विचार करुन लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| साइकल | बैल गाडी | ऑटो | स्कुटर | ट्रॅक्टर | रीक्षा |
| जीप | बस | व्हॅन | लॉरी | कार | जहाज |

SCERT TELANGANA






| जंगलात फिरण्यासाठी उपयोगी पडणारे | रोड नसलेल्या गावला जाण्यासाठी उपयोगी पडणारे | बस नसलेल्या गावापासून इतर गावला जाण्यासाठी उपयोगी पडणारे | जत्रेला, लग्नाला जाण्यासाठी उपयोगी पडणारे |
|---|---|---|---|
| | | | |



प्रत्येक गावातील लोकांना प्रवास करण्यासाठी अनेक प्रकारची वाहणे आवश्यक असतात. पुष्कळ गावाला रस्त्याची सोय आहे. म्हणून तिथे बसची सोय आहे. बसने इतर गावला जातात. रस्त्याची सोय नसणाऱ्या गावला जाण्यासाठी बैल गाडी, साइकल, मोटार साइकल, ऑटो, जीपचा वापर करतात.



SCERT TELANGANA




गाडीला ओढण्यासाठी बैलाचा वापर करतो. काही गाड्यांना ओढण्यासाठी घोड्याचा वापर करतात.हत्तीचा, गाढवाचा, उंटाला सुध्दा प्रवासासाठी उपयोग करतात. खालील चित्र बघा. यांना कधी पाहीलत का?












आजच्या काळात बैलगाडीचा, घोड गाडीचा वापर कमी झाला आहे। कारण काय विचार करा.

काही गावात लग्नाला, जत्रेला, जाण्यासाठी बस, वॅन, लारी, ट्रॅक्टरवर जातात. काही गावात आज सुध्दा बैल गाड्यावरच दुसऱ्या गावला जातात.

तुमच्या गावात जत्रेला, लग्नाला जाण्यासाठी कशावर जातात.

काही गावचे लोक त्यांच्या गावात काम मिळत नसल्याने दुसऱ्या गावला स्थानांतरीत होतात.असे लोक त्यांना आवश्यक असलेल्या वस्तू घेवून जातात. यासाठी बैलगाडी, ट्रॅक्टर,व्हॅनमध्ये जातात. काही प्रांतात जहाजात सुध्दा प्रवास करतात.





## आपण असा प्रवास करावा काय?

खालील चित्र बघा. लोक कशावर प्रवास करीत आहेत? असा प्रवास केल्याने काय होते विचार करा.















वरील चित्राद्वारे तुम्ही काय शिकलात ते लिहा. चित्रात दाखविल्याप्रमाणे केलेला प्रवास घातक असते. वरील दाखविल्याप्रमाणे आपण प्रवास करु नये.





## आता आपण पाहतो ती वाहणे आधी होती का?

आज ऑटो, स्कुटर, साइकल, बस, रेल, विमान, जहाज इत्यादी साधनांचा प्रवासासाठी वापर करीत आहेत. ती साधने आधी सध्दा होते का? ही साधने नव्हती तेव्हा लोक प्रवास कसे करायचे? तुमच्या आजोबांना, आजीला किंवा गावातील कोणत्याही म्हाताऱ्या मानसांना विचारा. त्यांच्या लहानपणी कशाने प्रवास करीत होते.?



## तुम्ही असे करु शकाल काय?

काही रीकाम्या आगडब्या घ्या. त्यांना एकमेकांना धाग्याने किंवा ताराने जोडा. प्रत्तेक आगडबीला



इंजक्शनच्या शिशीचे गोल रबरी बूचाला चाक करुन बसवा. समोरच्या डबीला धागा बाधून ओढत न्या. आगडबीच्या रेलगाडीचा खेळ खेळा. आगडबीप्रमाणे आणखी कशाची रेल बनवू शकतो? ते करुन पहा.

### महत्वाचे शब्द


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | प्रवास | 2. | प्रवासाची साधने | 3. | वाहणे |
| 4. | हवेत प्रवास करणारे | 5. | पाण्यावर चालणारे | 6. | जमीनीवर चालणारे |
| 7. | प्रवासासाठी प्राणी | 8. | प्रवासात अपघात | 9. | जुने प्रवासाची साधने |
| 10. | धोक्याचा प्रवास | | | | |

### आपण हे शिकलो


- एका ठीकाणाहून दुसऱ्या ठीकाणी जाण्यासाठी लोक विविध वाहणांचा उपयोग करतात.
- प्रवासासाठी, प्रवासाच्या विविध साधने वापरतो.
- बैल गाडी, घोड गाडी सुध्दा प्रवासासाठी वापरतात. तसेच उंटला, गाढवाला, हत्तीला सुध्दा प्रवासासाठी वापरतात.
- प्रवासाचे अंतर, आवश्यकतेनुसार विविध प्रकारच्या वाहनांचा वापर होतो.
- खूप माणसं बसलेल्या वाहनामध्ये प्रवास करणे धोक्याचे आहे. जीप, ट्रॅक्टर, लॉरी, इत्यादी खाजगी वाहनात प्रवास करु नये.

SCERT TELANGANA





## हे करा



### विषय आकलन

1. प्रवास म्हणजे काय? तुम्ही कोण कोणत्या वाहनात प्रवास केलात?

2. खालील वाहनांची नावे वाचा. त्यांना कोष्टकात लिहा.
   लॉरी, बस, रेल, ऑटो, ट्रॉली ऑटो, विमान, जहाज, गाढव, घोडा, बैलगाडी, हेलीकॉप्टर, जीप, घोडा गाडी, गाढव, साइकल, रिक्षा, उंट, हत्ती, ट्रॅक्टर

| जमीनीवर चालनारे | पाण्यावर चालनारे | हवेत चालनारे |
|---|---|---|
| | | |

3. साइकील व मोटार साइकील यातील फरक व साम्य कोणते?
4. कोणकोणत्या प्राण्यांचा उपयोग प्रवासासासाठी करतात?
5 खालील चित्र पहा.






चित्रात दाखविल्या प्रमाणे प्रवास करणे धोक्याचे आहे कारण.............................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

SCERT TELANGANA





## चित्र काढा. रंग भरा.

1. तुम्हाला आवडलेल्या दोन वाहनांचे चित्र काढून त्यांना नावे द्या. .



## समाचार कौशल्य - प्रकल्प कार्य

1. रविवारी एक तास तुमच्या गल्लीतील येणारी जाणारी वाहने पहा. कोष्टकात माहिती लिहा.

| फिरलेल्या वाहनाचे नाव | वाहनांची संख्या |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |


- ◆ कोणकोणते वाहन जास्त वेळा फिरले? कोणते वाहन कमी वेळा फिरले?

2. चिकन माती, कागदाचे अड्डे याने बस आणि बैलगाडी तयार करा. त्यांना वर्गात दर्शवा.



## कौतूक करणे

1. प्रवासासाठी वाहनेच नाही तर प्राणी सुध्दा मदत करतात. मग प्राण्यांना आपण कसे पहावे.
2. तुमच्या वर्गात कोणाचे बस आणि बैलगाडी चित्र छान होते? ते तुम्हाला का आवडले?



## प्रश्न विचारणे

1. आधीच्या काळी प्रवास करण्यासाठी कशाचा वापर करीत होते हे विचारण्यासाठी अबदुल्ला आजोबा जवळ गेला. अब्दुल्ला आजोबाला काय काय प्रश्न विचारला असेल?



## मी हे करु शकतो का?



| | | |
|---|---|---|
| 1. | आमच्या परिसरात कोणकोणती वाहणे फीरत असतात, सांगू शकतो. | होय / नाही |
| 2. | प्रवासाच्या साधनाबद्दल वर्णन करु शकतो.त्याला कोष्टकात लिहीतो. | होय / नाही |
| 3. | वाहनांचे चित्र काढू शकतो. | होय / नाही |
| 4. | कोणत्या प्रसंगी कोणते वाहन वापरतात ते सांगू शकतो. | होय / नाही |
| 5. | प्रवासासाठी कोणकोणत्या प्राण्यांचा वापर करतात. त्याचे वर्णन करतो. | होय / नाही |
| 6. | प्रवासाच्या साधनाबद्दल प्रश्न विचारु शकतो. | होय / नाही |

SCERT TELANGANA



